भारतीय सुबोध घटना
द. श्री. मराठे

भारतीय
सुबोध घटना

द. श्री. मराठे,
एल्एल्, बी.

किंमत दीड रुपाया

भारतीय सुबोध घटना

अनुवादक

द. श्री. मराठे

किंमत दीड रुपाया

किंमत दीड रुपाया

प्रकाशक
रा. ज. देशमुख,
देशमुख आणि कंपनी
१९१ शनिवार, पुणें २

मुद्रक
अमरेन्द्र लक्ष्मण गाडगीळ
मङ्गल साहित्य मुद्रणालय,
आनन्दचेम्बर्स, आम्बराई, पुणें ४

प्रास्ताविक

नव्या राज्यघटनेवर एक लेख द्या म्हणून माझे मित्र श्री. मनोहर महादेव केळकर म्हणाल्यावरून नव्या घटनेची काही टिपणे केली ती रामभाऊ देशमुखांच्या पाहण्यात आल्यावर ते म्हणाले तुम्ही पुस्तक लिहून देत असला तर स्वातंत्र्य दिनाला प्रसिद्ध करतो. हे बोलणे झाल्याबरोबर लगेच म्हणजे १४ जानेवारीला पुस्तक लिहिण्यास प्रारंभ केला. बारा दिवसात प्रसिद्ध व्हावयाचे म्हणून अतीशय घाईने लिहावयास लागलो. रोजचे उद्योग थांबतात थोडेच त्यातच पुन्हा झंकार करिता दर आठवडयास मजकूर देण्याचे कबूल केले होते म्हणून जास्तच तारांबळ झाली. छापखान्याच्या अडचणीमुळे ७–८ दिवस जास्त लागतील असे कळल्यावर थोडासा विसावा मिळाला म्हणून थोडया उशीरा म्हणजे दोन फेब्रुवारीला मजकूर लिहून संपविला.

घटना कायद्याचे अक्षरशः भाषांतर करावयाचे नाही असे मी ठरविलेच होते. असा प्रयत्न करणे म्हणजे मराठी शब्दात इंग्रजी पुस्तक लिहिण्यासारखे झाले असते. कायद्याचे इंग्रजी मुळातच थोडेसे विचित्र त्यांतून कायद्याची पुस्तके मराठीतून वाचण्याची लोकाना सवय नसते तेव्हां ती लांबलचक आणि गुंतागुंतीची वाक्ये ' ज्या अर्थी त्या अर्थी अमक्या कलमात काही सांगितले असले तरी त्याला न जुमानता' असले प्रयोग टाळून साध्या शव्दात जर आपण लिहिले नाही तर ते सामान्य लोक वाचणारच नाहीत ही खात्री होती आणि पुस्तक कायद्याच्या तज्ञांचे करिता लिहावयाचे नसल्या कारणाने शक्य तितक्या साध्या शब्दात इंग्रजी आर्टिकल्सचा मराठीत अनुवाद करावा असे मी ठरविले. पुस्तक वकीलांचे करिता नाही (वकील इंग्रजी प्रती शिवाय दुसरी प्रत हातात धरणारच नाहीत कारण त्याना शब्दांचा कीस काढावयाचा असतो.) सामान्य माणसांचे करिता आहे त्यामुळे ज्या बारकाव्यांचे महत्त्व वकीलांचे खेरीज दुसऱ्या कोणाला नाहीं ते या अनुवादात गाळले आहेत पण बाकी कांहीही गाळले नाही. हे कलमांचे शब्दशः भाषांतर नसले तरी हा कलमांचा गोषवाराही नव्हे. कलमातील सर्व महत्त्वाच्या भागांचा अनुवाद यात आहे. काय गाळले आहे हे जर ठरवावयाचे झाले तर मूळ कलम समोर ठेवून जरा

खोल विचार केल्यावाचून अनुवादात मुळापेक्षा काय कमी आहे हे सांगता यावयाचे नाही. परिच्छेदाला परिच्छेद पोट कलमाला पोटकलम असे अनुवादात ठेविले नाही. परिशिष्टाचा मजकूर योग्य ठिकाणी समाविष्ट केला आहे यामुळे परिशिष्टे वेगळी दिली नाहीत. परिच्छेदाचे पुढे दिलेले आकडे कलमांचे आहेत. कोर्टात कायदा म्हणून वापरण्याचे पुस्तक नाही खरे पण घटना कायदा काय आहे याची सामान्य वाचकाना या पुस्तकावरून पूर्ण कल्पना येईल अशी आशा आहे.

मराठीत कायद्याची परिभाषा अजून बनली नाही आणि नवे शब्द निर्माण करून पांडित्य दाखविण्याची माझी लायकी नसल्यामुळे मला येत असलेले शब्द मी वापरले आहेत. ते मराठी आहेत का इंग्रजी आहेत, संस्कृतोद्भव आहेत का नाहीत याची मी फारशी फिकीर केली नाही. आमच्या वापरण्यात जे नेहमी येतात असे वाटले ते शब्द वापरले आहेत. आपण चांगले मराठी लिहितो असे लोकानी म्हणावे ही महत्त्वाकांक्षा मी कधीच धरली नाही कारण पद्धतशीर रीतीने असे माझे मराठीचे शिक्षण झालेच नाही आणि आता स्वतः होऊन त्यावर परिश्रम करण्याची इच्छा राहिली नाही. लोकाना साधारणपणे कळण्यासारखे लिहिले म्हणजे संपले यापेक्षा भाषेकडे जास्त लक्ष देऊ नये असे मी ठरविले आहे.

माझे मित्र दा. पा. रानडे यानी मला घटना कायद्याची इंग्रजी प्रत दिली नसती तर हे पुस्तक लिहिण्यास बराच त्रास पडला असता आणि श्री. ग. वि. नातु यांची प्रेमाची टोचणी व सूचना नसत्या तर लिहिण्याचे काम लवकर झाले नसते तेव्हा या दोघांचाही मी ऋणी आहे.

१४-३-५०
४८२ शनवार पुणे २.

द. श्री. मराठे

भारतीय सुबोध घटना

तारीख २६-१-१९५० पासून अमलात येणाऱ्या नव्या राज्यघटनेत ३९५ कलमे असून तिला आठ परिशिष्टे जोडण्यात आलेली आहेत. ही ३९५ कलमे २२ भागात विभागिली गेली आहेत. कायद्यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे पाहावयाचे झाल्यास बाविसावा भाग हा पहिला भाग व्हावयास पाहिजे होता कारण या भागात घटना कायद्याचे नाव, या कायद्याच्या अंमलबजावणीस प्रारंभ केव्हा होतो ती तारीख आणि या कायद्याने कोणकोणते कायदे रद्द होतात ते आलेले आहे.

पहिल्या भागात संघराज्याचे क्षेत्र आणि त्याचे घटक याबद्दलच्या योजना आल्या आहेत (कलमे १ ते ४). दुसऱ्या भागात नागरिकत्वाच्या योजना आहेत (कलमे ५ ते ११). तिसऱ्या भागात नागरिकांचे मूलभूत हक्क दिले आहेत (कलमे १२ ते ३५). चवथ्या भागात राज्यकारभाराची मूलतत्त्वे आहेत (कलमे ३६ ते ५१). पाचव्या भागाने संघराज्याची घटना दिली असून या भागात ५ प्रकरणे आहेत. पहिल्या प्रकरणात (कलमे ५२ ते ७८) कार्यकारिणीची माहिती आहे. दुसऱ्या प्रकरणात (कलमे ७९ ते १२२) विधिमंडळाच्या योजना आहेत. तिसऱ्या प्रकरणात (कलम १२३) राष्ट्राध्यक्षाच्या कायदे करण्याच्या अधिकारांचे विवेचन आहे. चवथ्या प्रकरणात (कलमे १२४ ते १४७) न्यायालयांची घटना असून पाचव्या प्रकरणात (कलमे १४८ ते १५१) हिशेब-तपासनीसांच्या बद्दलच्या योजना आहेत.

सहाव्या भागात संघराज्याच्या घटकराज्यांच्या घटनेला सुरवात केली आहे (कलमे १५२ ते २३७). या भागात सहा प्रकरणे आहेत. या भागातील योजना प्रायः प्रांताना लागू होणाऱ्या आहेत पण सातव्या भागाने या योजना किरकोळ फरकाने ज्याना आपण आजपर्यंत संस्थाने म्हणत आलो त्यानाही लागू केल्या आहेत.

सहाव्या भागातील पहिल्या प्रकरणात (कलम १५२) घटक राज्याची व्याख्या दिली आहे. दुसऱ्या प्रकरणात घटक राज्याच्या कार्यकारिणीच्या योजना आहेत

(कलमे १५३ ते १६७). तिसऱ्या प्रकरणात घटक राज्याच्या विधिमंडळांच्या योजना आल्या आहेत (कलमे १६८ ते २१२). चवथे प्रकरण एकाच कलमाचे (२१३) असून त्यात घटक राज्याच्या प्रमुखाचे कायदे करण्याचे अधिकार दिले आहेत. पाचव्या (कलमे २१४ ते २३२) प्रकरणात घटक राज्यातील वरिष्ठ न्यायालयांची घटना असून सहाव्या प्रकरणात (कलमे २३३ ते २३७) दुय्यम न्यायालयांच्या योजना आहेत.

सातवा भाग एकाच कलमाचा (कलम २३८) असून त्यात सहाव्या भागातील योजना कोणत्या फरकाने संस्थानांना लागू केल्या आहेत ते दिले आहेत.

आठव्या भागात (कलमे २३९ ते २४२) काही संस्थानी प्रदेशांच्या राज्यव्यवस्थेच्या योजना असून नवव्या (कलम २४३) व दहाव्या (कलम २४४) भागात उरलेल्या प्रदेशांच्या राज्यव्यवस्थेच्या योजना दिल्या आहेत.

अकराव्या भागाने (कलमे २४५ ते २६३) संघराज्य (मध्यवर्ती सत्ता) आणि घटक राज्ये यांचे परस्पर संबंध निर्णीत केले असून या भागात दोन प्रकरणे आहेत. पहिल्या प्रकरणात (कलमे २४५ ते २५५) कायदे करण्याच्या अधिकारांची विभागणी संघराज्य व घटकराज्ये यांच्यात कशी केली आहे ते दिले आहे. दुसऱ्या प्रकरणात (कलमे २५६ ते २६३) यात राज्यकारभाराची वाटणी संघराज्य व घटकराज्ये यांच्यात कशी व्हावी हे निश्चित केले आहे.

बाराव्या भागात (कलमे २६४ ते ३००) आर्थिक योजना, मिळकती, करार आणि फिर्यादी यांच्या योजना दिल्या असून त्यात तीन प्रकरणे आहेत. पहिल्या प्रकरणात (कलमे २६४ ते २९१) पैशासंबंधीच्या योजना असून दुसऱ्या प्रकरणात (कलमे २९२ व २९३) कर्जे काढण्याचे अधिकार दिले आहेत. तिसऱ्या प्रकरणात (कलमे २९४ ते ३००) मिळकती, करार व फिर्यादी इत्यादींचे बद्दल योजना आहेत.

तेराव्या भागात (कलमे ३०१ ते ३०७) व्यापार आणि घटकराज्यातील व्यापारावरील नियंत्रणे वगैरेबद्दलच्या योजना आहेत.

चवदाव्या भागांत (कलमे ३०८ ते ३२३) नोकरशाहीबद्दलच्या योजना आहेत.

पंधरावा भाग (कलमे ३२४ ते ३२९) निवडणुकाबद्दलच्या योजनांचा आहे.

सोळावा भाग (कलमे ३३० ते ३४२) हा खास जमातींच्या बद्दलचा आहे. सतराव्या भागात (कलमे ३४३ ते ३५१) राज्यकारभाराच्या भाषांच्या बद्दल चर्चा असून त्यात चार प्रकरणे आहेत. पहिल्या प्रकरणात (कलमे ३४३ व ३४४)

संघराज्याची भाषा काय असावी हे दिले असून दुसऱ्या प्रकरणात (कलमे ३४५ ते ३४७) घटकराज्यातील भाषा कोणत्या असाव्यात हे दिले आहे. तिसरे प्रकरण (कलमे ३४८-३४९) वरिष्ठ न्यायालयाच्या भाषेबद्दलचे आहे व चवथ्या प्रकरणात (कलमे ३५०-३५१) भाषेबद्दलची राज्यकर्त्यांची कर्तव्ये काय आहेत हे दिले आहे.

अठरावा भाग (कलमे ३५२ ते ३६०) आणीबाणीच्या परिस्थितीत कोणाची कर्तव्ये काय असतात, आणीबाणीची परिस्थिति जाहीर केली म्हणजे व्यक्तींच्या हक्कांचे काय होते इत्यादींची चर्चा करणारा आहे. एकोणिसाच्या भागात (कलमे ३६१ ते ३६७) विविध विषयांची चर्चा असून घटना कायद्यात वापरलेल्या काही शब्दांच्या व्याख्या व या कायद्याचा अर्थ कसा लावावयचा याची पण माहिती दिली आहे.

विसावा भाग (कलमे ३६८) घटनेत दुरुस्त्या कशा व्हाव्यात याबद्दलचा आहे. एकविसावा भाग (कलमे ३६९ ते ३९२) तात्पुरत्या योजनांचा आहे. बाविसाव्या भागाचा (कलम ३९३ ते ३९५) उल्लेख वर आलेलाच आहे.

पहिल्या परिशिष्टात संघराज्याच्या घटकांची माहिती असून त्याचे अ, ब, क व ड असे चार भाग आहेत. अ मध्यें सध्याच्या प्रांतांची नावे आहेत (हेच प्रांत संघराज्याचे घटक आहेत). ब व क मध्ये संघराज्याच्या काही घटकांची (ज्याना आपण संस्थाने म्हणून ओळखत होतो) नावे व प्रदेश दिलेले आहेत. ड भागात अंदमान व निकोबार बेटे येतात.

दुसऱ्या परिशिष्टाचे अ, ब, क, ड, व ई असे भाग आहेत. हे परिशिष्ट अधिकाऱ्यांच्या पगाराबद्दलचे आहे. अ भागात राष्ट्राध्यक्ष व घटक राज्यांचे प्रमुख यांचे पगार वगैरेबद्दलच्या योजना आहेत. ब भागात संघराज्ये व घटकराज्ये यांच्या मंत्र्यांच्या पगाराच्या योजना आहेत. क भागांत विधिमंडळांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या पगाराबद्दल योजना आहेत. ड भागात न्यायाधीशांचे पगार दिले आहेत. ई भागात हिशेबतपासनीस वगैरेंचे पगार दिले आहेत.

तिसऱ्या परिशिष्टात शपथविधि दिले आहेत. चवथ्यामध्ये घटकराज्याना संघराज्याच्या विधिमंडळात प्रत्येकी प्रतिनिधि किती असावयाचे हे दिले आहे.

पाचव्या परिशिष्टात, संघराज्याचे पूर्णाधिकार नसलेल्या प्रदेशांचे शासन कसे व्हावे याच्या योजना असून त्याचे अ,ब,क व ड असे भाग आहेत. अ भागात सर्वसामान्य योजना आहेत. ब भागात व क भागात परिशिष्टात दिलेल्या प्रदेशांच्या

व जमातींच्या राज्यकारभाराच्या योजना दिल्या आहेत व ड भागात या परिशिष्टात दुरुस्त्या कशा करावयाच्या त्याची माहिती आहे.

सहावे परिशिष्ट आसाममधील टोळ्यांच्या ताब्यात असलेल्या प्रदेशातील राज्य-व्यवस्था कशी असावी याबद्दलचे आहे.

सातवे परिशिष्ट हे सर्वांत महत्त्वाचे परिशिष्ट आहे. हे संघराज्य व घटक-राज्ये यांच्या कायदे करण्याच्या अधिकाराबद्दलचे आहे. या परिशिष्टात तीन याद्या दिल्या आहेत. पहिल्या यादीत संघराज्याने कोणत्या विषयाबद्दल कायदे करावेत ते दिले आहे. दुसऱ्या यादीत घटक राज्यातील विधिमंडळाना कोणत्या विषयाबद्दल कायदे करण्याचा अधिकार आहे ते दिले आहे. तिसऱ्या यादीतील विषयाबद्दल संघ-राज्ये व घटकराज्ये या दोघानाही कायदे करण्याचे अधिकार आहेत.

आठव्या परिशिष्टात संघराज्यातील अधिकृत भाषांची यादी दिली आहे.

हिंदुस्थानच्या रहिवाशानी स्वतंत्र प्रजासत्ताक राज्याची स्थापना करून सर्वांना न्याय, स्वातंत्र्य, समता आणि भ्रातृभाव यांची प्राप्ति व्हावी या उद्देशाने एकत्र येऊन आपली राज्यघटना कशी असावी हे ठरविण्यासाठी नियुक्त केलेल्या घटना समिती-मध्ये ता. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी खालील राज्यघटनेचा अंगीकार केला आणि तिला कायद्याचे स्वरूप दिले.

भाग पहिला.

संघराज्य आणि त्याचे क्षेत्र.

इंडिया अथवा भारत हे संघराज्य आहे. या संघराज्याचे घटक आसाम, बिहार, मुंबई, मध्यप्रदेश (पूर्वीचे नाव वऱ्हाड आणि मध्यप्रांत), मद्रास, ओरिसा, पंजाब, संयुक्तप्रांत (उत्तर प्रदेश), पश्चिम बंगाल आणि हैद्राबाद, जम्मू व काश्मीर, मध्य भारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानांचा संघ, राजस्थान, त्रावणकोर-कोचीन, विंध्य प्रदेश आणि अजमेर, भोपाळ, बिलासपूर, कुचबिहार, कूर्ग, दिल्ली, हिमाचल प्रदेश, कच्छ, मणिपूर आणि अंदमान व निकोबार बेटे हे आहेत. १ याशिवाय भारताला अन्य प्रदेश मिळाले तर त्यांचा समावेश संघराज्यात करिता येईल. २ या घटकांच्या सरहद्दी बदलणे, घटक राज्यांच्या क्षेत्राचा विस्तार किंवा संक्षेप करणे, घटकांची नावे बदलणे, दोन घटकांचा मिळून एक घटक करणे अथवा एक किंवा अनेक घटकामधून प्रदेश काढून नवे घटक तयार करणे हे अधिकार संघराज्याच्या विधिमंडळाला आहेत.

पण असे बदल करणारा ठराव राष्ट्राध्यक्षाच्या सूचनेशिवाय विधिमंडळात आणिता येत नाही आणि सूचना देण्यापूर्वी ज्या घटकांच्यावर या बदलांचा परिणाम होणार आहे त्यांचे मत राष्ट्राध्यक्षाने घेतले पाहिजे. ३ असा बदल करिताना त्याच्याशी जुळण्याकरिता घटनेत इतर ठिकाणी बदल करण्याचा अधिकार संघराज्याच्या विधि-मंडळाला आहे. ४

भाग दुसरा.

नागरिकत्व.

ज्या व्यक्तीचा जन्म भारतात झाला आहे अथवा ज्या व्यक्तीचे वडील किंवा आई यापैकी कोणाही एकाचा जन्म भारतात झाला आहे अथवा जी व्यक्ति घटना अमलात येण्याचे पूर्वी कमीत कमी पाच वर्षे भारतात राहात होती आणि जी व्यक्ति घटना अमलात येण्याचे वेळी भारताची निवासी आहे अशा व्यक्तीला प्राय: भारताच्या नागरिकत्वाचे हक्क आहेत. ५ पाकिस्तानमधून हिंदुस्तानमध्ये राहावयास आलेल्यानासुद्धा भारताचे नागरिकत्व मिळू शकते पण या व्यक्तीचे आईवडील किंवा आजोबा किंवा आजी यापैकी कोणाही एकाचा जन्म फाळणीपूर्वीच्या हिंदुस्तानात झालेला असला पाहिजे आणि ही व्यक्ति १९ जुलै १९४८ च्या पूर्वी पासून भारतात राहात असली पाहिजे. या तारखेनंतर आलेल्याना सुद्धा हे हक्क मिळू शकतात पण त्यानी अर्ज करून आपले नाव नोंदवून घेतलेले असले पाहिजे आणि अर्ज करण्याचे पूर्वी कमीत कमी सहा महिने तरी ते भारतात राहात असले पाहिजेत. ६ पाकिस्तानात राहावयास गेलेल्याना हे हक्क नाहीत हे सांगावयास नकोच. एकदा पाकिस्तानात राहावयास गेलेले पण पुढे परवाना घेऊन येथे वस्ती करण्यास आलेल्याना मात्र हे हक्क मिळू शकतात ७

ज्यांचे आईबाप किंवा आजाआजी हे मुळात हिंदुस्थानात राहात असत पण जे स्वतः भारताच्या बाहेर राहण्यासाठी म्हणून गेले आहेत अशाना भारताच्या नागरिकत्वाचे हक्क मिळविण्याची सवलत देण्यात आली पण या सवलतीचा फायदा घ्यावयाचा असेल तर त्यानी आपले नाव अशा देशातील भारताच्या वकिलाकडे नोंदवून घेतले पाहिजे अशी अट घालण्यात आली आहे.८

परदेशाचे नागरिकत्व जर एखाद्याने स्वीकारले तर त्याचे भारताच्या नागरिक-त्वाचे हक्क नष्ट होतात. ९ पण असे जर त्याने केले नाही तर त्याचे अधिकार कायम

राहतात. १० नागरिकत्वाचे हक्क केव्हा प्राप्त व्हावेत आणि केव्हा नष्ट व्हावेत हे ठरविणारे कायदे करण्याचा अधिकार संघराज्याच्या विधिमंडळाला आहेत.११

भाग तिसरा.

मूलभूत हक्क

मूलभूत हक्काशी विरोधी असणारे आजचे कायदे तेवढ्यापुरते बेकायदेशीर समजण्यात येणार आणि मूलभूत हक्क हिरावून घेणारे नवे कायदे करण्याचा हक्क संघराज्याचे विधिमंडळाना अथवा घटक राज्यांचे विधिमंडळाना नाही आणि अधिकार नसताना जर त्यापैकी कोणी तसे कायदे केले अथवा राष्ट्राध्यक्षाने अथवा गव्हर्नर्स किंवा राजप्रमुख यानी तसे वटहुकूम काढले तर ते रद्दबातल समजण्यात येतील. १३

कायद्याच्या दृष्टीने सर्व व्यक्ति सारख्या आणि कायद्याचे संरक्षण सर्वांना सारखे असणार. १४ धर्म, जात, जन्मस्थल अथवा लिंगभेद या कारणास्तव सरकार कोणालाही भेदभावाने वागवू शकणार नाही त्याच प्रमाणे सार्वजनिक स्थळे व करमणुकीच्या जागा, विहिरी, तलाव, घाट, रस्ते, उपाहारगृहे, सरकारी मदतीने चालणाऱ्या संस्था इत्यादि ठिकाणी वर दिलेल्या कारणासाठी कोणालाहि भेदभावाने वागविता येणार नाही. स्त्रिया व मुले यांचेसाठी खास व्यवस्था करण्यास मात्र प्रत्यवाय नाही.१५ सरकारी नोकऱ्यांच्या बाबतीत सर्व प्रजाजनाना अधिकार सारखेच आहेत, पण घटकराज्यानी राज्यात नोकरी करण्यासाठी आपल्या रहिवाशाना जास्त पसंत करण्यास हरकत नाही पण ही सवलत संघराज्याच्या विधिमंडळानी कायदा करून द्यावयास पाहिजे. मागासलेल्या जातीना नोकऱ्यातून सवलती देण्यास मात्र हरकत नाही. धार्मिक संस्थांच्या चालक मंडळावर विशिष्ट धर्मांचे अधिकारी असण्यास मात्र हरकत नाही. १६ अस्पृश्यतेला कायद्याने बंदी करण्यात आली आहे. १७ सरकार कोणाला विद्यालयीन आणि सैन्यातल्या पदव्याखेरीज दुसऱ्या पदव्या देणार नाही आणि भारताच्या नागरिकाना परक्या देशातील सरकारकडून पदवी घेण्यास मनाई आहे. सरकारी नोकरीत असलेल्या परकीयानासुद्धा भारताच्या नोकरीत आहेत तोपर्यंत परराष्ट्राकडून पदवी घेता येणार नाही. सरकारी नोकरीत असलेल्यानी राष्ट्राध्यक्षाच्या परवानगीवाचून परराष्ट्राकडून कोणत्याही प्रकारचे बक्षिस घेता कामा नये व परकीयांची नोकरी अथवा कामगिरी पत्करिता कामा नये. १८

व्यक्तीचे स्वातंत्र्य

अब्रूनुकसानी, कोर्टाची बेअदबी, सभ्यता व राष्ट्राची सुरक्षितता या विषयाबद्दल केलेल्या कायद्यांची मर्यादा संभाळून प्रत्येक व्यक्तीला भाषणस्वातंत्र्य व आपले विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे. हत्यारे न घेता जमाव करण्याचा हक्क प्रत्येक व्यक्तीला आहे पण सार्वजनिक सुरक्षिततेसाठी योग्य त्या प्रमाणात हा हक्क मर्यादित करण्यासाठी कायदे करण्याचे अधिकार मात्र संघराज्य आणि घटक राज्ये याना आहेत. प्रत्येक व्यक्तीला संघ अथवा समाज स्थापन करिता येतील पण सार्वजनिक सुरक्षितता आणि नीतिमत्ता यांच्या रक्षणासाठी कायद्यानी हा हक्क योग्य प्रमाणात मर्यादित करिता येईल. भारतात स्वैरसंचार करण्यास, कोणत्याही ठिकाणी जाऊन निवास करण्यास अथवा मिळकत विकत घेण्यास अथवा स्थायिक होण्यास प्रत्येक व्यक्तीला अधिकार आहे पण सार्वजनिक हिताच्या रक्षणासाठी किंवा शेडयूल्ड (मागासलेल्या) जातीच्या हितसंबंधांच्या रक्षणासाठी योग्य प्रमाणात हे अधिकार कायद्याने मर्यादित करिता येतात. कोणालाही कोणताही उद्योगधंदा अथवा व्यापार करण्यास मुभा आहे पण एखादा धंदा करण्यासाठी अमुक तऱ्हेचे ज्ञान असावयास पाहिजे असे निर्बंध घालण्यास प्रत्यवाय नाही. १९

प्रत्येक व्यक्तीला शिक्षा व्हावयाची ती कायद्याप्रमाणेच झाली पाहिजे आणि हा कायदा सुद्धा गुन्हा होण्याचे पूर्वी अस्तित्वात असला पाहिजे. एका अपराधाबद्दल कोणावरही दोनदा खटला होता कामा नये व दोन वेळी शिक्षा होता कामा नये. आरोपीला स्वतःविरुद्ध साक्ष देण्याची सक्ती करिता येणार नाही. २० कोणाच्याही जीविताला अथवा स्वातंत्र्याला कायद्याच्या आधारावाचून धक्का लाविता येणार नाही. २१

कोणत्याही व्यक्तीला पकडून प्रतिबंधात ठेवावयाचे झाल्यास त्याला का प्रतिबंधात ठेवण्यात येत आहे हे शक्य तितक्या लवकर कळविण्यात आले पाहिजे व त्याला त्याच्या वकिलाचा सल्ला घेण्याची संधि दिली पाहिजे व पकडल्यापासून चोवीस तासाच्या आत मॅजिस्ट्रेटपुढे हजर केले पाहिजे. शत्रुराष्ट्राच्या प्रजाजनास अथवा गुन्हा घडू नये यासाठी केलेल्या कायद्याखाली एखाद्याला पकडले असेल तर त्यास मात्र हे हक्क नाहीत.

गुन्हा होऊ नये यासाठी एखाद्या व्यक्तीला प्रतिबंधात ठेवण्यासंबंधी जे कायदे करावयाचे त्या कायद्याखाली सामान्यतः कोणालाही तीन महिन्यापेक्षा जास्त अडकवून ठेविता

येत नाही पण यापेक्षा जास्त दिवस तुरुंगात ठेवावयाचे असल्यास हायकोर्ट जज्जाच्या दर्जाच्या सल्लागारमंडळाने तसा सल्ला दिला पाहिजे. असा सल्ला जरी मिळाला तरीसुद्धा संघराज्याच्या विधिमंडळाने या बाबतीत कायदा करून जी कमाल मर्यादा घालून दिली असेल तिच्यापेक्षा जास्त दिवस कोणाला प्रतिबंधात ठेविता यावयाचे नाही. अशा कायद्याखाली एखाद्या व्यक्तीला प्रतिबंधात ठेविण्यात आले तर कोणत्या कारणासाठी प्रतिबंधात ठेविण्यात येत आहे हे त्या व्यक्तीला शक्य तितक्या लवकर कळले पाहिजे आणि अशा हुकमाविरुद्ध कारणे दाखविण्याची सवड पण दिली पाहिजे. कोणत्या कारणासाठी प्रतिबंधात ठेविण्यात येत आहे हे जरी दाखविण्याची जबाबदारी अधिकाऱ्यांचेवर असली तरीसुद्धा जी कारणे प्रसिद्ध करणे सार्वजनिक हिताविरुद्ध आहे असे त्याना वाटेल ती कारणे गुप्त ठेवण्याची सवलत त्याना आहे. सल्लागार मंडळाचा सल्ला न घेता कोणत्या परिस्थितीत अधिकारी एखाद्या व्यक्तीला तीन महिन्यापेक्षा जास्त डांबून ठेवू शकतात हे कायदा करून ठरविण्याचा अधिकार संघराज्याच्या विधिमंडळाला आहे. कोणत्या वर्गातल्या लोकाना तीन महिन्यापेक्षा जास्त कोणत्या परिस्थितीत आणि जास्तीत जास्त किती दिवस तुरुंगात ठेविता येईल आणि सल्लागार मंडळाने चौकशी कोणत्या पद्धतीने करावी हे संघराज्याचे विधिमंडळ कायदा करून ठरवू शकते. २२

बेगार, वेठ, माणसांचा व्यापार व सक्तीने कोणाकडून श्रम करून घेणे यास बंदी आहे आणि तसे केल्यास शिक्षा होईल पण सार्वजनिक हितासाठी सरकार कामाची सक्ति करू शकेल. पण असे करिताना धर्म, जात, वर्ग इत्यादि कारणासाठी पक्षपात करण्याचा अधिकार मात्र सरकारला नाही. २३ चवदा वर्षाखालील कोणाही व्यक्तीला कारखाना, खाण अथवा धोक्याचे काम यासाठी नोकरीस ठेवण्यास बंदी आहे. २४

धर्मविषयक स्वातंत्र्य

कोणत्याही धर्मावर विश्वास ठेविण्यास, त्याचे पालन करण्यास आणि त्याचा प्रसार करण्यास कोणालाही हरकत नाही मात्र त्यानी सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता आणि आरोग्य याना धोका उत्पन्न करिता कामा नये. धर्माचे आचरण आणि आर्थिक, राजकीय अथवा ऐहिक बाबींची सांगड जर कोठे घातली गेली असेल तर धर्माखेरीज बाकीच्या बाबतींचे नियंत्रण कायद्याने होऊ शकेल. हिंदु शीख आणि जैन लोकांच्या

सार्वजनिक धार्मिक संस्थामध्यें सुधारणा करण्याच्या उद्देशाने त्या संस्था सर्व हिंदु जातीना आणि वर्गाना खुल्या करण्यासाठी कायदे करण्यास मनाई नाही. कृपाण बाळगणे आणि वापरणे यास शीखाना अधिकार आहे. २५

सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता आणि आरोग्य याना बाध न येता धर्माचरणासाठी आणि दानधर्म करण्यासाठी, संस्था स्थापून त्यांचे मार्फत धार्मिक व्यवहार नियंत्रित करणे; मिळकती संपादन करणे, त्या राखणे व त्याची कायद्याप्रमाणे व्यवस्था करणे हे अधिकार सर्व धर्मांच्या व पंथांच्या लोकाना दिलेले आहेत. २६

एका विशिष्ट धर्माच्या अथवा पंथाच्या प्रसारासाठी अथवा रक्षणासाठी ज्याचे पैसे खर्च होणार आहेत असा कोणताही कर भरण्याची सक्ति कोणावरही करिता येणार नाही. २७

सर्वस्वी सरकारच्या खर्चाने चालविल्या जाणाऱ्या शिक्षण संस्थेत कोणत्याही धर्माचे शिक्षण दिले जाणार नाही. पण एखाद्या देणगीमधून अथवा ट्रस्टमधून जर एखादी संस्था चालत असली आणि या देणगीमध्ये अथवा ट्रस्टमध्ये धार्मिक शिक्षण दिले जावे अशी जर अट असली तर अशी संस्था सरकारने चालविण्यास घेतली तरी तिच्यात धर्माचे शिक्षण दिले जावे. ज्या शिक्षण संस्थेला सरकारने मान्यता दिली आहे अथवा जिला सरकारकडून साहाय्य मिळते अशा संस्थेत शिक्षण घेणारावर धार्मिक शिक्षण घेतलेच पाहिजे अथवा धर्मकृत्यात भाग घेतलाच पाहिजे अशी सक्ति करिता येणार नाही. अज्ञानाच्या धार्मिक शिक्षणास पालकानी संमति दिली तर तसे शिक्षण त्याना देता येईल. २८

सांस्कृतिक व शिक्षणविषयक अधिकार

भारताच्या प्रजाजनातील कोणत्याही वर्गाला आपली भाषा, लिपि व संस्कृति स्वतंत्र राखण्याचा अधिकार आहे. आणि धर्म, जाति, वर्ग अथवा भाषा या सबबीवर कोणत्याही व्यक्तीला सरकारी खर्चाने चालत असलेल्या अथवा सरकारची मदत मिळत असलेल्या शिक्षण संस्थेत प्रवेश नाकारिता येणार नाहीं. २९

धार्मिक अल्पसंख्याकाना अथवा भाषिक अल्पसंख्याकाना स्वतंत्र शिक्षण संस्था स्थापण्याचा आणि चालविण्याचा अधिकार आहे आणि अल्पसंख्याकानी चालविलेल्या सभा या कारणावर सरकार त्याना मदत नाकारू शकणार नाही. ३०

मिळकतीविषयीचे अधिकार

कोणाचीही मिळकत काढून घ्यावयाची झाली तरी ती कायद्याप्रमाणेच काढून घेण्यात आली पाहिजे. सार्वजनिक कामासाठी जरी एखाद्याची स्थावर अथवा जंगम मिळकत किंवा कंपनी अथवा औद्योगिक संस्थेतील हिस्सा काढून घ्यावयाचा असेल तरी असे करणाऱ्या कायद्याने त्याला नुकसानी दाखल पैसे किती द्यावयाचे हे तरी ठरविले पाहिजे किंवा नुकसानी कोणत्या तत्त्वावर दिली जाईल हे निश्चित केले पाहिजे. असा कायदा राष्ट्राध्यक्षाच्या संमतीकरिता जर राखून ठेविण्यात आला असला तर ती संमति मिळेपर्यंत त्याला कायद्याचे स्वरूप मिळणार नाही. घटना अंमलात येण्याच्या पूर्वी याबद्दल जे कायदे राष्ट्राध्यक्षाच्या संमतीसाठी राखून ठेविण्यात आले असतील त्याना जर राष्ट्राध्यक्षाने संमति दिली तर ते या मूलभूत हक्काला बाध आणितात या सबबीवर बेकायदेशीर ठरणार नाहीत. घटना अमलात येण्याचे पूर्वी १८ महिने पास झालेले कायदेसुद्धा या तत्त्वाखाली बेकायदेशीर ठरणार नाहीत. १८ महिन्याच्या आतील जे कायदे या तत्त्वाला विरोध करणारे असतील अशा कायद्याना घटना अमलात आणिल्यापासून तीन महिन्याच्या आत जर राष्ट्राध्यक्षानी संमति दिली तर ते कायदेसुद्धा बेकायदेशीर ठरणार नाहीत. कर किंवा दंड वसुलीसाठी केलेले कायदे त्याचप्रमाणे सार्वजनिक आरोग्याच्या रक्षणासाठी केलेले कायदे किंवा जीविताचा अथवा मिळकतीला उत्पन्न झालेला धोका टाळण्यासाठी केलेले कायदे व अन्य देशाशी भारताने केलेल्या कराराच्या पूर्तीसाठी निर्वासितांच्या मिळकतीबद्दल केलेले कायदे हे जरी वर उल्लेखिलेल्या मूलभूत हक्काला बाध आणीत असले तरी ते तेवढ्या कारणासाठी बेकायदेशीर ठरणार नाहीत. ३१

मूलभूत हक्कांच्या संरक्षणाच्या योजना

मूलभूत हक्कावर गदा आल्यास त्यांच्या संरक्षणासाठी वरिष्ठ न्यायालयाकडे दाद मागण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. या भागाने दिलेल्या हक्कांच्या संरक्षणासाठी योग्य ती आज्ञापत्रके काढण्याचे आणि आदेश देण्याचे अधिकार न्यायालयाला आहेत. ज्या तऱ्हेची आज्ञापत्रे काढण्याचा वरिष्ठ न्यायालयाला अधिकार आहे. त्यात habeas corpus writ, mandamus, prohibition, quo warranto आणि certiorari या तऱ्हेच्या आज्ञापत्रांचा समावेश होतो. habeas corpus आज्ञापत्राचा उद्देश व्यक्तीला न्यायालयापुढे हजर करण्यास भाग पाडणे हा मुद्दत

असतो. ज्यावेळी एखाद्या व्यक्तीच्या हक्कांचे संरक्षण करण्यास दुसरा कायदेशीर मार्ग उरत नाही त्यावेळी व्यक्तीच्या हक्काला मान द्या असा जो हुकूम केला जातो (पूर्वी हे हुकूम राजा स्वतः करीत असे. पुढे न्यायाधीश हे हुकूम राजाकरिता काढू लागले) त्याला mandamus writ असे म्हटले जाते. prohibition म्हणजे मनाईचा हुकूम quo warranto याचा अर्थ " तुम्हाला अमुक अधिकार चालविण्याचा अथवा अमुक गोष्टीवर मालकी गाजविण्याचा कसा हक्क आहे ते दाखवा असा हुकूम काढणे. certiorari आज्ञापत्रकाचा अर्थ कनिष्ठ न्यायालयापुढे चाल-लेला खटला अथवा काम त्यांचेकडून काढून आपल्याकडे घेण्याचा हक्क. संघराज्याचे विधिमंडळ हे वरिष्ठ न्यायालयाने चालविण्याच्या अधिकाराच्या स्वरूपाचे अधिकार आपल्या क्षेत्रापुरते एखाद्या कनिष्ठ न्यायालयास तसा कायदा करून चालविण्यास देऊ शकते पण त्यामुळे वरिष्ठ न्यायालयाचे अधिकार हिरावून घेतले जात नाहीत आणि ते तात्पुरते घ्यावयाचे झाले तर ते फक्त घटना कायद्याखालीच काढून घेतले पाहिजेत. ३२

या भागाने दिलेले हक्क देशाच्या संरक्षक दलात (सैन्य, आरमार, वैमानिक विभाग वगैरे मधील) असलेल्या व्यक्तींच्या बाबतीत व सार्वजनिक सुरक्षिततेची जबाबदारी ज्यांच्यावर आहे अशा लोकांच्या बाबतीत त्यांच्यात शिस्त राहावी आणि त्यांचे हातून योग्य रीतीने कर्तव्यपालन व्हावे या उद्देशाने कितपत मर्यादित करावेत हे ठरविण्याचा अधिकार संघराज्याच्या विधिमंडळास आहे. ३३

भारताच्या एखाद्या भागात लष्करी कायदा पुकारलेला असला तर सुव्यवस्था स्थापिण्यासाठी आणि राखण्यासाठीं सरकारी अधिकाऱ्याना अथवा इतराना ज्या ज्या बेकायदेशीर गोष्टी कराव्या लागल्या त्यांचे बद्दल त्याना माफी देण्यासाठी व त्यांची कृत्ये कायदेशीर ठरविण्यासाठी कायदे करण्याचे अधिकार संघराज्याच्या विधिमंडळास आहेत. ३४

या भागातील योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी जे नवे कायदे करावे लाग-तील ते करण्याचा अधिकार संघराज्याच्या विधिमंडळाला आहे, घटक राज्यांच्या विधिमंडळाना नाही. पण आज यासंबंधाचे जे घटक राज्यांतील विधिमंडळानी केलेले कायदे अस्तित्वात आहेत ते संघराज्याच्या विधिमंडळानी बदलेपर्यंत चालू राहावयाचे आहेत. ३५

भाग ४

राज्यकारभाराची उपदिष्ट धोरणे

या भागात ग्रथित केलेल्या तत्त्वांची अंमलबजावणी कोणत्याही न्यायालयाच्या मदतीने करिता येणार नाही परंतु कायदे करिताना तत्त्वाप्रमाणे चालणे हे विधिमंडळांचे कर्तव्य आहे. ३७

सामाजिक आर्थिक आणि राजकीय बाबतीत सर्वांना न्याय मिळेल आणि सर्वांची भरभराट होईल असे धोरण ठेविणे हे सरकारचे कर्तव्य आहे. ३८ सरकारने असे धोरण टेविले पाहिजे की सर्व स्त्री व पुरुष नागरिकाना उपजीविकेची साधने मिळविण्याचे सारखे हक्क राहतील; राष्ट्रांतील साधनसामुग्रीच्या मालकीची आणि ताब्याची विभागणी सर्वांचे कल्याण होण्याचे दृष्टीने सर्वांत योग्य अशा पद्धतीने केली जाईल, आर्थिक व्यवस्था अशी असणार नाही की ज्याच्या योगाने संपत्ति आणि उत्पादनाची साधने थोड्याच व्यक्तींच्या ताब्यात जातील आणि त्यामुळे सर्वांचेच अहित होईल; स्त्रिया आणि पुरुष याना सारख्या कामाबद्दल सारखाच पगार मिळेल; कामगार स्त्रिया आणि पुरुष यांच्या शक्तीला आणि आरोग्याला धोका पोचणार नाही आणि अल्पवयीन बालकांच्या कोवळ्या वयाचा गैरफायदा घेतला जाणार नाही आणि नागरिकाना आर्थिक अडचणीमुळे आपले वय आणि आपली ताकद यांच्याशी न जुळणारे धंदे करावे लागत नाहीत; अल्पवयीन बालके आणि तरुण स्त्री पुरुष यांची पिळवणूक होणार नाही आणि त्याना नैतिक व व्यावहारिक असहायतेत काळ काढावा लागणार नाही. ३९

ठिकठिकाणी ग्रामपंचायती स्थापून त्याना योग्य ते अधिकार देऊन त्याना स्वयंशासित घटक बनविण्याची सरकारने खटपट करावी. ४० आपली सांपत्तिक स्थिति आणि विकास लक्षात घेऊन प्रत्येक सरकाने लोकाना काम मिळेल, शिक्षण मिळेल आणि बेकारी म्हातारपण अथवा आजारीपण वगैरे आपत्तीत सापडल्यास सार्वजनिक मदत मिळेल एतदर्थ झटले पाहिजे. ४१

कामगारांच्या कामाच्या अटी माणुसकीला धरून असतील आणि गरोदर स्त्रियाना बाळंतपणात मदत मिळेल याची काळजी सरकारने वाहिली पाहिजे. ४२

कायदे करून म्हणा अथवा आर्थिक संघटना करून म्हणा सरकारने प्रत्येक कामगाराला मग तो कारखान्यात राबो नाहीतर शेतात राबो तो बऱ्या रीतीने राहू शकेल एवढा पगार, फुरसत, सामाजिक व सांस्कृतिक सवलती मिळवून दिल्या पाहिजेत आणि ग्रामोद्योग वैयक्तिक जबाबदारीवर म्हणा अथवा सहकार्याच्या तत्त्वावर म्हणा पण भरभराटीस लागतील असे धोरण ठेविले पाहिजे. ४३

भारताच्या सर्व भागात दिवाणी कायदा एकच व्हावा अशी खटपट करणे प्रत्येक सरकारचे कर्तव्य आहे. ४४ चवदा वर्षाच्या आतील सर्व मुलाना मोफत व सक्तीचे शिक्षण ही घटना सुरू झाल्यापासून दहा वर्षाच्या आत मिळू लागेल अशी खटपट करणे सरकारचे कर्तव्य आहे. ४५ समाजातील दुबळ्या लोकांचा आणि शेड्यूल्ड जाती व टोळ्या यांच्या शिक्षणाकडे आणि आर्थिक गरजाकडे विशेष लक्ष देऊन त्यांच्यावर सामाजिक अन्याय होणार नाही व कोणत्याही प्रकारे त्यांची पिळवणूक होणार नाही याची खबरदारी सरकारने घेतली पाहिजे. ४६ लोकाना जास्त पौष्टिक अन्न मिळेल, त्यांच्या राहणीचे मान वाढेल, त्यांचे आरोग्य वाढेल यासाठी प्रयत्न करणे हे सरकारचे आद्य कर्तव्य समजले जाईल आणि शरिराला अपायकारक अशा सर्व मादक द्रव्यांच्या सेवनास बंदी करणे हे यापैकी मुख्य कर्तव्य समजले जाईल. ४७ शेतकीचे आणि गुरे पाळण्याच्या धंद्याचे आधुनिकीकरण करण्याचा सरकार प्रयत्न करील व जनावरांच्या जाती सुधारणे व गोहत्त्या आणि वासरांची हत्त्या व दुधाला किंवा शेतकीला उपयुक्त जनावरे यांच्या हत्त्येस बंदी करणे हे सरकारचे धोरण राहील. ४८ संघराज्याच्या विधिमंडळानी जी स्थाने, जे अवशेष अथवा ज्या वस्तु ऐतिहासिक दृष्ट्या अथवा कलेच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत असे जाहीर केले आहे त्यांचे रक्षण करण्याची व ते हलविले जाणार नाहीत याबद्दल काळजी घेण्याचे कर्तव्य सरकारचे आहे.४९

कार्यकारी विभाग व न्यायविभाग यांचे विभक्तीकरण करणे हे सरकारचे कर्तव्य आहे.५०

जागतिक शांतता आणि सुरक्षितता, राष्ट्रानी एकमेकाला न्यायाने आणि मानाने वागवावे, आंतर्राष्ट्रीय कायदा आणि करार यांचे पालन व्हावे व राष्ट्रातील तंटे लवादामार्फत तोडावेत यासाठी सरकारने झटले पाहिजे. ५१

भाग ५ वा

प्रकरण १ लें

संघराज्य : राष्ट्राध्यक्ष आणि उपाध्यक्ष

भारताला राष्ट्राध्यक्ष राहणार.५२ राज्यकारभार राष्ट्राध्यक्षानी स्वतः अथवा हाताखालच्या अधिकाऱ्यामार्फत घटना कायद्याच्या बरहुकूम चालवावयाचा आहे. राष्ट्राध्यक्ष हे सर्व संरक्षक दलांचे (सैन्य, आरमार, विमानदल इत्यादि) प्रमुख आहेत व त्यानी आपला हा अधिकार कायद्याप्रमाणे चालवावयाचा आहे. राष्ट्राध्यक्षाशिवाय दुसऱ्या कोणाला अधिकार देणे आणि त्यांच्यावर कर्तव्यांचा भार टाकणे या गोष्टी संघराज्याचे विधिमंडळ करू शकते. ५३

राष्ट्राध्यक्षांची निवडणूक संघराज्याच्या दोन्ही सभागृहाचे सदस्य आणि घटक राज्यांच्या कनिष्ठ सभागृहाचे सदस्य यानी मिळून करावयाची आहे.५४ राष्ट्राध्यक्षांच्या निवडणुकींत घटकराज्याना योग्य प्रमाणात मते असावीत आणि सर्व घटकराज्ये आणि संघराज्य यांना समप्रमाणात मते असावीत या उद्देशाने अशी योजना केली आहे की प्रत्येक घटकराज्याच्या लोकसंख्येस त्या घटकराज्याच्या कनिष्ठ सभागृहातील सदस्यांच्या संख्येने भागून जेवढे सहस्र येतील त्या प्रत्येक सहस्राला एक या प्रमाणात त्या घटकराज्याच्या प्रतिनिधीला राष्ट्राध्यक्षाच्या निवडणुकीत मते राहतील. भागून बाकी पाचशेपेक्षा जास्त उरत असेल तर आणखी एक मत मिळावयाचे आहे. घटकराज्यांच्या प्रतिनिधीना मिळून जेवढी मते अशा तऱ्हेने देण्यात येतील या संख्येला संघराज्याच्या विधिमंडळातील सदस्यांच्या संख्येने भागून जी संख्या येईल तेवढी मते संघराज्याच्या विधिमंडळातील प्रत्येक सदस्याला राष्ट्राध्यक्षाच्या निवडणुकीत देण्याचा अधिकार आहे. राष्ट्राध्यक्षाची निवड प्रपोरशनल रेप्रेझेंटेशनच्या तत्त्वाप्रमाणे सिंगल ट्रान्स्फरेबल व्होटने गुप्त मतदानपद्धतीने व्हावी अशी योजना करण्यात आली आहे.५५

राष्ट्राध्यक्षाची मुदत पाच वर्षांची आहे पण ही मुदत संपण्याचे पूर्वी त्याना राजीनामा देता येतो व घटना कायद्याच्या उल्लंघनाबदल त्याना काढून टाकिता येते. राष्ट्राध्यक्षानी राजीनामा दिल्यास ही गोष्ट ताबडतोब लोकसभेच्या स्पीकरना (अध्यक्षाला) कळविण्यात आली पाहिजे. मुदत जरी संपली तरी दुसरा अध्यक्ष

येऊन स्थानापन्न होईपर्यंत राष्ट्राध्यक्षानी काम पाहावयाचे आहे. ५६ राष्ट्राध्यक्षाचा अधिकार चालविलेल्या व्यक्तीला फिरून राष्ट्राध्यक्षाच्या निवडणुकीला उभे राहण्याचा अधिकार आहे.५७

वयाची ३५ वर्षे पूर्ण झालेल्या आणि संघराज्याच्या कनिष्ठ कायदेमंडळाचा सदस्य होण्यास पात्र असलेल्या कोणाही भारताच्या नागरिकाला राष्ट्राध्यक्षाच्या निवडणुकीस उभे राहण्याचा अधिकार आहे. सरकारी अथवा निमसरकारी नोकरीत असलेल्या व्यक्तीना मात्र राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून येता येणार नाही पण गव्हर्नर (राज्यप्रमुख), राजप्रमुख, उपराष्ट्राध्यक्ष आणि प्रधान यानी निवडणुकीस उभे राहण्यास हरकत नाही.५८ राष्ट्राध्यक्ष हे संघराज्याच्या अथवा घटक राज्याच्या विधिमंडळाचे सदस्य राहू शकत नाहीत. निवडणुकीपूर्वी जर ते सदस्य असले तर राष्ट्राध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाल्यावर त्यांची पहिली जागा रिकामी पडेल.

राष्ट्राध्यक्षाने वेतन (अथवा मोबदला) असलेली कोणतीही जागा पत्करिता कामा नये. राष्ट्राध्यक्षाचा पगार तात्पुरता १०,००० रुपये दरमहा ठरविण्यात आला आहे आणि घटना अमलात येण्याचे पूर्वी गव्हर्नर जनरल याना जे भत्ते व सवलती वगैरे मिळत होत्या त्याच सवलती इत्यादि त्यात संघराज्याच्या विधिमंडळाने बदल करीपर्यंत मिळत राहणार. पण एकदा एका व्यक्तीने हे पद स्वीकारले म्हणजे त्या व्यक्तीची राष्ट्राध्यक्ष असण्याची मुदत संपेपर्यंत यात काही बदल करिता येणार नाही.५९

राष्ट्राध्यक्षाने अध्यक्षपदाचे अधिकार चालविण्यास प्रारंभ करण्यापूर्वी वरिष्ठ न्यायाधीशांचे समोर आपण अध्यक्षपदाची कर्तव्ये नीट रीतीने पार पाडू आणि घटना व कायदे यांचे यथाशक्ति पालन करू अशी शपथ घेतली पाहिजे.६०

राष्ट्राध्यक्षावर घटनाभंग केल्याचा आरोप करण्याचा अधिकार संघराज्याच्या विधिमंडळातील कोणत्याही कायदेमंडळाला आहे. पण हा आरोप ठरावाने करण्यात आला पाहिजे आणि या ठरावाची लेखी पूर्वसूचना ठराव पुढे येण्याचे पूर्वी कमीत कमी १४ दिवस देण्यात आली पाहिजे आणि या पूर्वसूचनेवर कायदेमंडळाच्या सदस्यापैकी कमीत कमी एक चतुर्थांश सदस्यानी सह्या केल्या पाहिजेत. हा ठराव पास होण्यास कायदेमंडळाच्या एकंदर सदस्यापैकी $\frac{2}{3}$ सदस्य तरी अनुकूल असले पाहिजेत.

कोणत्याही एका कायदेमंडळाने अशा तऱ्हेचा ठराव करून आरोप केला म्हणजे त्याची चौकशी संघराज्याच्या दुसऱ्या कायदेमंडळाकडून व्हावयाची असते. अशा

चौकशीच्या वेळी समक्ष हजर राहून अथवा प्रतिनिधिमार्फत आपली बाजू मांडण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षाला आहे.

या चौकशीनंतर त्या कायदेमंडळाला जर हा आरोप शाबीत झाला आहे असे वाटले तर त्या कायदेमंडळाने तसा ठराव केला पाहिजे आणि असा ठराव पास होण्यास त्या कायदेमंडळाच्या एकंदर सदस्यापैकी कमीत कमी $\frac{2}{3}$ सदस्यानी ठरावाला अनुमति दिली पाहिजे. अशा रीतीने आरोप शाबीत झाल्यास हा ठराव ज्या तारखेला पास होईल त्या तारखेपासून राष्ट्राध्यक्षाला अध्यक्षपदावरून काढून टाकिले जाईल. ६१

राष्ट्राध्यक्षाची मुदत संपण्याचे आत नव्या अध्यक्षाची निवडणूक पूर्ण झालेली असली पाहिजे. राष्ट्राध्यक्षाची जागा राजीनामा मृत्यु अथवा त्याना अध्यक्षपदावरून काढून टाकिल्यामुळे जर रिकामी पडली असली तर नव्या अध्यक्षाची निवडणूक शक्य तितक्या लवकर घेण्यात येईल आणि अशा रीतीने नवीन निवडलेल्या अध्यक्षाची मुदत त्यानी कामाला सुरवात केल्यापासून पाच वर्षाची राहील. ६२

भारताला एक उपराष्ट्राध्यक्ष राहतील. ६३ उपराष्ट्राध्यक्ष हे संघराज्याच्या वरिष्ठ कायदेमंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष राहतील पण उपराष्ट्राध्यक्ष हे ज्या वेळी राष्ट्राध्यक्षाचे अधिकार बजावीत असतील त्यावेळी मात्र त्याना संघराज्याच्या वरिष्ठ कायदेमडळाच्या अध्यक्षाचे अधिकार चालविता येणार नाहीत आणि त्याबद्दल मिळणारे वेतन वगैरे-ही त्या काळापुरते मिळणार नाही. ६४

राष्ट्राध्यक्षाची जागा, राजीनामा मृत्यु अथवा त्या व्यक्तीला राष्ट्राध्यक्षपदावरून काढून टाकिल्यामुळे जर रिकामी पडली तर नवीन अध्यक्षाची निवडणूक होऊन त्यानी कामाला आरंभ करीपर्यंत राष्ट्राध्यक्षाचे अधिकार उपराष्ट्राध्यक्षानी चालवावयाचे आहेत. राष्ट्राध्यक्ष जर अनुपस्थिति आजारीपण अथवा दुसऱ्या काही कारणामुळे काम करू शकत नसतील तर तेवढ्या वेळापुरती त्यांची कामे उपराष्ट्राध्यक्षानी करावयाची आहेत.

उपराष्ट्राध्यक्ष ज्यावेळी कोणत्याही कारणाने राष्ट्राध्यक्षाची कामे पाहात असतील त्यावेळी त्याना राष्ट्राध्यक्षाचे अधिकार चालविता येतील आणि राष्ट्राध्यक्षाना मिळणारे वेतन भत्ते सवलती वगैरे सर्व त्याना मिळतील. ६५

संघराज्याच्या वरिष्ठ व कनिष्ठ अशा दोन्ही विधिमंडळानी संयुक्त बैठक घेऊन या बैठकीत प्रपोर्शनल रेप्रेझेंटेशनच्या पद्धतीने सिंगल ट्रान्सफरेबल असे मत गुप्त

मतदान पद्धतीने देऊन उपराष्ट्राध्यक्षाची निवड करावयाची आहे. उपराष्ट्राध्यक्षाना कोणत्याही विधिमंडळाचे सदस्य राहता येणार नाही आणि निवडणुकीचे वेळी जर ते असे सदस्य असले तर उपराष्ट्राध्यक्षपदी त्यांची निवड झाल्याने त्यांची पहिली जागा रिकामी होईल.

उपराष्ट्राध्यक्षाच्या निवडणुकीसाठी वयाची ३५ वर्षे पूर्ण झालेल्या व संघराज्याच्या वरिष्ठ कायदेमंडळाचा सदस्य होण्यास पात्र असलेल्या कोणाही भारताच्या प्रजाजनाला उभे राहता येईल. अशी व्यक्ति सरकारी अथवा निमसरकारी नोकरीत असता कामा नये पण राष्ट्राध्यक्ष, गव्हर्नर, राजप्रमुख, उपराष्ट्राध्यक्ष व प्रधान याना याबाबतीपुरते सरकारी नोकर समजण्यात यावयाचे नाही. ६६

उपराष्ट्राध्यक्षाच्या अधिकाराची मुदत पाच वर्षांची आहे पण ही मुदत संपण्यापूर्वी ते आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात. उपराष्ट्राध्यक्षाना जागेवरून काढावयाचे झाल्यास त्यासाठी संघराज्याच्या वरिष्ठ कायदेमंडळाने साध्या बहुमताने पास केलेला ठराव पुरेसा आहे पण हा ठराव १५ दिवसाच्या पूर्वसूचनेवाचून वरिष्ठ कायदेमंडळात आणिता यावयाचा नाही आणि या ठरावाला संघराज्याच्या कनिष्ठ कायदेमंडळाने संमति दिलेली असली पाहिजे. उपराष्ट्राध्यक्षाची अधिकाराची मुदत संपली असली तरी नवीन माणूस कामावर रुजू होईपर्यंत त्यानीच काम पाहावयाचे आहे. ६७

उपराष्ट्राध्यक्षाची अधिकाराची मुदत संपण्याचे पूर्वी नवी निवडणूक पूर्ण झाली पाहिजे. पण उपराष्ट्राध्यक्षांचा राजिनामा, मृत्यु अथवा त्याना जागेवरून काढून टाकिण्यात येणे अशा काही कारणामुळे जर त्यांची जागा रिकामी पडली तर ही निवडणूक त्यानंतर शक्य तितक्या लवकर झाली पाहिजे. नवे निवडून आलेले उपराष्ट्राध्यक्ष पाच वर्षे अधिकारावर राहतील. ६८

उपराष्ट्राध्यक्षानी कामावर रुजू होण्याचे पूर्वी राष्ट्राध्यक्ष अथवा त्यानी नियुक्त केलेला कोणी इसम याच्या समोर राज्यघटना आणि कायदा याच्याशी निष्ठा बाळगेन आणि आपले कर्तव्य चोख रीतीने बजावीन अशी शपथ घ्यावयाची आहे. ६९

या प्रकरणात ज्या प्रसंगाची तरतूद केली नाही असा एखादा प्रसंग आला आणि त्यावेळी राष्ट्राध्यक्षाचे अधिकार कोणी चालवावेत असा प्रश्न पडला तर त्यावेळी काय योजना करावी हे ठरविण्याचा अधिकार संघराज्याच्या कायदेमंडळाला आहे. ७०

राष्ट्राध्यक्ष आणि उपराष्ट्राध्यक्ष यांच्या निवडणुकासंबधी काही वाद उपस्थित झाले तर अशा सर्व वादग्रस्त प्रश्नांचा अखेरचा निर्णय वरिष्ठ न्यायालयानी (Supreme court) द्यावयाचा आहे. वरिष्ठ न्यायालयाने अशा वेळी जरी निवडणूक बेकायदेशीर ठरविली तरी न्यायालयाचा ठराव होण्याचे पूर्वी राष्ट्राध्यक्षानी अथवा उपराष्ट्राध्यक्षानी जी कृत्ये केलेली असतील ती वरिष्ठ न्यायालयाच्या या निर्णयाने बेकायदेशीर ठरणार नाहीत. राष्ट्राध्यक्षाच्या आणि उपराष्ट्राध्यक्षाच्या निवडणुकीबाबत कायदे करण्याचा अधिकार संघराज्याच्या कायदेमंडळाला आहे पण हे कायदे घटनाकायद्याच्या योजनाना विरोध करणारे असता कामा नयेत.७१

लष्करी कायद्याखाली शिक्षा झालेल्याना, संघराज्याच्या कक्षेतील कायद्यांचे उल्लंघन करण्याबद्दल शिक्षा झालेल्याना व फाशीची शिक्षा झालेल्याना माफी देण्याचा किंवा त्यांच्या शिक्षा कमी करण्याचा अथवा तहकूब ठेविण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षाला आहे. जेथे कायद्याने संरक्षक दलातील एखाद्या अधिकाऱ्याला किंवा घटक राज्याच्या गव्हर्नरला अथवा राजप्रमुखाला अशा स्वरूपाचे अधिकार दिलेले आहेत तेथे त्यांच्या अधिकाराना या योजनेने बाध येणार नाही.७२

ज्या बाबतीत संघराज्याच्या विधिमंडळाला घटनेने कायदे करण्याचे अधिकार दिले आहेत त्या बाबतीत व ज्या बाबतीत एखाद्या तहाने अथवा कराराने हिंदुस्थान सरकारला अधिकार आलेले आहेत त्या बाबतीत संघराज्याच्या कार्यकारिणीचे अधिकार चालतील. परंतु ज्या बाबतीत कायदे करण्याचे हक्क घटक राज्याना दिलेले आहेत त्याबाबतीत या घटनेने अथवा संघराज्याच्या विधिमंडळाने मुद्दाम कायदा करून दिल्याशिवाय संघराज्याच्या कार्यकारिणीला अधिकार चालविता येणार नाहीत.

संघराज्याला ज्या बाबतीत कायदे करण्याचा अधिकार आहे अशा बाबतीत घटक-राज्य अथवा त्याचे अधिकारी सध्या जे अधिकार चालवीत असतील आणि जी कर्तव्ये बजावीत असतील त्या बाबतीत संघराज्याच्या विधिमंडळाने कायदे करून वेगळी व्यवस्था करीपर्यंत आहे ती पद्धति चालू ठेवावयाची आहे.७३

प्रधानमंडळ

राष्ट्राध्यक्षाना राज्यकारभार चालविण्याबाबत सल्ला देण्यासाठी एक प्रधानमंडळ राहील आणि या प्रधानमंडळाला एक पंतप्रधान असणार. प्रधानानी राष्ट्राध्यक्षाना काय सल्ला दिला या प्रश्नाची चौकशी कोणत्याही न्यायालयापुढे होणार नाही.७४

पंतप्रधानांची नेमणूक राष्ट्राध्यक्षानी स्वतःच्या मताने करावयाची आहे आणि इतर प्रधानांची नेमणूक पंतप्रधानांच्या सल्ल्याने करावयाची आहे. प्रधानानी किती दिवस अधिकार चालवावयाचे हा राष्ट्राध्यक्षांच्या मर्जीचा प्रश्न आहे. प्रधानमंडळ हे संघराज्याच्या कनिष्ठ कायदेमंडळाला जबाबदार राहील व ही जबाबदारी संयुक्त स्वरूपाची राहील. पूर्णपणे निःपक्षपातीपणाने वागून, व घटना पाळून आपली कर्तव्ये बजावीन अशा स्वरूपाची शपथ प्रधानाने अधिकार स्वीकारण्यापूर्वी त्याला राष्ट्राध्यक्ष घ्यावयास लावितील. गौप्यस्फोट करावयाचा नाही ही अटसुद्धा या शपथेत येणार. संघराज्याच्या विधिमंडळाचा सदस्य नसलेला माणूस सहा महिन्यापेक्षा जास्त प्रधानपदावर राहू शकत नाही. घटना अमलात येण्यापूर्वी प्रधानाना जे पगार वगैरे मिळत होते तेच मिळत राहणार पण यात वेळोवेळी बदल करण्याचा अधिकार संघराज्याच्या विधिमंडळाचा आहे.७५

भारताचे कायदेशीर सल्लागार

वरिष्ठ न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नेमणूक होण्यास पात्र असलेल्या एका व्यक्तीस राष्ट्राध्यक्षाने भारत सरकारचा कायदेशीर सल्लागार म्हणून नेमावयाचा आहे. भारत सरकारला कायद्याचा सल्ला देणे व कायद्याबाबत राष्ट्राध्यक्ष वेळोवेळी जी कामे त्यांच्याकडे सोपवितील ती कामे आणि घटना कायद्याचे अन्वये व इतर कायद्या अन्वये जी कामे त्यांच्याकडे येतील ती करणे हे या सल्लागाराचे (Attorney General of India) कर्तव्य आहे.

आपली कर्तव्ये करीत असताना भारतातील कोणत्याही न्यायालयात येऊन काम चालविण्याचा त्यांना अधिकार आहे. ॲटर्नी जनरलनी किती दिवस काम करावयाचे आणि त्याना वेतन काय मिळावयाचे हे राष्ट्राध्यक्ष ठरवितील.७६

राज्यकारभाराची पद्धति

भारत सरकारचा सर्व राज्यकारभार राष्ट्राध्यक्षांच्या नावाने चालेल. राष्ट्राध्यक्षानी दिलेल्या आज्ञा व त्यानी काढिलेली आज्ञापत्रके त्यांचीच आहेत हे दर्शविण्यासाठी त्यांचेवर खुणा चिन्हे वगैरे कशा असतील हे ठरविण्यासाठी राष्ट्राध्यक्ष त्या बाबतीत नियम करितील आणि अशा चिन्हाने अंकित असलेली आज्ञापत्रके वगैरे राष्ट्राध्यक्षानी काढिली नाहीत अशी कोणीहि तक्रार केल्यास ती चालणार नाही.

राज्यकारभार योग्य रीतीने चालविण्यासाठी कामाची पद्धति काय असावी आणि प्रधानांच्यामध्ये कामाची विभागणी कशी व्हावी ह्यासंबंधीचे नियम राष्ट्राध्यक्षानी करावयाचे आहेत. ७७

संघराज्याच्या कारभारासंबंधाने प्रधानमंडळाने घेतलेले निर्णय व कायद्या-संबंधीच्या योजना राष्ट्राध्यक्षांचे कानावर घालणे हे पंतप्रधानांचे कर्तव्य आहे व या दोन्ही बाबतीत राष्ट्राध्यक्षांनी माहिती मागितल्यास ती पुरविण्याची जबाबदारी पंतप्रधानाची आहे. प्रधानमंडळापुढें प्रकरण न ठेविता एखाद्या प्रधानाने निर्णय घेतला असल्यास ते प्रकरण फेरविचारासाठी प्रधानमंडळापुढे ठेविण्यात आले पाहिजे असे सांगण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षाना आहे. ७८

प्रकरण २ रे

संघराज्याचे विधिमंडळ

राष्ट्राध्यक्ष आणि वरिष्ठ व कनिष्ठ (Council of States व House of the People) अशी दोन विधिमंडळे मिळून संघराज्याचे विधिमंडळ होईल. ७९

वरिष्ठ विधिमंडळात (Council of States) राष्ट्राध्यक्षाने नियुक्त केलेले वाङ्मय, शास्त्र, कला व समाजसेवा यात पारंगत असलेले १२ प्रतिनिधि असणार व घटकराज्यांचे २३८ पेक्षा जास्त नाहीत असे निवडून आलेले प्रतिनिधि असणार. घटक राज्यापैकी आसाम ६ बिहार २१ मुंबई १७ मध्यप्रदेश १२ मद्रास २७ ओरिसा ९ पंजाव ८ युक्तप्रांत (उत्तर प्रदेश) ३१ पश्चिम बंगाल १४ हैद्राबाद ११ जम्मू व काश्मीर ४ मध्य भारत ६ म्हैसूर ६ पतियाळा व पूर्व पंजाव संस्थानांचा संघ ३ राजस्थान ९ सौराष्ट्र ४ त्रावणकोर–कोचीन ६ विंध्य प्रदेश ४ अजमेर कूर्ग १ भोपाळ १ बिलासपूर हिमाचल प्रदेश १ कुच बिहार १ दिल्ली १ कच्छ १ मणिपूर त्रिपुरा १ असे एकूण २०५ प्रतिनिधि असणार.

या पैकी अजमेर, भोपाळ, बिलासपूर, कुचबिहार, कूर्ग, दिल्ली, हिमाचल प्रदेश, कच्छ, मणिपूर, त्रिपुरा या संस्थानांचे प्रतिनिधि कसे निवडावेत हे संघराज्याच्या विधिमंडळाने ठरवावयाचे आहे बाकीच्या घटकांचे प्रतिनिधि हे त्या घटकातील कनिष्ठ विधिमंडळाच्या निवडलेल्या प्रतिनिधीनी निवडून द्यावयाचे आहेत. ८०

कनिष्ठ विधिमंडळात (House of the People लोकसभा) साधारणपणे पाचशेपेक्षा जास्त सभासद असणार नाहीत. ही निवडणूक प्रत्यक्ष निवडणूक असून

पाच ते साडेसात लाख मतदारानी एक प्रतिनिधि निवडून द्यावा अशी साधारण योजना केलेली आहे, व त्याप्रमाणे मतदार संघ पण निर्माण करण्यात येणार आहेत ८१ अँग्लो इंडियन जमातीला लोकसभेत पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले नाही असे राष्ट्राध्यक्षास वाटले तर ते लोकसभेत या जमातीचे दोन प्रतिनिधि नियुक्त करू शकतील. ३३१ अजमेर, भोपाळ, बिलासपूर, कुचबिहार, कूर्ग, दिल्ली, हिमाचल प्रदेश कच्छ, मणिपूर व त्रिपुरा या घटकांचे अथवा दुसऱ्या प्रदेशाचे प्रतिनिधि कशा तऱ्हेने निवडून द्यावयाचे हे संघराज्याच्या विधिमंडळाने कायदे करून ठरवावयाचे आहे. ८२

संघराज्याचे वरिष्ठ विधिमंडळ हे संपूर्ण रीतीने बरखास्त केव्हाच करिता यावयाचे नाही पण दर दोन वर्षांनी त्यातील $\frac{1}{3}$ सभासदानी आपल्या जागा खाली करावयाच्या आणि त्यांच्या जागी नवीन प्रतिनिधि निवडून द्यावयाचे असे ठरले आहे. यासंबंधीच्या योजना संघराज्याच्या विधिमंडळाने करावयाच्या आहेत.

संघराज्याच्या कनिष्ठ विधिमंडळाची मुदत पाच वर्षांची आहे पण आणीबाणीची परिस्थिति जर जाहीर करण्यात आली असली तर संघराज्याचे विधिमंडळ कायदा करून ही मुदत एका एका वेळी एक वर्षाने वाढवू शकते पण अशी वाढविलेली मुदत आणीबाणीची परिस्थिति संपल्यानंतर ६ महिन्यापेक्षा जास्त टिकू शकत नाही. ८३

संघराज्याच्या विधिमंडळाचे (दोन्ही विधिमंडळाचे) सदस्य होण्यास ती व्यक्ति भारताची नागरिक असली पाहिजे आणि वरिष्ठ मंडळासाठी उमेदवार म्हणून उभी राहावयाची असेल तर वयाची तीस वर्षे पूर्ण झालेली असली पाहिजेत आणि कनिष्ठ विधिमंडळाची उमेदवार म्हणून उभी राहणार असेल तर २५ वर्षे पूर्ण झालेली असली पाहिजेत. याशिवाय आणखी अटी संघराज्याचे विधिमंडळ कायद्याने घालू शकेल. ८४

संघराज्याच्या विधिमंडळांच्या बैठकी वर्षातून कमीत कमी दोन तरी झाल्याच पाहिजेत आणि दोन बैठकीमधील अंतर सहा महिन्यापेक्षा कमी असले पाहिजे.

याखेरीज राष्ट्राध्यक्षाना संघराज्याच्या विधिमंडळांच्या बैठकी आणखी पाहिजे तेव्हा व पाहिजे त्या ठिकाणी भरविता येतील व बैठकीचे काम लांबणीवर टाकिता येईल (तहकूब ठेविता येईल) अथवा कनिष्ठ विधिमंडळ बरखास्त करून नव्या निवडणुकीचा हुकूम देता येईल. ८५

आपले भाषण ऐकण्यासाठी राष्ट्राध्यक्ष संघराज्याच्या कोणाही एका विधिमंडळाला अथवा दोनही विधिमंडळाना बोलावू शकतात. संघराज्याच्या कोणत्याही विधिमंडळापुढे चर्चेला असणाऱ्या अथवा जे चर्चेला यावे अशी इच्छा आहे अशा कायद्याच्या योजनेबद्दल (बिलाबद्दल) संदेश पाठविण्याचा राष्ट्राध्यक्षाना अधिकार आहे आणि असा संदेश त्यांच्याकडून आला म्हणजे विधिमंडळाने शक्य तितक्या तातडीने त्या प्रश्नाचा विचार केला पाहिजे. ८६

विधिमंडळांची बैठक बोलाविली म्हणजे राष्ट्राध्यक्षानी त्यांचेपुढे भाषण करून बैठक बोलाविण्याचा उद्देश त्याना सांगितला पाहिजे. या भाषणात कोणत्या विषयांचा उल्लेख येईल, या विषयांची चर्चा विधिमंडळानी किती वेळ करावयाची, बाकीचे काम बाजूस सारून या विषयांची चर्चा विधिमंडळाने करावयाची का नाही या गोष्टी त्यासाठी केलेल्या नियमानी नियंत्रित केल्या जातील.८७

प्रत्येक प्रधानाला व भारताच्या कायदेशीर सल्लागाराला कोणत्याही विधिमंडळापुढे भाषणे करण्याचा व चर्चेत भाग घेण्याचा अधिकार आहे परंतु प्रधान ज्या विधिमंडळाचे सदस्य असतील त्यातच त्याना मत देण्याचा अधिकार आहे.८८

विधिमंडळाचे अधिकारी

उपराष्ट्राध्यक्ष हे वरिष्ठ विधिमंडळाचे पदसिद्ध चेअरमन आहेत. शक्य तितक्या लवकर वरिष्ठ विधिमंडळाने आपल्यापैकी एकाची डेप्युटि चेअरमन म्हणून निवडणूक करावयाची आहे. काही कारणाने त्याचे सदस्यत्व गेल्यास दुसरा डेप्युटि चेअरमन निवडला जाईल. डेप्युटि चेअरमन आपल्या अधिकाराचा राजीनामा देऊ शकतात आणि बहुमताच्या ठरावाने त्याना जागेवरून काढिता पण येते. असा ठराव चर्चेला घेण्यापूर्वी १४ दिवस तो ठराव आणण्याची सूचना मात्र दिलेली असली पाहिजे.९०

उपराष्ट्राध्यक्ष राष्ट्राध्यक्षांचे काम करीत असल्यामुळे म्हणा अथवा अन्य काही कारणाने चेअरमनची जागा रिकामी असली तर त्यांच्या जागी डेप्युटि चेअरमनने काम करावयाचे आहे आणि त्यांची ही जागा जर त्यावेळी रिकामी असली तर राष्ट्राध्यक्ष वरिष्ठ विधिमंडळाच्या ज्या सदस्याला नियुक्त करितील त्यानी चेअरमनचे काम करावयाचे आहे. आणि यापैकी कोणीही व्यक्ति एखादे वेळी हजर नसली तर वरिष्ठ विधिमंडळाने आपल्यापैकी एखाद्याची निवड तात्पुरता चेअरमन म्हणून करावयाची आहे.९१

उपराष्ट्राध्यक्ष किंवा डेप्युटि चेअरमन याना काढून टाकिण्याचा ठराव जर चर्चिला जात असेल तर त्यावेळी या व्यक्ति हजर असूनसुद्धा त्यानी चेअरमन म्हणून काम करावयाचे नाही. त्यावेळी तो अधिकार वर दिल्याप्रमाणे नियुक्त केलेल्या अथवा निवडलेल्या दुसऱ्या व्यक्तीने चालवावयाचा आहे. उपराष्ट्राध्यक्षाना काढण्याच्या ठरावाची चर्चा चालू असल्यास तिच्यात भाग घेण्याचा चेअरमन याना हक्क आहे पण त्यानी त्या ठरावावर मत टाकिता कामा नये. ९२

संघराज्याच्या कनिष्ठ विधिमंडळाने आपल्यापैकी दोघाना स्पीकर व डेप्युटि स्पीकर म्हणून शक्य तितक्या लवकर निवडून द्यावयाचे असून त्यांच्या जागा रिकाम्या झाल्यास त्यांच्या जागी दुसऱ्याच्या निवडणुकी करावयाच्या आहेत.

स्पीकर अथवा डेप्युटि स्पीकर मंडळाचे सदस्य आहेत तोपर्यंतचे अधिकार चालवू शकतील. त्याना आपल्या जागेचा राजीनामा देता येतो किंवा विधिमंडळ बहुमताने ठराव करून त्याना आपल्या जागेवरून काढून टाकू शकते मात्र असा ठराव चर्चेला येण्यापूर्वी १४ दिवस तो चर्चेला येणार असल्याची सूचना द्यावी लागते. विधिमंडळ जर बरखास्त करण्यात आले तर नव्या विधिमंडळाची पहिली बैठक भरेपर्यंत त्यांची जागा रिकामी झाली आहे असे समजण्यात येणार नाही. ९४

स्पीकर उपस्थित नसले तर त्यांची कामे डेप्युटि स्पीकरनी करावयाची आहेत आणि तेहि जर उपस्थित नसले तर कनिष्ठ विधिमंडळाच्या ज्या सभासदाला राष्ट्राध्यक्षानी नियुक्त केले असेल त्यानी स्पीकरची कामे करावयाची आहेत. यापैकी कोणीही जर जाग्यावर नसले तर विधिमंडळाने तात्पुरता स्पीकर निवडावयाचा आहे. ९५

स्पीकर अथवा डेप्युटि स्पीकर याना जागेवरून काढण्याच्या ठरावाची ज्यावेळी चर्चा चालू असेल त्यावेळी त्यानी स्पीकर म्हणून काम करावयाचे नाही त्यावेळी वर दिल्याप्रमाणे दुसऱ्या व्यक्तीने तो अधिकार चालवावयाचा आहे. अशा ठरावाच्या चर्चेत स्पीकर अथवा डेप्युटि स्पीकर भाग घेऊ शकतील व आपले वैयक्तिक मतही देऊ शकतील पण दोन्ही बाजूस सारखी मते पडली असता स्पीकरला जे निर्णायक मत असते ते मात्र त्याना स्वतःच्या फायद्यासाठी वापरता येणार नाही. ९६

संघराज्याच्या विधिमंडळाने दुसरी योजना करीपर्यंत जो पगार घटना परिषदेच्या स्पीकरना आणि डेप्युटि स्पीकरना देण्यात येत होता तोच पगार या स्पीकरना आणि डेप्युटि स्पीकरना मिळावयाचा आहे. ९७

प्रत्येक विधिमंडळाला वेगळे सेक्रेटरिएट (अधिकारी वर्ग) असणार पण काही अधिकारी दोन्ही विधिमंडळात मिळून एक असण्यास हरकत नाही. त्याना पगार काय मिळावयाचा त्यानी कामे कोणती करावयाची इत्यादि गोष्टी विधिमंडळानी कायदे करून ठरावावयाच्या आहेत. हे कायदे होईपर्यंत राष्ट्राध्यक्षानी चेअरमन व स्पीकर याना विचारून त्यांच्या सल्यानी याबद्दल तात्पुरत्या योजना करावयाच्या आहेत.९८

कामाची व्यवस्था

विधिमंडळाच्या सदस्यानी स्थानापन्न होण्यापूर्वी राष्ट्राध्यक्ष अथवा त्यानी नियुक्त केलेल्या व्यक्तीसमोर घटना कायद्याशी एकनिष्ठ राहीन व आपली कर्तव्ये योग्य-रीतीने पार पाडीन अशी शपथ घेतली पाहिजे.९९

विधिमंडळांच्या बैठकीत सर्व प्रश्नांचा निर्णय सामान्यतः साध्या बहुमताने लागावयाचा आहे. दोन्ही पक्षाला मते सारखी पडली तरच स्पीकरने आपले मत द्यावयाचे आहे आणि हे मत निर्णायक होणार.

सभागृहांत, कामाचेवेळीं कोणी सदस्य गैरहजर आहे म्हणून अथवा अधिकार नसलेल्या एखाद्या व्यक्तीने कामात भाग घेतला अथवा मत टाकिले म्हणून विधि-मंडळाचे ठराव बेकायदेशीर होणार नाहीत.

विधिमंडळानी कायदे करून ठरवीपर्यंत कोरमसाठी (उपस्थित सभासदांची संख्या कमीत कमी किती असून चालेल ते) एकंदर सदस्यांपैकी $\frac{१}{१०}$ हजर असले पाहिजेत. एवढी संख्या हजर नसली तर तेवढी संख्या जमेपर्यंत बैठक तहकूब ठेवणे हे चेअर-मन व स्पीकर यांचे कर्तव्य आहे.१००

एकाच व्यक्तीला दोनही विधिमंडळाचे सभासद होता येणार नाही आणि दोन्हीकडे एका व्यक्तीची निवडणूक झाल्यास त्यापैकी कोणती जागा त्यानी रिकामी करावयाची हे विधिमंडळाने कायदा करून ठरवावयाचे आहे.

त्याचप्रमाणे एकाच व्यक्तीला संघराज्याच्या विधिमंडळाचे व घटकराज्याच्या विधि-मंडळाचे एकाच वेळी सदस्य राहता येणार नाही आणि राष्ट्राध्यक्षानी या बाबतीत घालून दिलेल्या मुदतीत जर तिने घटक राज्याच्या विधिमंडळाच्या सभासदत्वाचा राजीनामा दिला नाही तर त्या व्यक्तीचे संघराज्याच्या विधिमंडळाचे सभासदत्व रद्द समजण्यात येईल. सभासदाला चेअरमन अथवा स्पीकर यांचेकडे राजीनामा सादर करून निवृत्त होता

येईल. विधिमंडळाची परवानगी न घेता जर एखादा सदस्य सतत दोन महिने बैठकाना गरहजर राहील तर त्याची जागा रिकामी झाली असे समजण्यात येईल.१०१

संघराज्याचा अथवा घटक राज्याचा पगारी नोकर, वेड लागलेला इसम, नादार इसम, भारताचा जो नागरीक नाही असा इसम अथवा जो परराष्ट्राशी एकनिष्ठ आहे असा इसम हा संघराज्याच्या विधिमंडळाचा सदस्य होऊ शकणार नाही अथवा सदस्य झालेला असला तरी तो सदस्य राहू शकणार नाही. आणखी कोणत्या प्रकारच्या इसमाना सभासद होता येणार नाही हे विधिमंडळ कायदा करून ठरवू शकते. पण प्रधान हे मात्र या बंदीपुरते अशा वेळी सरकारी नोकर मानिले जाणार नाहीत.१०२

एखाद्या व्यक्तीला वरील कारणाकरिता सभासद राहता येईल का नाही असा वाद उपस्थित झाला तर राष्ट्राध्यक्षानी निवडणुकाबाबतच्या कमिशनचा (Election Commission) चा सल्ला घेऊन दिलेला निर्णय हा अखेरचा निर्णय मानिला जाईल.१०३

शपथ न घेता जर एखादा सभासद विधिमंडळाच्या बैठकीला हजर राहील अथवा मत देईल तर त्याला अशा प्रत्येक दिवसाबद्दल पाचशे रुपये दंड द्यावा लागेल.१०४

विधिमंडळाच्या सदस्यांचे अधिकार व त्याना मिळणाऱ्या सवलती इत्यादि.

विधिमंडळातील कामकाजाबद्दलच्या नियमाना धरून आणि घटना कायद्याने घालून दिलेल्या दंडकाचे उल्लंघन न करिता प्रत्येक सदस्याला विधिमंडळात भाषण-स्वातंत्र्य आहे. विधिमंडळातील भाषणाबद्दल अथवा मतदानाबद्दल कोणत्याही सदस्याविरुद्ध कोणत्याही न्यायालयात काम चालू शकणार नाही त्याचप्रमाणे विधि-मंडळातर्फे बैठकीचा वृत्तांत वगैरे जे प्रसिद्ध होईल त्यात आलेल्या विधानासाठीसुद्धा कोणाही सदस्याविरुद्ध कायदेशीर काम चालविता येणार नाही.

बाकीच्या बाबतीत विधिमंडळाने कायदा करून बदलीपर्यंत, विधिमंडळाच्या सभासदाना असणारे अधिकार त्याना मिळणाऱ्या सवलती वगैरे सर्व ब्रिटिश पार्लमेंटच्या सदस्याना सध्या असणारे अधिकार व सवलती यासारखे असतील.

जे अधिकार आणि ज्या सवलती विधिमंडळाच्या सदस्याना असणार तेच अधिकार आणि त्याच सवलती विधिमंडळात भाषण करण्याचा आणि तेथील चर्चेत

भाग घेण्याचा ज्याना अधिकार आहे त्याना असतील. (म्हणजे प्रायः प्रधान आणि ॲटर्नी जनरल याना).

संघराज्याच्या विधिमंडळानी कायदा करून ठरवीपर्यंत घटना परिषदेच्या सदस्याना सध्या जो पगार आणि भत्ते वगैरे मिळत आहे तेवढाच पगार व भत्ते वगैरे विधिमंडळाच्या सभासदाना मिळणार आहेत.१०६

पैशाच्या बिलाखेरीज बाकीची बिले प्रथम वरिष्ठ अथवा कनिष्ठ कोणत्याही विधिमंडळांपुढे आणिता येतील. पैशाची बिले आणि ज्या बिलांचा विचार दोनही विधिमंडळांच्या संयुक्त बैठकीमध्ये होईल ती बिले वगळून बाकीच्या बिलाना दोन्ही विधिमंडळाना मान्य असलेल्या दुरुस्त्यासह दोन्ही विधिमंडळानी संमति दिल्यावाचून त्यांचे कायद्यात रूपांतर होऊ शकणार नाही. विधिमंडळाची बैठक तहकूब झाल्याने बिलांचा विचार रद्द झाला असे समजले जाणार नाही पण बिलाचा विचार पूर्ण होण्याचे पूर्वी जर कनिष्ठ विधिमंडळ बरखास्त करण्यात आले तर मात्र त्या बिलाचा विचार रद्द झाला असे समजण्यात येईल.१०७ पैशाच्या बिलाखेरीज दुसरे एखादे बिल एका विधिमंडळाने पास करून दुसऱ्याकडे विचारासाठी पाठविले असले आणि ते दुसऱ्या विधिमंडळाने फेटाळले अथवा सहा महिन्याचे आत मंजूर केले नाही किंवा त्या बिलाच्या दुरुस्त्याबद्दल दोन्ही विधिमंडळात एकवाक्यता होऊ शकली नाही तर राष्ट्राध्यक्ष या बिलाचा विचार करण्यासाठी आणि त्याच्यावर मते घेण्यासाठी दोन्ही विधिमंडळांची संयुक्त बैठक संदेश पाठवून बोलाव शकतील. संयुक्त बैठक बोलाविण्याचा आपला निश्चय राष्ट्राध्यक्षानी जाहीर केला म्हणजे विधिमंडळाने बिलावरील आपली चर्चा तहकूब करावयाची आहे.

संयुक्त बैठकीत असे बिल दुरुस्त्यासह बहुमताने मान्य झाले म्हणजे मग त्याचे कायद्यात रूपांतर होण्यास हरकत नाही. दुरुस्त्या सुचविण्याला काही तरी अंत असावा या दृष्टीने असे बंधन घालण्यात आले आहे की बिल पास होण्यास विलंब लागल्याकारणाने त्यात ज्या दुरुस्त्या करणे अवश्य झाले आहे आणि ज्या मुद्यावर दोन्ही विधिमंडळात मतभेद आहेत त्या मुद्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही मुद्याबाबत दुरुस्त्या संयुक्त बैठकीत सुचविता येऊ नयेत. संयुक्त बैठक बोलाविण्याचा आपला इरादा जाहीर केल्यानंतर काही कारणास्तव कनिष्ठ विधिमंडळ जरी बरखास्त करण्यात आले असले तरी सुद्धा संयुक्त बैठक भरवून त्यात असे बिल मंजूर करून घेण्यास हरकत नाही.१०८

पैशासंबंधीच्या बिलाच्या बाबतीत संघराज्याच्या वरिष्ठ विधिमंडळाचे अधिकार मर्यादित असल्याकारणाने पैशासंबंधाचे बिल कशाला म्हणतात हे आपण प्रथम पाहिले पाहिजे. ज्या बिलात खाली दिलेल्या विषयासंबंधी योजना असतात त्याना सामान्यतः पैशासंबंधीची बिले म्हटले जाते. एखादा कर नवीन बसविणे, जुना रद्द करणे, करवसुलीची माफी देणे, करात बदल करणे अथवा कराचे कोणत्याही तऱ्हेने नियंत्रण करणे, भारत सरकारने कर्ज काढणे अथवा सरकारच्या आर्थिक जबाबदारीत ज्यायोगे बदल होईल असा कायदा करणे किंवा सरकारने कशाचीही आर्थिक जबाबदारी पत्करणे, भारत सरकारचा कन्सॉलिडेटेड फंड किंवा कॉन्टिजन्सी फंड (यांच्या व्याख्या पुढे येतील) हे कोणाच्या ताब्यात असावे, त्यांच्यात पैशाची भर कशी टाकिली जावी व त्यांच्यातून पैसा कसा काढिला जावा, कोणता खर्च कन्सॉलिडेटेड फंडातून केला जावा, त्या खर्चात वाढ किती केली जावी, कन्सॉलिडेटेड फंडाच्या रकमा कोठे व कशा जमा केल्या जाव्यात, संघराज्याच्या हिशेबांची तपासणी कशी व्हावी इत्यादि सर्व बाबी आणि तदनुषंगिक सर्व बाबी या पैशाच्या बाबी समजल्या जातील.

एखाद्या बिलाने दंड वसूल करण्याची अथवा नुकसानी दाखल रकमा वसूल करण्याची योजना केली असेल अथवा परवाना देण्याबद्दल फी घेण्याची योजना केली असेल किंवा कामाचा मोबदला म्हणून पैसे वसूल करण्याची योजना केली असेल तर तेवढ्यासाठी त्या बिलाला पैशासंबंधाचे बिल म्हणावयाचे नाही असे ठरले आहे.

स्थानिक संस्थानी स्थानिक उपयोगाकरिता नवे कर बसविणे, जुने रद्द करणे कराची माफी देणे, करात बदल करणे, करांचे नियंत्रण करणे इत्यादि विषय संबंधाची जी बिले आणिली जातील त्यांचा समावेश पैशासंबंधाच्या बिलांच्या व्याख्येत करू नये (कारण त्या योजनाना केवळ स्थानिक महत्त्व असते) असे ठरविण्यात आले आहे.

एखादे बिल पैशासंबंधाचे आहे का नाही असा प्रश्न निघाल्यास याबद्दलचे कनिष्ठ विधिमंडळातील स्पीकरचे मत म्हणजे अखेरचा निर्णय मानिला जावयाचा आहे. पैशासंबंधीचे बिल विचारासाठी वरिष्ठ विधिमंडळाचेकडे पाठवावयाचे असले किंवा मान्यतेसाठी राष्ट्राध्यक्षांचेकडे पाठवावयाचे असले तर त्याच्यावर कनिष्ठ विधिमंडळाच्या स्पीकरनी हे पैशासंबंधीचे बिल आहे असा शेरा मारून ते पाठविले पाहिजे. ११०

पैशासंबंधीचे बिल हे प्रथम वरिष्ठ विधिमंडळात आणिता येणार नाहीं. कनिष्ठ विधिमंडळाने पैशासंबंधीचे बिल मंजूर केल्यानंतर ते वरिष्ठ विधिमंडळाकडे त्यांच्या काही सूचना असतील तर त्या त्यानी कराव्यात यासाठी पाठविण्यात यावयाचे आहे. सूचनासाठी आलेले बिल आपल्या सूचनासह १४ दिवसाचे आत वरिष्ठ विधिमंडळाने कनिष्ठ विधिमंडळाकडे परत पाठविले पाहिजे. या सूचना कनिष्ठ विधिमंडळाने मान्य केल्या तर या दुरुस्त्यासह दोन्ही विधिमंडळानी हे बिल मंजूर केले असा अर्थ होतो आणि या दुरुस्त्या कनिष्ठ विधिमंडळाने जर फेटाळल्या तर या दुरुस्त्या नसलेले बिल दोन्ही विधिमंडळानी मंजूर केले असे समजण्यात यावयाचे आहे. पैशासंबंधीचे बिल विधिमंडळाने १४ दिवसाच्या आत जर आपल्या सूचनासह कनिष्ठ विधिमंडळाकडे पाठविले नाही तर तेवढी मुदत टळली म्हणजे ते दोन्ही विधिमंडळानी मंजूर केले असे समजावयाचे आहे. थोडक्यात पैशासंबंधीच्या बिलात कनिष्ठ विधिमंडळ करील ती पूर्व दिशा आहे.१०९

कोणतेही बिल दोनही विधिमडळानी मंजर केले म्हणजे ते राष्ट्राध्यक्षांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यांत आले पाहिजे. बिलाला मान्यता देणें किंवा न देणे हा त्यांच्या मर्जीचा प्रश्न आहे.

पैशाच्या बिलाखेरीज बाकीची बिले आपल्या सूचनासह राष्ट्राध्यक्ष हे फेरविचारासाठी म्हणून दोन्ही विधिमंडळाकडे पाठवू शकतात. राष्ट्राध्यक्षानी केलेल्या सूचनाबरहुकूम त्या बिलात दुरुस्त्या कराव्यात का नाही याचा विचार त्यानी करून दोन्ही विधिमंडळाना संमत असलेल्या दुरुस्त्यासह किंवा कोणत्याच दुरुस्त्या त्यांना संमत नसल्या तर मूळ स्वरूपातच ते बिल त्यानी राष्ट्राध्यक्षांच्या मान्यतेसाठी पाठवावे. आणि अशा तऱ्हेने फेरविचार करून परत पाठविलेल्या बिलाला मात्र मान्यता नाकारण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षाना नाही.१११

आर्थिक बाबींच्या योजना

संघराज्याच्या वार्षिक जमाखर्चाचे अंदाजपत्रक दरवर्षी संघराज्याच्या विधिमंडळांचे समोर ठेविले जाण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी राष्ट्राध्यक्षांचेवर आहे. ज्या रकमा भारताच्या कन्सॉलिडेटेड फंडामधून खर्च **झाल्याच** पाहिजेत **असे घटना कायद्याने ठरविले आहे**, त्या रकमा या अंदाजपत्रकात वेगळ्या दाखविण्यात आल्या पाहिजेत आणि ज्या इतर खर्चाच्या रकमा कन्सॉलिडेटेड फंडा-

मधून खर्च करण्यात याव्यात अशी सूचना आहे त्या रकमा वेगळ्या दाखविल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे वसुली खात्यावर जो खर्च करण्याचे योजिले आहे तो खर्च इतर खर्चाच्या बाबीपासून वेगळा करून दाखविण्यात आला पाहिजे.

पुढे दिलेल्या खर्चाच्या बाबींच्याबद्दल संघराज्याच्या विधिमंडळानी चर्चा करावयास हरकत नाही पण तो खर्च करावा का नाही हे ठरविण्याचा अधिकार विधिमंडळाना नाही. त्या प्रश्नावर त्यांची मते घ्यावयाची नाहीत. ११३ तो खर्च भारताच्या कन्सॉलिडेटेड फंडातून झालाच पाहिजे असे घटना कायद्याने ठरविले आहे. राष्ट्राध्यक्षांचा पगार त्यांचा खर्च भत्ते वगैरे बाबी, वरिष्ठ विधिमंडळाचे चेअरमन व डेप्युटि चेअरमन त्याचप्रमाणे कनिष्ठ विधिमंडळाचे स्पीकर व डेप्युटि स्पीकर यांचे पगार भत्ते वगैरे बाबी, सरकारी कर्जरोख्यावरील व्याज, या कर्जाच्या फेडीसाठी लागणाऱ्या रकमा व कर्जे उभारण्यासाठी लागणाऱ्या रकमा, वरिष्ठ न्यायालयातील न्यायाधीशांचे पगार व पेन्शन्स भत्ते इत्यादि, फेडरल कोर्टाच्या न्यायाधीशाची पेन्शन्स, हायकोर्टाच्या (पूर्वीच्या प्रांतातील व इलाख्यातील) जज्जाना देण्यात यावयाची पेन्शन्स, भारताचे मुख्य हिशेब–तपासनीस यांचा पगार, भत्ते पेन्शन्स वगैरे, कोर्टाने अथवा लवादाने सरकारकडून देवविलेले पैसे देऊन टाकण्यासाठी लागणाऱ्या रकमा, विधिमंडळानी कायदा करून आणखी काही बाबी खर्चाच्या या वर्गात घातल्या तर त्या बाबीवरील खर्च हे खर्च कन्सॉलिडेटेड फंडातून झालेच पाहिजेत. ११२

बाकीच्या खर्चाच्या बाबीमधील रकमा द्याव्यात अशी शिफारस राष्ट्राध्यक्षानी कनिष्ठ विधिमंडळाकडे करावयाची आहे आणि ही मागणी कबूल करणे, नाकारणे अथवा अंशतः मान्य करणे ही कनिष्ठ विधिमंडळाच्या हातची गोष्ट आहे. ११३

अंदाजपत्रक मंजूर झाले म्हणजे शक्य तितक्या लवकर विधिमंडळापुढे एक अॅप्रोप्रिएशन बिल (खात्यातून पैसे काढण्याची मंजुरी देणारे बिल) आणिले जावयाचे आहे. विधिमंडळाने मंजूर केलेल्या रकमा आणि ज्या रकमा कन्सॉलिडेटेड फंडातून खर्च झाल्याच पाहिजेत अशा रकमा त्या फंडातून खर्च केल्या जाव्यात अशी परवानगी देणारे हे बिल असणार, या रकमात फरक करणाऱ्या दुरुस्त्या विधिमंडळापुढे आणिल्या जाता कामा नयेत. ११४

अपेक्षेपेक्षा जास्त खर्च लागत असला अथवा झाला असल्यास त्यासाठी विधिमंडळाची मंजुरी मागण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षाना आहे. ज्या रकमा कन्सॉलिडेटेड

फंडातून खर्च झाल्याच पाहिजेत असे घटनेने ठरविले आहे त्या रकमा ॲप्रोप्रिएशन बिलात आल्या तरी त्यांच्यावर मत देण्याचा अधिकार विधिमंडळाना नाही.११५

अंदाजपत्रक मंजूर होऊन मग पुढे ॲप्रोप्रिएशन बिल पास होऊन रकम हाती येईपर्यंत जर एखाद्या खात्याला थांबावयास वेळ नसला तर या खर्चासाठी अगाऊ रकमा मंजूर करण्याचा अधिकार कनिष्ठ विधिमंडळाला आहे. अनपेक्षित रीतीने जर एखादा खर्च निघाला आणि तो केवढा होईल व त्याचा तपशील काय असेल याचा अंदाज करिता येण्यासारखा नसल्यामुळे तो अंदाजपत्रकात घालता येण्यासारखा नसल्यास त्यासाठी रकमा मंजूर करणे हा अधिकार कनिष्ठ विधिमंडळास आहे. अशा तऱ्हेने कनिष्ठ विधिमंडळाने मंजूर केलेल्या मागण्यातील रकमा खर्च करण्यास परवानगी देणारा कायदा विधिमंडळानी पास करावयाचा आहे.११६

पैशासंबंधाचे तरतुदीचे बिल अथवा ज्याची दुरुस्ती राष्ट्राध्यक्षांच्या शिफारसीवाचून विधिमंडळापुढे आणिता यावयाची नाही असे बिल प्रथम वरिष्ठ विधिमंडळापुढे मुळीच आणिता येत नाही. पण एखादा कर कमी करावयाचा असला किंवा रद्द करावयाचा असला तर असली दुरुस्ती सुचविण्यास राष्ट्राध्यक्षांची शिफारस लागत नाहीं.

इतर बिलापैकीसुद्धा जर एखादे बिल असे असेल की जे पास केले असता भारताच्या कन्सॉलिडेटेड फंडातून रकमा खर्च कराव्या लागतील तर अशा बिलाची राष्ट्राध्यक्षानी शिफारस केल्यावाचून त्याचा विचार विधिमंडळाना करिता येणार नाही.११७

कामकाजाची पद्धति

आपल्या पुढील कामकाज कोणत्या पद्धतीने चालावे यासंबंधी नियम करण्याचा अधिकार प्रत्येक विधिमंडळास आहे पण हे नियम घटना कायद्याशी विसंगत मात्र असता कामा नयेत. असे नियम विधिमंडळानी करीपर्यंत हिंदुस्थानच्या घटनेपूर्वीच्या विधिमंडळांचे जे नियम असतील त्यात चेअरमन व स्पीकर याना योग्य वाटतील ते फरक करून तेच नियम विधिमंडळांच्या कामकाजाला तात्पुरते लागू करावयाचे आहेत. दोन्ही विधिमंडळांची संयुक्त बैठक ज्यावेळी भरावयाची असेल त्या वेळी कामाकाजाचे नियम कोणते असावेत हे राष्ट्राध्यक्षानी चेअरमन आणि स्पीकर यांचा सल्ला घेऊन ठरवावयाचे आहेत. संयुक्त बैठकीचे अध्यक्षपद कनिष्ठ विधिमंडळाच्या स्पीकरनी स्वीकारावयाचे आहे.

पैशासंबंधीच्या बिलाना आणि योजनाना अनुचित विलंब लागू नये यासाठी त्याबाबतची विधिमंडळातील चर्चा कामकाजाची पद्धति व व्यवस्था कशी असावी हे कायदा करून विधिमंडळे ठरवू शकतील.११९ विधिमंडळातील भाषा पंधरा वर्षे पर्यंत हिंदी किंवा इंग्रजी असणार आणि कायदे इंग्रजीतून (निदान पहिली पाच वर्षे तरी) केले जाणार पण पंधरा वर्षांनंतर विधिमंडळातून इंग्रजीचे उच्चाटन होणार आहे. एखाद्या सभासदाला हिंदी अथवा इंग्रजी भाषा नीट बोलता येत नसल्या तर त्याला आपल्या मातृभाषेतून भाषण करण्यास परवानगी मिळू शकेल. १२०

वरिष्ठ न्यायालयाच्या किंवा हायकोर्टाच्या न्यायाधिशाला काढून टाकण्याच्या ठरावाची चर्चा चालू असेल तरच तेवढी न्यायाधिशाच्या वर्तनावर विधिमंडळात टीका करिता येईल एरवी न्यायाधिशाच्या वर्तनाबद्दल टीका करता येणार नाही.१२१ विधिमंडळातील कोणतेही कामकाज नियमाना सोडून झाले ही तक्रार ऐकण्याचा अधिकार कोणत्याही कोर्टाला नाही त्याचप्रमाणे विधिमंडळातील काम सुव्यवस्थित चालावे यासाठी विधिमंडळाने जे अधिकारी नेमिले असतील त्यांच्या वर्तनाची चौकशी करण्याचा कोणाही कोर्टाला अधिकार नाही.१२२

राष्ट्राध्यक्षाचे कायदे करण्याचे अधिकार

विधिमंडळाच्या बैठकी चालू नसतील अशा वेळी राष्ट्राध्यक्षाना अवश्यक वाटतील ते वटहुकूम काढण्याचा अधिकार आहे. हा वटहुकूम विधिमंडळाने केलेल्या कायद्याच्या तोडीचा असणार पण तो अध्यक्षानी संमतीसाठी विधिमंडळापुढे ठेवावयाचा आहे. विधिमंडळाची बैठक सुरू होऊन सहा आठवड्याचे आत या वटहुकुमाला विधिमंडळाची संमति मिळाली नाही किंवा या मुदतीचे आत विधिमंडळाने ठराव करून त्याबद्दलची आपली नापसंती दर्शविली तर तेव्हापासून हा वटहुकूम रद्द होणार. राष्ट्राध्यक्षाना वटहुकूम मागे घेण्याचा अधिकार आहे. वटहुकूम काढून कायदे करण्याचा जरी राष्ट्राध्यक्षाना अधिकार असला तरी सुद्धा या घटनेने ज्या बद्दल कायदे करण्याचा अधिकार संघराज्याच्या विधिमंडळाना नाही अशा गोष्टी राष्ट्राध्यक्षाना वटहुकूम काढून करता येणार नाहीत. १२३

न्याय विभाग

भारतासाठी एक वरिष्ठ न्यायालय असणार. त्यात एक मुख्य न्यायाधीश आणि (संघराज्याच्या विधिमंडळाने या संख्येत बदल करी पर्यंत) सात इतर न्यायाधीश

असणार. प्रत्येक न्यायाधीशाची नेमणूक राष्ट्राध्यक्षानी करावयाची असून ही नेमणूक करण्यापूर्वी त्यानी वरिष्ठ न्यायालयातील न्यायाधीशांचा अथवा घटक राज्यातील हाय कोर्टाच्या न्यायाधीशांचा सल्ला इष्ट वाटल्यास घ्यावा. सरन्यायाधीशाच्या नेमणुकीखेरीज इतर न्यायाधीशांच्या नेमणुकीबाबत मात्र सरन्यायाधीशाचा सल्ला घेणे अवश्य ठरविले आहे. न्यायाधीशाची नेमणूक झाली म्हणजे त्याने पांसष्ट वर्षाचे वय होईपर्यंत न्यायाधीश म्हणून काम करावयाचे आहे.

वरिष्ठ न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून ज्याची नेमणूक व्हावयाची आहे तो भारताचा प्रजाजन तर असलाच पाहिजे पण शिवाय त्याने पाच वर्षे हायकोर्टाचा जज्ज म्हणून काम केलेले असले पाहिजे किंवा दहा वर्षे हायकोर्टाचा वकील म्हणून त्याने काम केलेले असले पाहिजे किंवा राष्ट्राध्यक्षांच्या मताने तो मोठा कायदे पंडित असला पाहिजे.

न्यायाधीशाला आपल्या जागेचा राजीनामा देता येतो.

न्यायाधीशाला नालायकीबद्दल किंवा दुष्कृत्याबद्दल अधिकारावरून काढून टाकिता येते पण त्यासाठी विधिमंडळानी दोन तृतीयांश बहुमताने तसा ठराव करून तो राष्ट्राध्यक्षांचेकडे पाठविला पाहिजे. असा ठराव करून पाठविण्याचे पूर्वी न्यायाधीशाच्या नालायकीची अथवा अपकृत्याची चौकशी कशी करावी हे कायद्याने ठरविण्याचा अधिकार विधिमंडळाना आहे.

न्यायाधीशानी अधिकार ग्रहणापूर्वी राष्ट्राध्यक्ष अथवा त्यानी नियुक्त केलेल्या इसमासमोर घटना कायदा पाळण्याची व कोणाचीही भीति भीड अथवा मुर्वत न बाळगता पूर्णपणे निःपक्षपाती राहून न्यायदानाचे कर्तव्य करीन अशी शपथ घ्यावयाची आहे.

एकदा वरिष्ठ न्यायालयात ज्यानी न्यायाधीश म्हणून काम केले आहे त्याने पुन्हा कोणत्याही कोर्टात वकिली करिता कामा नये.१२४ वरिष्ठ न्यायालयातील सर न्यायाधीशाला दरमहा ५,००० रुपये पगार मिळेल आणि इतर न्यायाधीशाना दरमहा ४,००० रुपये पगार मिळेल. रजा पेन्शन वगैरे बाबतीत त्याना जे नियम लागू करण्यात यावयाचे आहेत ते फेडरल कोर्टाच्या न्यायाधीशांचे बाबतीत सध्या लागू असणारे नियम. भत्ते व इतर सवलती यांचे बाबतीत विधिमंडळानी कायदे करून ते निश्चित करीपर्यंत राष्ट्राध्यक्ष ठरवितील त्याप्रमाणे व्यवस्था व्हावयाची आहे. पण

न्यायाधीशाची नेमणूक एकदा झाली म्हणजे तो नोकरीवर आहे तोपर्यंत त्या सवलतीत कमी काहीही करिता यावयाचे नाही. १२५

सरन्यायाधीशाची जागा काही कारणाने रिकामी पडली असली अथवा ते काम करू शकत नसले तर वरिष्ठ न्यायालयाच्या इतर न्यायाधीशांपैकी ज्याना राष्ट्राध्यक्ष ते काम सांगतील त्यानी सरन्यायाधीश म्हणून त्या मुदतीत काम पाहावयाचे आहे.१२६

वरिष्ठ न्यायालयाची बैठक भरविण्यास एखादा न्यायाधीश जर कमी पडत असेल तर राष्ट्राध्यक्षांची अगाऊ परवानगी घेऊन घटक राष्ट्रातील हायकोर्टातील एखाद्या योग्य न्यायाधीशाला कामासाठी तात्पुरते बोलविण्याचा वरिष्ठ न्यायालयाच्या सरन्यायाधीशाना अधिकार आहे. पण अशा रीतीने एखाद्या हायकोर्टातील न्यायाधीशाना पाचारण करण्यापूर्वी त्यानी त्या हायकोर्टाच्या मुख्य न्यायाधीशांशी विचारविनिमय केला पाहिजे.१२७

वरिष्ठ न्यायालयात अथवा फेडरल कोर्टात पूर्वी काम केलेल्या एखाद्या न्यायाधीशाला राष्ट्राध्यक्षांचे संमतीने न्यायालयावर काम करण्यास बोलाविण्याचा सरन्यायाधीशाना अधिकार आहे परंतु एखाद्या व्यक्तीच्या मर्जीविरुद्ध मात्र तिला वरिष्ठ न्यायालयावर काम करण्यास भाग पाडिता येत नाही. १२८

न्यायालयाना नेहमी असणारे सर्व अधिकार वरिष्ठ न्यायालयाला असून स्वतःची बेअदबी झाल्यास त्या बेअदबीबद्दल शिक्षा करण्याचे अधिकार आहेत.१२९ वरिष्ठ न्यायालयाचे काम दिल्लीला किंवा राष्ट्राध्यक्षांशी बोलणी करून सरन्यायाधीश ठरवितील त्या ठिकाणी चालावयाचे आहे.१३०

संघराज्य आणि घटक राज्ये त्याचप्रमाणे घटक राज्यांचे आपआपसातील तंटे हे निर्णयासाठी वरिष्ठ न्यायालयाखेरीज दुसऱ्या कोणीकडेही नेता येणार नाहीत, पण हा तंटा कायदेशीर हक्काबद्दलचा असला पाहिजे. मात्र हा अधिकार हैद्राबाद, जम्मू व काश्मीर, मध्यभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानांचा संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर-कोचीन, आणि विंध्यप्रदेश या घटक राज्यांचा ज्यात संबंध आहे आणि ज्यामध्ये या घटकांशी केलेला तह, करार वगैरेचा किंवा त्याना दिलेल्या सनदांचा अर्थ लावण्याचा ज्यात प्रश्न येतो अशा तंट्यांचे बद्दल वरिष्ठ न्यायालयाला चालविता येणार नाही.

दुसऱ्या कोणत्याही घटक राज्याशी झालेल्या तह, करार, सनद वगैरेच्या अर्थाचा प्रश्न निघत असेल आणि अशा तह, करार इत्यादीमध्ये हे तंटे वरिष्ठ न्यायालयापुढे नेण्यात येणार नाहीत अशी जर अट असेल तर वरिष्ठ न्यायालयाला या तंट्यांचा निर्णय करण्याचा अधिकार असणार नाही.१३१

घटना कायद्याच्या कलमांचा अर्थ लावण्याचा प्रश्न जर एखाद्या खटल्यात उपस्थित झालेला असला आणि तो तसा उपस्थित झाला आहे याबद्दल हायकोर्टाने जर सर्टिफिकेट दिले तर हायकोर्टाच्या निर्णयाचे विरुद्ध वरिष्ठ न्यायालयाकडे अपील होऊ शकते.

अशा तऱ्हेचे सर्टिफिकेट हायकोर्टाने नाकारले असताना जर वरिष्ठ न्यायालयास असे वाटले की एखाद्या खटल्यात घटना कायद्याच्या अर्थाचा प्रश्न उपस्थित होतो तर वरिष्ठ न्यायालय हायकोर्टाच्या निकालाविरुद्ध अपील घेऊ शकते.१३२

सामान्यतः वीस हजार रुपये अथवा संघराज्याच्या विधिमंडळाने ठरविलेल्या दुसऱ्या रकमेच्या वरच्या दिवाणी दाव्यात हायकोर्टाच्या निकालाविरुद्ध वरिष्ठ न्यायालयाकडे अपील करिता येईल अथवा अपीलाला योग्य असा दावा आहे असे जर हायकोर्टाने सर्टिफिकेट दिले तर अशा दाव्याच्या निकालाविरुद्ध सुद्धा वरिष्ठ न्यायालयाकडे अपील करिता येईल. पण वीस हजारावरच्या प्रत्येक दाव्यात अपील करिता येईलच असे मात्र नाही; वीस हजारावरच्या ज्या दाव्यात काही तरी महत्वाचा कायद्याचा मुद्दा निघत असेल अशाच दाव्यात अपील करिता येईल. संघराज्याच्या विधिमंडळाने जोपर्यंत कायदा करून तशी सवलत दिली नाही तोपर्यंत हायकोर्टाच्या एका न्यायाधीशाने दिलेल्या निकालाविरुद्ध वरिष्ठ न्यायालयाकडे अपील करिता येणार नाही.१३३

एखाद्या खालच्या कोर्टाकडून खटला काढून स्वतःपुढे घेऊन जर हायकोर्टाने एखाद्याला फाशीची शिक्षा दिली असेल किंवा खालच्या कोर्टाने निर्दोष म्हणून सोडून दिले असता तो निकाल फिरवून जर हायकोर्टाने एखाद्याला फाशीची शिक्षा सुनाविली असेल तर अशा निकालाविरुद्ध वरिष्ठ न्यायालयापुढे अपील करिता येते. एखादा फौजदारी खटला अपीलास योग्य आहे असे वाटून जर हायकोर्टाने तसे सर्टिफिकेट दिले तर हायकोर्टाच्या निकालाविरुद्ध अपील होऊ शकते. हायकोर्टाच्या फौजदारी निकालाविरुद्ध आणखी कोणत्या परिस्थितीत वरिष्ठ न्यायालयाकडे अपील करण्याचा अधिकार असावा हे कायदा करून ठरविण्याचा अधिकार संघराज्याच्या

विधिमंडळास आहे.१३४ याशिवाय आणखी सध्या फेडरल कोर्टाला जी जी कामे करण्याचे अधिकार आहेत ते ते सर्व अधिकार वरिष्ठ न्यायालयास राहतील पण हे अधिकार संघराज्याची विधिमंडळे कायदे करून मर्यादित करू शकतील.१३५

लष्करी कोर्टाच्या निकालाखेरीज बाकी कोणत्याही कोर्टाच्या अथवा ट्रायब्यूनल (खास चौकशीसाठी नेमिलेले मंडळ) च्या निकालाविरुद्ध तसे करणे योग्य वाटल्यास वरिष्ठ न्यायालय अपील ऐकू शकेल.१३६

स्वतः दिलेल्या निर्णयात योग्य वाटल्यास दुरुस्ती करण्याचा वरिष्ठ न्यायालयास अधिकार आहे.१३७ संघराज्याच्या विधिमंडळानी कायदे करून निर्णय करण्याचा अधिकार दिला तर वरिष्ठ न्यायालय हे संघराज्य ज्या गोष्टींच्याबद्दल कायदे करू शकते त्या गोष्टींच्याबद्दल निर्णय देऊ शकते. अशा तऱ्हेचे अधिकार जर वरिष्ठ न्यायालयाला मिळाले असले तर भारत सरकार आणि घटक राज्याचे सरकार आपसात करार करून दुसऱ्या बाबींचा निर्णय करण्याचे अधिकार सुद्धा या न्यायालयाला देऊ शकतात.१३८

व्यक्तीच्या मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी ज्या तऱ्हेची आज्ञापत्रके वगैरे काढण्याचे हक्क वरिष्ठ न्यायालयाला या घटनेने मिळालेले आहेत तशाच स्वरूपाचे हक्क इतर गोष्टींच्या बाबतीत संघराज्याची विधिमंडळे कायदे करून वरिष्ठ न्यायालयाला देऊ शकतात.१३९

न्याय करण्यासाठी वरिष्ठ न्यायालयाला आणखी कसल्या प्रकारचे अधिकार देणे योग्य आहे असे जर संघराज्याच्या विधिमंडळाना वाटले तर ती कायदे करून घटना कायद्याशी विसंगत न होणारे असे अधिकार वरिष्ठ न्यायालयाला देऊ शकतात.१४०

भारतातील सर्व कोर्टांनी वरिष्ठ न्यायालयाने लाविलेला कायद्याचा अर्थ प्रमाणभूत मानिला पाहिजे.१४१ पूर्णपणे न्याय करण्याच्या दृष्टीने इष्ट वाटतील त्या सर्व प्रकारचे हुकूम काढण्याचा अधिकार वरिष्ठ न्यायालयाला आहे आणि या हुकमांची अंमलबजावणी कशी करावयाची हे कायदे करून संघराज्याच्या विधिमंडळानी ठरवीपर्यंत त्यांची अंमलबजावणी कशी व्हावी हे राष्ट्राध्यक्ष ठरवितील.

कागदपत्र किंवा व्यक्ति आपल्यापुढे हजर करण्यासाठी किंवा आपली बेअदबी झाल्यास तिच्याबद्दल शिक्षा करण्यासाठी वरिष्ठ न्यायालयाने काढिलेल्या हुकमांचा अंमल भारतातील सर्व ठिकाणी चालेल.१४२

एखादा कायद्याचा किंवा दुसरा कसला महत्त्वाचा प्रश्न निघाला, आणि या प्रश्नाबाबत वरिष्ठ न्यायालयाचा सल्ला घेणे इष्ट आहे असे राष्ट्राध्यक्षाना वाटले तर ते तो प्रश्न वरिष्ठ न्यायालयाकडे सोपवू शकतात. अशातऱ्हेने सोपविल्या गेलेल्या प्रश्नाबद्दल योग्य वाटेल ती चौकशी करून न्यायालयाने आपले मत राष्ट्राध्यक्षाना कळवावे. हैद्राबाद, मध्यभारत वगैरे ज्या घटक राज्यांच्या तंटयाच्या बाबतीत निर्णय करण्याचा घटना कायद्याप्रमाणे वरिष्ठ न्यायालयाला अधिकार नाही असे तंटे सुद्धा जर राष्ट्राध्यक्षानी या न्यायालयाकडे सोपविले तर त्यांचे बाबतीत योग्य वाटेल ती चौकशी करून या न्यायालयाने राष्ट्राध्यक्षाना आपले मत कळवावे.१४३

भारतातील सर्व बिनलष्करी अधिकाऱ्यानी व न्यायविभागातील अधिकाऱ्यानी वरिष्ठ न्यायालयाशी सहकार्य करावयाचे आहे.१४४

आपल्यापुढे कोणत्या वकिलानी कामे करावीत, अपीलांचे काम कशा तऱ्हेने चालविण्यात यावे, मूलभत हक्कांच्या रक्षणासाठी दाद मागण्यास आलेल्या लोकांची कामे कशी चालावीत, आपण दिलेल्या निकालात दुरुस्त्या केव्हा आणि कशा तऱ्हेने कराव्यात, जामिनावार लोकाना कसे सोडण्यात यावे, कोर्टातील कामाच्या तहकुबीचे हुकूम केव्हा देण्यात यावेत, खोडसाळपणाने केलेल्या अपीलांचा तडकाफडकी निकाल कसा लाविला जावा इत्यादि गोष्टींचे बद्दल वरिष्ठ न्यायालयाने राष्ट्राध्यक्षांच्या संमतीने आणि संघराज्याच्या विधिमंडळानी कायदे करून घालून दिलेल्या पद्धतीने नियम करावेत.

घटना कायद्याच्या अर्थाबद्दल महत्त्वाचा प्रश्न निघालाअसला तर त्याच्या निर्णयासाठी व राष्ट्राध्यक्षानी मत मागितले असेल तर अशा प्रश्नाच्या चौकशीसाठी वरिष्ठ न्यायालयाच्या कमीत कमी पाच न्यायाधीशानी एकत्र बसून खल करावयाचा आहे. बाकीची कामे उरकण्यासाठी किती न्यायाधीशानी एकत्र बसून काम करावयाचे का एकएकट्या न्यायाधीशानी कामे करावयाची हे न्यायालयाने वर दिल्याप्रमाणे नियम करून ठरवावयाचे आहे.

वरिष्ठ न्यायालयाचा निकाल वा मत हे नेहमी हजर असलेल्या बहुसंख्य न्यायाधीशांच्या संमतीने दिले जाईल पण हा निकाल एखाद्या न्यायाधीशास जर संमत नसेल तर त्यानी आपले वेगळे निकालपत्रक लिहावयास हरकत नाहीं.१४५

वरिष्ठ न्यायालयाच्या सर्व अधिकाऱ्यांच्या नेमणुका सरन्यायाधीशानी स्वतः किंवा त्यानी या कामासाठी नियुक्त केलेल्या न्यायाधीशानी किंवा कोर्टाच्या अधिकाऱ्यानी

स्वतः करावयाच्या आहेत. नव्या नेमणुका संघराज्याच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनला विचारल्याशिवाय करण्यात येऊ नयेत असा नियम घालून देण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षाना आहे.

वरिष्ठ न्यायालयाच्या नोकरांच्या नोकरी वगैरेच्या अटी कशा असाव्यात हे संघराज्याच्या विधिमंडळानी घालून दिलेल्या पद्धतीप्रमाणे सरन्यायाधीशानी अथवा त्यानी नियुक्त केलेल्या दुसऱ्या न्यायाधीशानी नियम करून ठरवावयाचे आहे.

पगार, भत्ते, रजा, पेन्शन्स वगैरे संबंधीच्या बिलाना मात्र राष्ट्राध्यक्षाची मान्यता पाहिजे. १४६

प्रकरण ९ वे

मुख्य हिशेब-तपासनीस

अखिल भारतासाठी राष्ट्राध्यक्ष एक मुख्य हिशेब-तपासनीस नेमितील आणि याना नोकरीवरून काढावयाचे झाले तर जी पद्धति वरिष्ठ न्यायालयातील न्यायाधीशाला काढून टाकिण्यासाठी अवलंबिली जाते आणि ज्या कारणास्तव त्याना काढून टाकिता येते त्याच पद्धतीचा अवलंब करावयास पाहिजे आणि तीच कारणे अस्तित्वात असली पाहिजेत.

मुख्य हिशेब-तपासनीसानी अधिकारग्रहण करण्यापूर्वी राष्ट्राध्यक्षाचे देखत अथवा त्यानी या कामासाठी नियुक्त केलेल्या इसमाचे देखत भारताच्या घटनेशी एकनिष्ठ राहून पूर्णतः निःपक्षपातीपणाने आपली कर्तव्ये पार पाडण्याची शपथ घ्यावयाची आहे.

संघराज्याच्या विधिमंडळानी त्यात बदल करीपर्यंत मुख्य हिशेब तपासनीसाना पगार दरमहा चार हजार रुपये मिळेल आणि त्यांच्या नोकरीच्या अटी भत्ते रजा वगैरे सर्व अटी घटना सुरू होण्यापूर्वी ऑडिटर जनरल याना ज्या लागू होत्या त्याच राहणार आहेत.

एकदा मुख्य हिशेब तपासनीसांची नेमणूक झाली म्हणजे ते नोकरीवर असेपर्यंत त्यांचा पगार कमी करिता येणार नाही व त्याना मिळत असलेल्या सवलती पण कमी करिता येणार नाहीत.

एकदा ज्यानी मुख्य हिशेब-तपासनीसाचे काम केलेले आहे त्याना पुनश्च केव्हाही संघराज्यात अथवा घटकराज्यात सरकारी नोकरी करिता यावयाची नाही.

मुख्य हिशेब-तपासनीसाचा सल्ला घेऊन राष्ट्राध्यक्ष या घटनेच्या व संघराज्याच्या विधिमंडळानी केलेल्या कायद्यांच्या अनुसार हिशेब तपासण्याच्या खात्यातील अधिकाऱ्यांच्या नोकरीच्या अटी त्यांची कर्तव्ये वगैरे संबंधीचे नियम करतील. १४८

संघराज्याच्या विधिमंडळानी कायदे करून त्या बाबतीत योजना करीपर्यंत सध्या भारत सरकार व प्रांतिक सरकार यांच्या बाबतीत ऑडिटर जनरल ऑफ इंडिया जी कर्तव्ये करितात आणि अधिकार बजावितात तीच कर्तव्ये संघराज्य व घटकराज्ये यांचे बाबतीत मुख्य हिशेब-तपासनीसानी बजावावयाची आहेत आणि तेच अधिकार यानी चालवावयाचे आहेत. १४९

राष्ट्राध्यक्षांच्या अनुमतीने मुख्य हिशेब-तपासनीस जी पद्धति घालून देतील त्या पद्धतीने संघराज्याचे आणि घटकराज्यांचे हिशेब ठेवण्यात आले पाहिजेत. १५०

मुख्य हिशेब-तपासनीसानी संघराज्याच्या जमाखर्चासंबंधाने केलेला रिपोर्ट राष्ट्राध्यक्षाचे पुढे जावयाचा आहे आणि ते तो रिपोर्ट संघराज्याच्या प्रत्येक विधिमंडळापुढे ठेवितील. घटक राज्याच्या जमाखर्चाबद्दल मुख्य हिशेब-तपासनीस जो रिपोर्ट करितील तो प्रथम त्या घटक राज्याचे गव्हर्नर अथवा राजप्रमुख यांचेकडे जाणार आणि तो ते घटक राज्याच्या विधिमंडळापुढे ठेविणार अशी योजना आहे. १५१

भाग ६ वा व ७ वा

घटक राज्ये

घटक राज्यापैकी आसाम, बिहार, मुंबई, मध्यप्रदेश, मद्रास, ओरिसा, पंजाब, युक्त-प्रांत (उत्तर प्रदेश) आणि पश्चिम बंगाल आणि हैद्राबाद, जम्मू व काश्मीर (याबाबतचे अपवाद पुढे येतील), मध्य भारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानांचा संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर–कोचीन, आणि विंध्यप्रदेश यांच्या राज्यघटनांची माहिती या दोन भागात आली आहे. हैद्राबाद ते विंध्य प्रदेश या यादीतील घटक राज्यांच्याबद्दल ज्या बाबतीत फरक आहेत त्यांचा उल्लेख पुढे येईल. १५२ २३८

आसाम, बिहार, मुंबई, मध्यप्रदेश, मद्रास, ओरिसा, पंजाब, युक्तप्रांत (उत्तर प्रदेश) व पश्चिम बंगाल या घटकांना प्रत्येकी एक गव्हर्नर असणार आणि हैद्राबाद, जम्मू काश्मीर, मध्यभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर, विंध्यप्रदेश या घटकाना प्रत्येकी एक राजप्रमुख असणार. घटकराज्यांचा कारभार गव्हर्नर

व राजप्रमुख यानी या घटना कायद्याप्रमाणे स्वतः किंवा हाताखालच्या अधिकाऱ्यांच्या मार्फत करावयाचा आहे. संघराज्याची विधिमंडळे व घटक राज्यांची विधिमंडळे कायदे करून गव्हर्नरच्या अथवा राजप्रमुखाच्या हाताखालच्या लोकाना अधिकार देऊ शकतात.१५४

आसाम, बिहार, मुंबई, मध्यप्रदेश, मद्रास, ओरिसा, युक्तप्रांत (उत्तर प्रदेश) व विंध्यप्रदेश या घटकांच्यासाठी राष्ट्राध्यक्षानी एकएका गव्हर्नराची नेमणूक करावयाची आहे.१५५ गव्हर्नरांच्या अधिकाराची मुदत पाच वर्षांची असणार पण राष्ट्राध्यक्षाना वाटल्यास ते मुदत संपण्यापूर्वी त्याना कामावरून काढू शकतील.१५६ गव्हर्नराना राजीनामा द्यावयाचा झाल्यास तो त्यानी राष्ट्राध्यक्षांचेकडे पाठवावा लागतो. वयाची ३५ वर्षे पूर्ण झालेल्या भारताच्या नागरिकालाच गव्हर्नर होता येते.१५७

गव्हर्नर अथवा राजप्रमुख हे संघराज्याच्या अथवा घटकराज्याच्या विधिमंडळाचे सदस्य राहू शकत नाहीत. गव्हर्नरानी अथवा राजप्रमुखानी कोणतीही पगारी नोकरी स्वीकारता कामा नये. संघराज्याच्या विधिमंडळानी कायदा करून वेगळी योजना करीपर्यंत गव्हर्नर्सना दरमहा साडेपाच हजार रुपये पगार मिळणार आहे आणि घटना अमलात येण्यापूर्वी प्रांताच्या गव्हर्नर्सना भत्ते व इतर खर्च व सवलती ज्या मिळत होत्या त्याच मिळणार. राजप्रमुखाना पगार मिळण्याची योजना नाही (त्या योजना त्यांच्या संस्थानाशी झालेला करार तह वगैरेमध्ये येणार) पण बाकीच्या सवलती वगैरे गव्हनर्स प्रमाणेच त्याना मिळणार. व त्या ते राजप्रमुख आहेत त्या मुदती-पर्यंत कमी करिता येणार नाहीत. गव्हर्नरांची नेमणूक एकदा झाली म्हणजे ते कामा-वर आहेत तोपर्यंत त्याना मिळणाऱ्या सवलती भत्ते वगैरे कमी करिता येणार नाहीत.१५८

गव्हर्नरानी व राजप्रमुखानी अधिकारग्रहण करण्याचे पूर्वी हायकोर्टाच्या मुख्य न्यायाधीशाचे अथवा राष्ट्राध्यक्षानी या कामासाठी नियुक्त केलेल्या व्यक्तीचे समोर घटना कायद्याशी एकनिष्ठ राहून व आपले कर्तव्य योग्य रीतीने पाळून लोककल्याणा-साठी झटण्याची शपथ घ्यावयाची आहे.१५९

अडचणीच्या प्रसंगी गव्हर्नर अथवा राजप्रमुख यांची कामे कोणी पहावयाची हे राष्ट्राध्यक्षानी ठरवावयाचे आहे.१६० गव्हर्नर व राजप्रमुख याना शिक्षांची माफी अथवा तहकुबी देण्याचे त्याचप्रमाणे शिक्षा कमी करण्याचे अधिकार आहेत. १६१

ज्या बाबतीत कायदे करण्याचे अधिकार घटकराज्याचे विधिमंडळाना आहेत

त्या बाबतीत घटकराज्यांचे सरकाराना राज्यकारभाराचे अधिकार पूर्ण आहेत आणि ज्या बाबतीत घटकराज्यांचे विधिमंडळांचे जोडाने संघराज्याचे विधिमंडळाना कायदे करण्याचे अधिकार आहेत त्याबाबतीत त्यांचे अधिकार घटना कायद्याने व संघ-राज्याच्या विधिमंडळानी केलेल्या कायद्यानी नियंत्रित केले जातील.१६२

प्रधानमंडळ

ज्या बाबतीत गव्हर्नरनी अथवा राजप्रमुखानी व्यक्तिशः निर्णय घ्यावयाचा आहे असे घटना कायद्याने ठरविले आहे त्या बाबी वगळून बाकीचा राज्यकारभार त्यानी प्रधानमंडळाच्या सल्ल्याने करावयाचा आहे. पंतप्रधान हे प्रधानमंडळाचे मुख्य राहतील. प्रधानानी गव्हर्नरला अथवा राजप्रमुखाला काय सल्ला दिला या प्रश्नाची चर्चा कोणत्याही कोर्टात करिता येणार नाही त्याचप्रमाणे ज्या गोष्टी गव्हनर व राजप्रमुख यानी स्वतःच्या मताने करावयाच्या आहेत त्या अशा का केल्या आणि तशा का केल्या नाहीत असेही कोणी त्याना विचारू शकणार नाही.१६३

मुख्य प्रधानाची नेमणूक गव्हनरानी व राजप्रमुखानी स्वतःच्या मताने करावयाची आहे आणि बाकीचे प्रधान त्यांच्या सल्ल्याने नेमावयाचे आहेत. प्रधानमंडळाचे अस्तित्व गव्हर्नर व राजप्रमुख यांच्या मर्जीवर अवलंबून आहे. बिहार, मध्यप्रदेश ओरिसा आणि मध्य भारत या घटक राज्यात मागासलेल्या जाती आणि टोळयांचे हित-संबंधाचे रक्षण वगैरे कामे पाहण्यासाठी एक स्वतंत्र प्रधान असला पाहिजे. प्रधान मंडळ हे सामुदायिकरीत्या घटक राज्यातील कनिष्ठ विधिमंडळास (ज्या घटकात दोन विधिमंडळे असतील त्या ठिकाणी) जबाबदार राहणार. अधिकारग्रहणाचे पूर्वी गव्हर्नर अथवा राजप्रमुख यांचे देखत प्रधानानी घटना कायद्याशी एकनिष्ठ राहून पूर्णपणे निःपक्षपाती रीतीने व न्यायबुद्धीने आपली कर्तव्ये पार पाडीन अशी शपथ घ्यावयाची आहे. विधिमंडळाचा सदस्य नसलेल्याला सहा महिन्यापेक्षा जास्त प्रधान म्हणून राहता येत नाही. घटकांच्या विधिमंडळानी कायदे करून ठरवीपर्यंत प्रधानाना जो पगार भत्ते सवलती वगैरे मिळावयाच्या त्या घटना अमलात येण्याचे वेळी ज्या मिळत होत्या त्याच असणार. १६४

कायदेशीर सल्लागार

हायकोर्टाचा न्यायाधीश होण्यास योग्य असलेल्या इसमाची नेमणूक गव्हर्नर अथवा राजप्रमुख आपले कायदेशीर सल्लागार (Advocate General) म्हणून

करितील. गव्हर्नरानी अथवा राजप्रमुखानी सांगितलेली सरकारची कायद्याची कामे त्याचप्रमाणे घटना कायद्याने व इतर कायद्यानी त्यांचेकडे सोपविलेली कामे त्यानी करावयाची आहेत. गव्हर्नर अथवा राजप्रमुख यानी त्यांच्या कामाची मुदत पगार भत्ते इत्यादि गोष्टी ठरवावयाच्या आहेत. १६५

राज्यकारभाराची पद्धति.

घटक राज्याचा सर्व कारभार गव्हर्नर अथवा राजप्रमुख यांच्या नावाने चालविला जावयाचा आहे. आज्ञापत्रके वगैरे गव्हर्नरनी अथवा राजप्रमुखानीच काढिली आहेत हे दर्शविण्यासाठी त्यावर चिन्हे वगैरे कशा तऱ्हेची असावीत हे गव्हर्नरानीच ठरवावयाचे आहे आणि अशा तऱ्हेच्या खुणा त्यावर असल्या म्हणजे मग ते आज्ञापत्रक खरोखरीच गव्हर्नरने अथवा राजप्रमुखाने काढिले का नाही असले प्रश्न कोणाला उपस्थित करिता येणार नाहीत. ज्या बाबतीत घटना कायद्याखाली त्यानी स्वतःच निर्णय घेतला पाहिजे असे ठरविले नसेल त्या सर्व राज्यकारभाराच्या बाबतीत कामाची विभागणी कशी व्हावी कोणत्या प्रधानाने कोणती कामे करावीत इत्यादि गोष्टींचे बद्दलचे नियम त्यानी करावयाचे आहेत. १६६

राज्यकारभारासंबंधी घेतलेले निर्णय व जे कायदे करावयाचे त्यासंबंधीच्या योजना यांची माहिती वेळोवेळी गव्हर्नर व राजप्रमुख याना देणे हे मुख्य प्रधानांचे कर्तव्य आहे, त्याचप्रमाणे याबद्दलच गव्हर्नर अथवा राजप्रमुख यानी आणखी माहिती मागितली तरी ती सुद्धा त्याना पुरवणे हे त्यांचे कर्तव्य आहे. एखाद्या प्रधानाने व्यक्तिशः घेतलेला निर्णय हा सर्व प्रधानांचेपुढे विचारासाठी ठेविला पाहिजे असे जर गव्हर्नर अथवा राजप्रमुख यांचे मत असले तर त्याप्रमाणे पुढील व्यवस्था मुख्य प्रधानानी करावयाची आहे. १६७

प्रकरण ३ रे

घटक राज्यातील विधिमंडळे.

बिहार, मुंबई, मद्रास, पंजाब, युक्तप्रांत (उत्तर प्रदेश) आणि पश्चिम बंगाल व म्हैसूर या घटक राज्यांना दोन विधिमंडळे असणार व बाकीच्या घटकाना एक विधिमंडळ असणार. ज्या ठिकाणी दोन विधिमंडळे आहेत तेथे एकाचे नाव Legislative Council व दुसऱ्याचे नाव Legislative Assembly असे राहील व ज्या ठिकाणी एकच

विधिमंडळ आहे त्या ठिकाणी त्याचे नाव Legislative Assembly असे राहील. १६८

एखाद्या घटकराज्यातील कनिष्ठ विधिमंडळाने (Legislative Assembly ने) $\frac{2}{3}$ बहुमताने ठराव करून त्या घटकातील अस्तित्वात असलेले वरिष्ठ विधिमंडळ (Legislative Council) रद्द करावे अथवा ज्या घटकराज्यात वरिष्ठ विधिमंडळ अस्तित्वात नाही त्या घटकराज्यासाठी नवीन वरिष्ठ विधिमंडळ निर्माण करावे असे जर सुचविले तर संघराज्याच्या विधिमंडळाना कायदा करून असलेले वरिष्ठ विधिमंडळ रद्द करण्याचा किंवा ज्या ठिकाणी वरिष्ठ विधिमंडळ नाही त्या ठिकाणी ते नवीन निर्माण करण्याचा अधिकार आहे. जुने वरिष्ठ मंडळ रद्द करण्यामुळे अथवा नवे निर्माण केल्यामुळे घटना कायद्यात जे जे बदल करावे लागतील ते ते करण्याचा अधिकार संघराज्याच्या विधिमंडळाना आहे. घटना कायद्यात दुरुस्ती करण्यासाठी ज्या विशिष्ट तंत्राचा अवलंब एरवी करावा लागला असता तो या ठिकाणी करण्याचे कारण नाही. ज्या कायद्याने जुने वरिष्ठ विधिमंडळ रद्द होणार अथवा नवे निर्माण होणार त्याच कायद्यात या योजना समाविष्ट केल्या जातील. १६९

प्रत्येक घटक राज्यातील कनिष्ठ विधिमंडळाच्या सदस्यांची प्रत्यक्ष निवडणूक होईल पण एखाद्या घटकातील कनिष्ठ विधिमंडळात अँग्लो इंडियन जमातीचे सदस्य असावयास पाहिजेत असे गव्हर्नरला किंवा राजप्रमुखाला वाटले आणि त्यांच्या मताने पुरेसे प्रतिनिधि जर नसले तर त्याना योग्य वाटतील तेवढे त्या जमातीचे प्रतिनिधि ते कनिष्ठ विधिमंडळात नेमू शकतील. ३३३

सर्वसाधारणतः पाऊण लक्ष लोकसंख्येला एक प्रतिनिधि असावा अशी योजना आहे. याला अपवाद आसामचे स्वायत्त जिल्हे आणि शिलाँगचा म्युनिसिपल व लष्कर भाग. कनिष्ठ विधिमंडळात कमीत कमी साठ प्रतिनिधि असले पाहिजेत आणि जास्तीत जास्त म्हणजे पाचशे प्रतिनिधि असू शकतील. मतदारसंघातील लोकसंख्या आणि त्या मतदारसंघामार्फत निवडून येणारे प्रतिनिधि यांचे प्रमाण एका घटक राज्यापुरते सगळीकडे शक्य तितके सारखेच असले पाहिजे.

प्रत्येक शिरगणतीनंतर प्रादेशिक विभागातर्फे निवडून येणाऱ्या प्रतिनिधींच्या संख्येत योग्य त्या प्रमाणात फेरबदल करण्याचे काम कोणी व कसे करावयाचे आहे हे संघराज्याची विधिमंडळे कायदे करून ठरवितील पण असे करण्याने जो बदल

व्हावयाचा तो कनिष्ठ विधिमंडळाच्या नव्या निवडणुकीचे वेळीच व्हावयाचा आहे.१७०

ज्या घटक राज्याना दोन विधिमंडळे आहेत त्यातील वरिष्ठ विधिमंडळाच्या (Legislative Council) सदस्यांची संख्या कनिष्ठ विधिमंडळाच्या संख्येच्या पावपटीपेक्षा जास्त असणार नाही पण वरिष्ठ विधिमंडळात कमीत कमी ४० सभासद हे असलेच पाहिजेत.

संघराज्याच्या विधिमंडळानी कायदा करून त्यात बदल करीपर्यंत घटक राज्याच्या वरिष्ठ विधिमंडळाच्या सदस्यांपैकी साधारणतः एक तृतीयांश सभासद म्युनिसिपालिट्यांचे सभासद जिल्हा लोकलबोर्डाचे आणि संघराज्याच्या विधिमंडळानी निर्दिष्ट केलेल्या स्थानिक संस्थांचे सभासद इत्यादीनी निवडून द्यावयाचे आहेत; साधारणपणे एक द्वादशांश प्रतिनिधि हे त्या घटक राज्यात कमीत कमी तीन वर्षे निवास करणाऱ्या व युनिव्हर्सिटीच्या ग्रॅज्युएटनी अथवा तत्सम शैक्षणिक पदवी असलेल्यानी निवडून द्यावयाचे आहेत; साधारणपणे एक द्वादशांश प्रतिनिधि हे त्या घटक राज्यातील दुय्यम शाळा व त्याच्या वरच्या शिक्षण संस्थातील शिक्षणाचे काम कमीत कमी तीन वर्षे ज्यानी केले आहे त्यानी निवडून द्यावयाचे आहेत; सुमारे $\frac{1}{3}$ हे त्या घटक राज्यातील कनिष्ठ विधिमंडळातील सभासदानी निवडून द्यावयाचे आहेत पण त्याना आपल्यातलेच लोक मात्र निवडून देता यावयाचे नाहीत, कनिष्ठ विधिमंडळाचे सदस्य नसलेल्याना त्यानी निवडून द्यावयाचे आहे. आणि बाकीचे सभासद हे त्यांच्या वाङ्मय, शास्त्रे, कला, सहकारी चळवळीची कार्ये आणि समाजकार्य इत्यादीतील पारंगततेसाठी गव्हर्नर अथवा राजप्रमुख यानी नेमावयाचे आहेत.१७१

कनिष्ठ विधिमंडळाची मुदत पाच वर्षांपेक्षा जास्त असू शकत नाही पण ही पुरी होण्याचे आत ते बरखास्त करिता येते. आणीबाणीची परिस्थिति जाहीर झालेली असली तर मात्र संघराज्याची विधिमंडळे कायदा करून पाच वर्षांची मुदत वाढवू शकतात पण एका वेळी ही वाढ एक वर्षापेक्षा जास्त करिता येत नाही आणि आणीबाणीची परिस्थिति संपल्यानंतर ही वाढलेली मुदत जास्तीत जास्त सहा महिने टिकू शकते.

घटकराज्यातील वरिष्ठ विधिमंडळ हे संपूर्णपणे बरखास्त असे केव्हाच करिता येत नाही पण संघराज्याच्या विधिमंडळानी कायदा करून केलेल्या योजनेप्रमाणे दर

दोन वर्षानी विधिमंडळातील $\frac{1}{3}$ प्रतिनिधि कार्यनिवृत्त होतील आणि त्यांच्या जागी नवे निवडून येतील.१७२

घटकराज्यातील विधिमंडळाचा सदस्य हा भारताचा प्रजाजन असून कनिष्ठ विधिमंडळातला सदस्य असला तर त्याचे वय कमीत कमी पंचवीस वर्षांचे असले पाहिजे आणि वरिष्ठ विधिमंडळाचा सदस्य असला तर कमीत कमी तीस वर्षांचा असला पाहिजे. याखेरीज आणखी त्याची लायकी काय असली पाहिजे हे संघ-राज्याच्या विधिमंडळानी कायदे करून ठरवावयाचे आहे.१७३

घटकराज्यातील विधिमंडळांच्या वर्षातून कमीत कमी दोन बैठका झाल्या पाहिजेत आणि दोन बैठकात सहा महिन्यापेक्षा जास्त अंतर पडता कामा नये. या व्यतिरिक्त गव्हर्नर अथवा राजप्रमुख केव्हाही कोणत्याही विधिमंडळाची बैठक भरवू शकतात आणि तहकूब ठेवू शकतात. कनिष्ठ विधिमंडळ केव्हाही बरखास्त करण्याचा अधिकार त्याना दिलेला आहे.१७४

गव्हर्नर अथवा राजप्रमुख कनिष्ठ विधिमंडळाला अथवा वरिष्ठ विधिमंडळाला अथवा दोन्ही मंडळाना एकदम आपले भाषण ऐकण्यासाठी पाचारण करू शकतात. विधिमंडळांच्या पुढे असलेल्या बिलासंबंधी अथवा इतर बाबीसंबंधाने संदेश पाठविण्याचा गव्हर्नर अथवा राजप्रमुख याना अधिकार आहे आणि अशा तऱ्हेने त्यांचा संदेश आला तर त्या प्रकरणाचा विधिमंडळानी शक्य तितक्या तातडीने विचार केला पाहिजे.१७५

प्रत्येक बैठकीच्या प्रारंभी गव्हर्नर अथवा राजप्रमुख यानी कनिष्ठ विधिमंडळास आणि ज्या ठिकाणी दोन विधिमंडळे आहेत त्या ठिकाणी दोन्ही विधिमंडळांच्या संयुक्त बैठकीपुढे भाषण करून त्याना पाचारण करण्याचा हेतु सांगितला पाहिजे. या भाषणात ज्या गोष्टींचा उल्लेख येईल त्यांची चर्चा कशी व किती वेळ करावयाची त्याचप्रमाणे विधिमंडळातील कामकाज कोणत्या क्रमाने घेतले जाईल या सर्व बाबी नियमानी नियंत्रित केल्या जातील.१७६

प्रत्येक प्रधान व सरकारचे कायदेशीर सल्लागार (Advocate General) याना विधिमंडळांचे (ज्या ठिकाणी दोन असतील त्या ठिकाणी दोन्ही पुढे) पुढे भाषण करण्याचा व चर्चेत भाग घेण्याचा अधिकार राहील पण ते ज्या विधिमंडळाचे सदस्य नसतील त्यात मत मात्र नोंदवू शकणार नाहीत.१७७

घटक राज्यांच्या विधिमंडळांचे अधिकारी

घटकराज्यांच्या कनिष्ठ विधिमंडळानी शक्य तितक्या लवकर आपल्या पैकी दोघा सभासदाना स्पीकर आणि डेप्युटि स्पीकर म्हणून निवडावयाचे आहे आणि त्यांपैकी कोणाचीही जागा रिकामी पडल्यास पुनश्च निवडणूक करून ती जागा भरून काढावयाची आहे.११७

स्पीकर किंवा डेप्युटि स्पीकर म्हणून निवडणूक झालेल्या व्यक्तीचे काही कारणाने विधिमंडळाचे सभासदत्व गेल्यास त्याची जागा रिकामी होईल त्याच प्रमाणे य व्यक्तीना काम करण्याची इच्छा नसल्यास त्या केव्हाही राजीनामा देऊ शकतात. स्पीकर किंवा डेप्युटि स्पीकर याना जागेवरून काढून टाकावयाचे झाल्यास विधिमंडळाने बहुमताने तसा ठराव पास केला पाहिजे. पण असला ठराव आणावयाचा असल्यास त्याचो १४ दिवस पूर्व सूचना मात्र दिली पाहिजे. विधिमंडळ जर बरखास्त झाले तर नव्या विधिमंडळाची पहिली बैठक भरे पर्यंत स्पीकरनी आपले अधिकारपद सोडावयाचे नसते.१७९

स्पीकर यांची जागा काही कारणाने रिकामी पडली असल्यास त्यांची कर्तव्ये डेप्युटि स्पीकरनी पार पाडावयाची असतात आणि अशा वेळी त्यांचीसुद्धा जागा जर रिकामी असली तर गव्हर्नर अथवा राजप्रमुख यानी त्यासाठी नियुक्त केलेल्या इसमानी ती कामे पार पाडावयाची आहेत.

कनिष्ठ विधिमंडळाच्या एखाद्या बैठकीस काही कारणाने स्पीकर गैरहजर राहिल्यास त्यांच्या जागी डेप्युटि स्पीकरनी काम करावयाचे आहे आणि ते सुद्धा गैरहजर असले तर विधिमंडळाच्या कामकाजाच्या नियमाप्रमाणे ज्याना तो अधिकार प्राप्त होत असेल त्यानी व अशा व्यक्तींचे पैकी वेळेवर कोणीच हजर नसल्यास विधिमंडळ आयत्या वेळी ज्या इसमास निवडताल त्या इसमाने स्पीकरचे त्या वेळापुरते काम करावयाचे आहे.१८०

कनिष्ठ विधिमंडळाच्या ज्या बैठकीत स्पीकर अथवा डेप्युटि स्पीकर याना कामावरून काढून टाकिण्याचा ठराव चर्चिला जात आहे त्या बैठकीत त्याना स्पीकर म्हणून अधिकार चालविता येत नाही. त्यांच्या अनुपस्थितीमध्ये ज्याना ते अधिकार चालविता आले असतील त्यानी त्या वेळी स्पीकर म्हणून काम करावयाचे आहे. ज्या बैठकीत स्पीकरला काढून टाकण्याच्या ठरावावर चर्चा चालू आहे तिच्यात भाषण करण्यास त्याना अधिकार आहे व सामान्य सभासद म्हणून मत देण्याससुद्धा

अधिकार आहे पण दोन्ही पक्षाला सारखी मते पडली असता निर्णायक मत देऊन ठराव पास करावयाचा किंवा नापास करावयाचा हा जो अधिकार स्वीकरला असतो तसाच निर्णायक मत देण्याचा अधिकार मात्र स्वीकरता या वेळी नसतो. १८१

ज्या घटकात वरिष्ठ विधिमंडळ आहे तेथे त्या विधिमंडळाने शक्य तितक्या लवकर आपल्या सदस्यापैकी दोघाना चेअरमन आणि डेप्युटि चेअरमन म्हणून निवडावयाचे आहे आणि त्यापैकी कोणाची जागा रिकामी पडल्यास ती निवडणुकीने भरून काढावयाची आहे. १८२

सदस्य नसलेल्याला चेअरमन अथवा डेप्युटि चेअरमन म्हणून राहता येत नाही या दोघानाही आपल्या अधिकारपदाचा राजीनामा देता येतो. याना जागेवरून काढून टाकावयाचे झाल्यास विधिमंडळाने बहुमताने तसा ठराव करावा लागतो पण १४ दिवसाच्या पूर्वसूचनेवाचून असा ठराव विधिमंडळाला विचारात घेता यावयाचनाही. १८३

चेअरमनची जागा रिकामी असली तर त्यांच्या जागी डेप्युटि चेअरमननी काम करावयाचे आहे आणि त्यांची जागा पण रिकामी असली तर त्यांच्या जागी वरिष्ठ विधिमंडळातील गव्हर्नर अथवा राजप्रमुख यानी निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीने काम करावयाचे आहे.

काही कारणाने एखाद्या बैठकीला चेअरमन गैरहजर असले तर त्यांचे काम डेप्युटि चेअरमननी पाहावयाचे आहे. अशा वेळी डेप्युटि चेअरमन सुद्धा जर हजर नसले तर विधिमंडळाच्या नियमात ज्याने अशा प्रसंगी ते काम करावे असे ठरविले असेल त्याने तो अधिकार चालवावा आणि ऐनवेळी यापैकी कोणीच नसले तर विधिमंडळाने आपल्यापैकीच कोणाला तरी तात्पुरते चेअरमन म्हणून निवडावयाचे आहे. १८४

चेअरमन किंवा डेप्युटि चेअरमन यापैकी कोणालाही जागेवरून काढून टाकण्याचा ठराव ज्या सभेत चर्चिला जात असेल त्या सभेत त्या व्यक्तीला हजर राहून कामकाजात भाग घेता येईल. आपले वैयक्तिक मतही देता येईल पण त्या सभेत चेअरमन अथवा डेप्युटि चेअरमन म्हणून काम करिता येणार नाही व दोन्ही पक्षाला सारखी मते पडल्यास निर्णायक मत देण्याचा जो अधिकार त्याना एरवी असतो तो वापरता येणार नाही. ज्या सभेत चेअरमन अथवा डेप्युटि चेअरमन अशा रीतीने सामान्य सभासद म्हणून काम करीत आहेत त्या सभेपुरते चेअरमन म्हणून विधि-

मंडळाच्या कामकाजाच्या नियमाप्रमाणे ठरलेल्या व्यक्तीने अथवा त्यांच्या अभावी ऐन वेळी निवडलेल्या व्यक्तीने काम करावयाचे असते.१८५

घटक राज्याच्या विधिमंडळानी कायदा करून निश्चित करीपर्यंत आसाम, बिहार, मुंबई, मध्यप्रदेश, मद्रास, ओरिसा, पंजाब, युक्तप्रांत (उत्तर प्रदेश) व पश्चिम बंगाल या घटकातील विधिमंडळांच्या स्पीकर, डेप्युटि स्पीकर आणि चेअरमन, डेप्युटि चेअरमन याना घटना कायदा अंमलात येण्यापूर्वी जो पगार, जे भत्ते, ज्या सवलती वगैरे मिळत होते त्याच चालू राहणार आहेत. या घटकापैकी ज्याना पहिले वरिष्ठ कायदेमंडळ (Legislative Council) नव्हते त्यांच्या चेअरमन व डेप्युटि चेअरमनना पगार भत्ते सवलती वगैरे काय मिळावयाच्या हे त्या त्या गव्हर्नर्सनी ठरवावयाचे आहे.

हैद्राबाद, जम्मू व काश्मीर, मध्यभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानांचा संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर व कोचीन, आणि विंध्यप्रदेश या घटकातील विधिमंडळानी कायदा करून ठरवीपर्यंत त्यांच्या स्पीकर, डेप्युटि स्पीकर, चेअरमन व डेप्युटि चेअरमन याना पगार, भत्ते सवलती वगैरे काय मिळावयाच्या हे राजप्रमुखानी ठरवावयाचे आहे.१८६

प्रत्येक विधिमंडळाला आपले वेगळे अधिकारी असणार पण दोन्ही विधिमंडळात मिळून जरी काही अधिकारी ठेवावयाचे असतील तरी त्यास हरकत नाही. या अधिकाऱ्याना पगार काय असावेत त्यांच्या नोकरीच्या अटी वगैरे काय असाव्यात हे या विधिमंडळानी कायदे करून ठरवावयाचे आहे आणि त्यानी तसे करीपर्यंत गव्हर्नर अथवा राजप्रमुख यानी स्पीकर व चेअरमन यांचा विचार घेऊन ते ठरवावयाचे आहे.१८७

विधिमंडळांच्या प्रत्येक सभासदाने स्थानापन्न होण्यापूर्वी गव्हर्नर अथवा राजप्रमुख अथवा त्यानी नियुक्त केलेल्या व्यक्तीसमोर घटना कायद्याशी एकनिष्ठ राहून आपले कर्तव्य योग्य रीतीने पार पाडीन अशी शपथ घ्यावयाची असते.१८८

सर्व प्रश्नांचा निर्णय बहुमताने व्हावयाचा आहे. ज्या वेळी घटना कायद्याने विशिष्ट प्रमाणात बहुमत पाहिजे असे म्हटले असेल त्यावेळी खेरीज करून बाकीच्या वेळी साध्या बहुमताने प्रश्नांचा निर्णय लागावयाचा आहे. स्पीकर व चेअरमन किंवा त्यांचे जे काम करीत असतील त्यानी सामान्यतः आपले मत द्यावयाचे नाही पण ज्या वेळी दोन्ही बाजूना मते सारखी असतील त्या वेळी त्यानी आपले मत द्यावयाचे आहे आणि त्यांचे मत निर्णायक राहील.

विधिमंडळातील काही जागा रिकाम्या असल्या तरी विधिमंडळाला काम करिता येते आणि ज्या माणसाला सदस्य होता येत नाही अशा माणसाने विधिमंडळात काम केले अथवा मत दिले म्हणून विधिमंडळाने केलेल्या गोष्टी बेकायदेशीर होणार नाहीत.

विधिमंडळातील सदस्यांपैकी कमीतकमी किती सदस्य हजर असले म्हणजे कामास सुरवात करावी हे विधिमंडळानी कायदा करून ठरवी पर्यंत लहान विधिमंडळात कमीत कमी दहा सभासद उपस्थित असले किंवा विधिमंडळातील सदस्यांची संख्या शंभरापेक्षा जास्त असल्यास एकंदर संख्येच्या एकदशांश सदस्य असले तर विधिमंडळास काम घेता येईल.

या ठरलेल्या संख्येपेक्षा कमी सभासद उपस्थित असले तर विधिमंडळाचे काम तहकूब ठेविण्यात येईल. १८९

एकाच व्यक्तीला वरिष्ठ आणि कनिष्ठ अशा दोन्ही विधिमंडळांचे सभासद होता येणार नाही. एखाद्याची दोन्ही ठिकाणी निवडणूक झाली तर त्यापैकी कोणती निवडणूक रद्द समजावयची हे विधिमंडळानी कायदा करून ठरवावयाचे आहे. एकाच व्यक्तीस दोन घटक राज्यातील विधिमंडळाचे सदस्य होता येणार नाही. एखाद्याची निवडणूक दोन घटक राज्यातील विधिमंडळांचे वर झाली तर त्यापैकी कोणती जागा सोडावयाची हे त्य ने लवकरच ठरवावयास पाहिजे. अध्यक्षानी या बाबतीत केलेल्या नियमामध्ये निर्दिष्ट केलेली वेळ जर निघून गेली, आणि तोपर्यंत अशा सभासदाने कोणती तरी एक जागा जर सोडली नाही, तर अशा दोन्ही जागांची निवडणूक रद्द समजण्यात यावयाची आहे.

कोणाही सदस्याला आपल्या सभासदत्वाचा राजीनामा देता येतो. कोणीही सदस्य विधिमंडळाच्या बैठकीना साठ दिवस लागोपाठ गैरहजर राहिला तर त्याची जागा रिकामी होते. विधिमंडळाला चार दिवसापेक्षां जास्त सुटी जर असली तर हे सुट्टीचे दिवस सभासदांच्या गैरहजेरीचे साठ दिवस मोजताना त्यातून वगळावयाचेआहेत. १९०

भारत सरकार अथवा घटक राज्यांची नोकरी करणारांना विधिमंडळाचे सदस्य होता येणार नाही, अथवा रहाता येणार नाही. पण प्रधानांना आणि विधिमंडळानी कायदा करून निर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यांना ही बंदी लागू होणार नाही.

ज्याचे डोके फिरले आहे असे कोर्टाने ठरविले आहे, अशा इसमास विधिमंडळाचे सदस्य होता येणार नाही, आणि रहाता येणार नाही. नादारी घेतलेल्यांना व भारताचे नागरिकत्व नसलेल्यांना विधिमंडळाचे सदस्य होता येणार नाही, व रहाता

येणार नाही. याशिवाय आणखी कोणत्या कारणाकरिता लोकांना सदस्य होता येणार नाही, अथवा रहाता येणार नाही, हे कायदे करून ठरविण्याचे काम संघराज्याच्या विधिमंडळाचे आहे. १९०, १९१

एखादी व्यक्ति वर दिलेल्या कारणास्तव विधिमंडळाचा सदस्य होण्यास अथवा रहाण्यास लायक आहे का नाही हे ठरविण्याचे काम गव्हर्नर अथवा राजप्रमुख यांचे आहे. आणि त्यांनी या बाबतीत दिलेला निकाल हा अखेरचा निकाल म्हणून मानला जाईल. पण अशा प्रश्नावर निर्णय देताना त्यानी निवडणूक कमिशनचे मत विचारून त्याप्रमाणे निकाल द्यावयाचा आहे. १९२

शपथ न घेता अथवा कायद्याप्रमाणे आपणाला सभासद होता येत नाही हे माहीत असून सुद्धा जर एखाद्याने विधिमंडळात काम केले अथवा मत दिले, तर ज्या ज्या दिवशी त्यानी असे काम केले अथवा मत दिले, त्या प्रत्येक दिवसाबद्दल त्याला ५०० रु. रोज याप्रमाणे दंड होईल. १९३

विधिमंडळाच्या सभासदांचे अधिकार व त्यांना मिळणाऱ्या सवलती वगैरे:—या घटना कायद्यानें आणि विधिमंडळाच्या कामाकाजाच्या नियमानी घालून दिलेल्या मर्यादित विधिमंडळाच्या सभासदाला विधिमंडळांत भाषण स्वातंत्र्य राहील.

विधिमंडळात अथवा विधिमंडळाने नेमलेल्या कमिटीत सभासदाने केलेले भाषण अथवा दिलेले मत याबद्दल कोणतेही कोर्ट त्याला जाब विचारू शकणार नाही. याचप्रमाणे विधिमंडळातील त्याच्या भाषण वगैरेचा जो अधिकृत वृत्तांत प्रसिद्ध होईल त्यातील मजकुराबद्दल त्याला जबाबदार धरता येणार नाही.

इतर सवलती वगैरेच्या बाबतीत विधिमंडळानी कायदे करून बदल करीपर्यंत सध्या ब्रिटिश हाऊस ऑफ कॉमन्सच्या सभासदांना ज्या सवलती वगैरे मिळत आहेत त्याच सवलती विधिमंडळाच्या सभासदांना मिळणार आहेत. जे अधिकार व ज्या सवलती विधिमंडळाच्या सभासदाना तेच अधिकार व त्याच सवलती विधिमंडळाच्या बैठकीत भाषण करण्याचा आणि चर्चेत भाग घेण्याचा अधिकार असलेल्याना मिळणार. १९४

घटकराज्यांच्या विधिमंडळांच्या सभासदांना पगार भत्ते वगैरे काय मिळावयाचे हे त्या त्या घटकाच्या विधिमंडळानी कायदे करून ठरवावयाचे आहे परंतु त्यानी ते तसे निश्चित करी पर्यंत आसाम, बिहार, मुंबई, मध्यप्रदेश, मद्रास, ओरिसा, पंजाब,

युक्तप्रांत आणि पश्चिम बंगाल या घटकराज्यात त्या त्या घटकातील कनिष्ठ विधिमंडळाच्या सभासदाना घटना अमलात येण्यापूर्वी जे पगार भत्ते व ज्या सवलती इत्यादि मिळत होते त्याच मिळणार.

हैद्राबाद, जम्मू व काश्मीर, मध्याभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानसंघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर–कोचीन, आणि विंध्यप्रदेश या घटकराज्यातील विधिमंडळानी कायदे करून ते निश्चित करी पर्यंत विधिमंडळाच्या सभासदाना पगार भत्ते सवलती वगैरे काय मिळावयाचे आहे ते राजप्रमुखानी ठरवावयाचे आहे. १९५

कामकाजाची पद्धति

ज्या घटकराज्यात दोन विधिमंडळे आहेत त्यातील कोणत्याही विधिमंडळात पैशाच्या बिलाखेरीज बाकीचे कसलेही बिल प्रथम आणिता येईल. पैशाच्या बिलाखेरीज बाकीची बिले ज्या घटकराज्यात दोन विधिमंडळे आहेत त्या ठिकाणी दोन्हीही विधिमंडळानी दोघाना संमत असलेल्या दुरुस्त्यासह पास केल्यावाचून पास झाले असे समजता यावयाचे नाही. विधिमंडळात एखाद्या बिलाची चर्चा चालू असताना जर बैठक तहकूब झाली तर तेवढ्याने ते बिल रद्द झाले असे समजता यावयाचे नाही. एखाद्या बिलाचा प्रथम विचार वरिष्ठ विधिमंडळात चालू असतानाच कनिष्ठ विधिमंडळ बरखास्त करण्यात आले तर तेवढ्याने ते बिल रद्द झाले असे होत नाही. पण ज्या बिलाचा प्रथम विचार कनिष्ठ विधिमंडळ करीत आहे किंवा तो विचार करून मान्यतेसाठी ते वरिष्ठ विधिमंडळाकडे पाठविले गेले आहे अशा वेळी जर कनिष्ठ विधिमंडळ बरखास्त करण्यात आले तर त्या योगाने मात्र असे बिल रद्द होईल. १९६

कनिष्ठ विधिमंडळाने पास केलेले पैशाखेरीज इतर कोणतेही बिल वरिष्ठ विधिमंडळाने नापास केले किंवा पाठविल्यापासून तीन महिन्याच्या आत पास केले नाही अथवा कनिष्ठ विधिमंडळाला पसंत नसलेल्या अशा दुरुस्त्यासह पास केले, तर कनिष्ठ विधिमंडळानी त्याच बैठकीत अथवा पुढील बैठकीत त्या बिलाचा (आपल्या कामकाजाच्या नियमाना अनुसरून) फिरून विचार करावा आणि वरिष्ठ विधिमंडळाने सुचविलेल्या दुरुस्त्या पसंत असल्यास त्यांच्या सह आणि पसंत नसल्यास त्यांच्या वाचून ते बिल दुसऱ्यानदा पास करावे आणि विचारासाठी वरिष्ठ विधिमंडळाकडे परत पाठवावे. दोन वेळा विचार करून पाठविलेले हे बिल वरिष्ठ विधिमंडळाने नापास केले किंवा एक महिन्यात पास केले नाही किंवा कनिष्ठ विधिमंडळास पसंत नसतील अशा दुरुस्त्या घालून जर पास केले

तर ते वरिष्ठ विधिमंडळाच्या विरोधास न जुमानता, ज्या स्वरूपात दुसऱ्या खेपेस कनिष्ठ विधिमंडळाने ते मंजूर केले त्या स्वरूपात ते पास झाले आहे असे कायद्याने समजले जावयाचे आहे. १९७

एखादा कर बसविणे, रद्द करणे, त्यात सूट देणे, त्यात बदल करणे अथवा तो नियंत्रित करणे; सरकारने कर्ज काढणे किंवा एखाद्या कर्जाबद्दल हमी देणे; घटकराज्याच्या कन्सॉलिडेटेड फंडाचा अथवा कॉन्टिन्जन्सी फंडाचा ताबा, या फंडात कशाची भर टाकणे अथवा या फंडामधून रकमा काढणे; एखाद्या खात्याच्या खर्चाचा बोजा कन्सॉलिडेटेड फंडावर आहे असे जाहीर करणे अथवा अशा खात्यातील खर्चाच्या रकमा वाढविणे, या फंडाकरिता पैसे घेणे, हिशेब ठेविणे; इत्यादि विषयासंबंधीची जो बिले त्याना पैशाची बिले म्हणतात. पण ज्या बिलांचेमध्ये दंड करण्याच्या योजना आहेत किंवा परवाने देण्याबद्दल फी आकारण्याच्या योजना आहेत अथवा सरकारकडून करण्यात आलेल्या कामाबद्दल अथवा देण्यात आलेल्या सवलतीबद्दल मोबदला मागण्याच्या योजना आहेत किंवा ज्या योजनांचेमुळे स्थानिक संस्था अथवा अधिकाऱ्याना स्थानिक कार्यासाठी नवे कर बसविणे, जुने रद्द करणे, करात सूट देणे किंवा बदल करणे किंवा कर नियंत्रित करणे इत्यादि अधिकार दिले जातात त्या बिलांचा मात्र पैशाच्या बिलांचेमध्ये समावेश होणार नाही.

एखादे बिल पैशाचे बिल आहे का नाही (हा प्रश्न ज्या घटकराज्याना दोन विधिमंडळे आहेत त्यांच्याच बाबतीत उद्‌भवू शकतो) या बाबतीत कनिष्ठ विधिमंडळाच्या स्पीकरनी दिलेला निर्णय हा अखेरचा निर्णय ठरणार आहे. पैशाचे बिल हे विचारासाठी वरिष्ठ विधिमंडळाकडे पाठविले जाईल अथवा संमतीसाठी गव्हर्नर किंवा राजप्रमुखांचेकडे पाठविले जाईल त्या वेळी त्या बिलावर ते बिल पैशाचे बिल असल्या-संबंधीचा शेरा त्याचेवर कनिष्ठ विधिमंडळाच्या स्पीकरनी मारलेला असला पाहिजे. १९९

पैशासंबंधीचे बिल प्रथम वरिष्ठ विधिमंडळात आणिता यावयाचे नाही. ज्या घटक-राज्यात दोन विधिमंडळे आहेत अशा घटकराज्यातील कनिष्ठ विधिमंडळाने पैशाचे बिल पास केले म्हणजे ते वरिष्ठ विधिमंडळाकडे त्याच्या सूचनासाठी पाठविण्यात यावयाचे आहे. त्यानी चवदा दिवसाचे आंत आपल्या सूचनासह ते बिल परत कनिष्ठ विधिमंडळाकडे पाठवून दिले पाहिजे. या सूचना कनिष्ठ विधिमंडळाने मान्य केल्या तर ठीकच आणि नाही केल्या तर त्या सूचनाशिवाय ते बिल मूळ स्वरूपात पास झाले असे समजण्यात यावयाचे आहे. वरिष्ठ विधिमंडळाकडे सूचना करण्यासाठी

पाठविलेले बिल जर त्यांच्याकडून १४ दिवसात परत आले नाही, तर ते मूळ स्वरूपातच पास झाले आहे असे कायद्याने समजण्यात येईल.१९८

ज्या घटकराज्यात दोन विधिमंडळे आहेत त्या ठिकाणी दोनही विधिमंडळानी आणि ज्या ठिकाणी एकच विधिमंडळ आहे त्या ठिकाणी त्या विधिमंडळाने कोणतेही बिल पास केले म्हणजे ते संमतीसाठी गव्हर्नर वा राजप्रमुख यांचे पुढे ठेविण्यात येईल त्यानी आपली संमति द्यावी—नाकारावी किंवा ते बिल राष्ट्राध्यक्षांच्या संमतीसाठी राखून ठेवावे.

पैशाच्या बिलाखेरीज दुसरे कोणते बिल गव्हर्नरांच्या अथवा राजप्रमुखांच्या संमतीसाठी त्यांचे पुढे ठेविण्यात आले आणि त्यात काही बदल करावेत असे जर त्याना वाटले तर तसा संदेश देऊन त्यानी ते बिल विचाराकरिता परत विधिमंडळाचे कडे पाठवावे. असा संदेश आला म्हणजे विधिमंडळानी त्यातील सूचनांचा विचार करून बिलाचे रूपात वाटल्यास फरक करावा. तसा फरक करण्याची त्याना जर आवश्यकता वाटली नाही तर त्यानी ते बिल मूळ रूपात तसेच गव्हर्नर अथवा राजप्रमुख यांचे संमतीसाठी पाठवावे. संदेशाचा विचार होऊन दुसऱ्या खेपेस पुढे आलेल्या बिलाला मात्र गव्हर्नर अथवा राजप्रमुख यानी संमति दिलीच पाहिजे.

घटना कायद्याने हायकोर्टाकडे जी कामगिरी सोपविली आहे आणि हायकोर्टाला जे अधिकार दिले आहेत ती कामगिरी करण्यात आणि ते अधिकार बजाविण्यात ज्याच्या योगाने काही न्यून उत्पन्न होईल असे बिल गव्हर्नर अथवा राजप्रमुख यांचे पुढे संमतीसाठी आल्यास त्यानी संमति देऊ नये आणि असे बिल राष्ट्राध्यक्षांचे संमतीसाठी राखून ठेवावे २००

राष्ट्राध्यक्षांच्या संमतीसाठी गव्हर्नर अथवा राजप्रमुख यानी जे बिल राखून ठेविले असेल त्या बिलाला संमति दिल्याचे अथवा नाकारल्याचे त्यानी जाहीर करावे.

पैशाच्या बिलाखेरीज दुसरे जर बिल असेल तर ते राष्ट्राध्यक्षांनी गव्हर्नर अथवा राजप्रमुख यांचेकडे परत पाठवावे आणि त्याना ते संदेश देऊन परत विधिमंडळाच्याकडे विचारासाठी पाठविण्यास सांगावे. असा संदेश देऊन परत पाठविलेल्या बिलाचा विधिमंडळानी विचार करून त्याना योग्य वाटतील त्या दुरुस्त्यासह पास करून सहा महिन्याचे आत राष्ट्राध्यक्षांचेकडे संमतीसाठी फिरून एकदा पाठवावे.२०१

पैशासंबंधीच्या कामाकाजाची पद्धति

घटकराज्याच्या गव्हर्नरनी अथवा राजप्रमुखानी दरवर्षीच्या जमाखर्चाचे अंदाजपत्रक विधिमंडळांच्यापुढे ठेवण्याची व्यवस्था करावयाची आहे.

गव्हर्नर्सनी व राजप्रमुखानी या अंदाजपत्रकात घटकराज्याच्या कन्सॉलिडेटेड फंडावर ज्या खर्चाचा बोजा लादलेला आहे ते खर्च करण्यासाठी लागणाऱ्या रकमा आणि जो इतर खर्च या फंडातून करावयाचा बेत आहे त्याच्यासाठी लागणाऱ्या रकमा या वेगळ्या दाखवावयाच्या आहेत, त्याचप्रमाणे वसुली खात्यावर होणारा खर्च हा सुद्धा वेगळा दाखवावयाचा आहे.

गव्हर्नरचा पगार भत्ते आणि त्याच्याप्रीत्यर्थ होणारे सर्व खर्च आणि ज्या ठिकाणी राजप्रमुख आहे त्या ठिकाणी राजप्रमुखाचे भत्ते व त्याचे प्रीत्यर्थ राष्ट्राध्यक्षांच्या हुकमाने होणारे खर्च; स्पीकर, डेप्युटि स्पीकर, चेअरमन, डेप्युटि चेअरमन यांचा पगार व भत्ते इत्यादि खर्च; सरकारी कर्जावर द्यावे लागणारे व्याज, कर्जफेडी-साठी व कर्जाच्या उभारणीसाठी खर्च कराव्या लागणाऱ्या रकमा; हायकोर्टाच्या न्यायाधीशाना द्यावा लागणारा पगार, त्यांचे भत्ते, त्यांच्या करिता होणारे खर्च; कोर्ट अथवा लवाद यानी ज्या रकमा देण्याचा हुकूम केला आहे अशा रकमा; घटक-राज्याच्या विधिमंडळांनी कायदे करून ज्या खर्चाचा बोजा घटकराज्याच्या कन्सॉ-लिडेटेड फंडावर टाकिला आहे असे खर्च व घटना कायद्याने या कन्सॉलिडेटेड फंडा-वर ज्या खर्चाचा बोजा टाकिला आहे असे खर्च व त्रावणकोर-कोचीन या संस्था-नांच्या राज्यकर्त्यांशी ते संयुक्त संस्थान निर्माण करण्याचे वेळी जो करार ही घटना अमलात येण्याचेपूर्वी झाला आहे त्या कराराप्रमाणे दरवर्षी देवस्वम फंडाला द्यावी लागणारी ५१ लक्ष रुपयाची रक्कम या सर्वांचा बोजा त्या त्या घटकराज्याच्या कन्सॉ-लिडेटेड फंडावर ठेवण्यात आला आहे. २०२-२३८

अंदाजपत्रकातील ज्या खर्चाच्या रकमांचा बोजा घटकराज्याच्या कन्सॉलिडेटेड फंडावर ठेवण्यात आलेला आहे त्या रकमावर विधिमंडळातील सदस्यानी आपली मते नोंदवावयाची नाहीत पण या रकमांचे बद्दल चर्चा करावयास त्याना हरकत नाही. अंदाजपत्रकातील बाकीच्या रकमा कनिष्ठ विधिमंडळापुढें मागण्या या स्वरूपात ठेविल्या जातील आणि त्यात फेरफार करणे, त्या मान्य करणे किंवा अमान्य करणे हे अधिकार कनिष्ठ विधिमंडळाला राहतील.

गव्हर्नरने अथवा राजप्रमुखाने शिफारस केल्यावाचून कोणत्याही मागणीचा विधि-मंडळाला विचार करिता यावयाचा नाही. २०३

अंदाजपत्रकातील मागण्याना अशा रीतीने कनिष्ठ विधिमंडळाने मंजुरी दिल्यानंतर शक्य तितक्या लवकर कनिष्ठ विधिमंडळाने मंजूर केलेल्या मागण्यांच्या रकमा आणि

ज्या खर्चाचा बोजा घटकराज्याच्या कन्सॉलिडेटेड फंडावर ठेवण्यात आलेला आहे अशा रकमा (पण यांची बेरीज अंदाजपत्रकात दाखविलेल्या आकड्याचेवर जाता कामा नये), खर्च करण्याचे अधिकार देणारे एक बिल विधिमंडळापुढे आणण्यात आले पाहिजे.

या बिलात दर्शविलेल्या रकमांच्या आकड्यात बदल करणाऱ्या किंवा ज्या कार्यासाठी या रकमा खर्ची पडावयाच्या आहेत त्या कार्यात बदल सुचविणाऱ्या दुरुस्त्या या बिलाला कोणत्याही विधिमंडळात आणिता येणार नाहीत. एखादी दुरुस्ती अशा स्वरूपाची आहे का नाही याबद्दल त्यावेळी विधिमंडळाच्या अध्यक्षपदी असलेल्या व्यक्तीनें निर्णय द्यावयाचा आहे आणि हा निर्णय अखेरचा निर्णय राहील. २०४

अशा बिलाने ज्या ज्या रकमा खर्च करण्याचा अधिकार दिला त्या रकमा जर त्या कामासाठी अपुऱ्या पडू लागल्या किंवा अंदाजपत्रकात जिचा उल्लेख आलेला नाही अशी नवी खर्चाची बाब उपस्थित झाली, किंवा अंदाजपत्रकात दर्शविल्यापेक्षा जास्त रकम जर एखाद्या बाबतीत खर्च होऊन गेली तर गव्हर्नर अथवा राजप्रमुख यानी त्या कामासाठी पुरवणी अंदाजपत्रक विधिमंडळापुढे ठेवावयाचे आहे. अंदाजपत्रकातील रकमा प्रत्यक्षात खर्च होईपर्यंत ज्या ज्या गोष्टी कराव्या लागतात त्याच गोष्टी पुरवणी अंदाजपत्रकाबद्दल कराव्या लागतात. २०५

अंदाजपत्रक मंजूर करून घेऊन या मंजूर झालेल्या रकमा प्रत्यक्ष खर्च करण्यासाठी अधिकार देणारा कायदा पास करून घेणे या सर्व विधींसाठी जेवढा वेळ लागतो तेवढा वेळ थांबण्याची सवड नसली किंवा एकदम एखादी खर्चाची बाब निघाली आणि त्यासाठी लागणारे पैसे पुष्कळ असले, किंवा जिच्या रकमेत अनिश्चितता असल्यामुळे ती अंदाजपत्रकात घालिता येत नाही अशी असली, किंवा ही रकम दरवर्षी लागणारी नसून एखाद्याच वर्षी उद्भवलेला जर हा खर्च असला तर कनिष्ठ विधिमंडळात कायदा करून घेऊन या रकमा घटक राज्याच्या कन्सॉलिडेटेड् फंडातून अगाऊ खर्च करण्याचा अधिकार देता येतो. अंदाजपत्रकातील रकमासाठी ज्या योजना आणि जी पद्धति घालून देण्यात आली आहे त्याच योजना आणि तीच पद्धति अशा रीतीने अगाऊ मंजुरी मागितलेल्या रकमाना लागू आहे. २०६

पैशाचे बिल गव्हर्नर अथवा राजप्रमुख यांच्या शिफारसीवाचून विधिमंडळाला विचारात घेता यावयाचे नाही आणि प्रथम वरिष्ठ विधिमंडळात मांडता यावयाचे

नाही, पण एखादा कर रद्द करण्याची अथवा कमी करण्याची योजना करणाऱ्या बिलाला शिफारसीची आवश्यकता नाही.

जे बिल पास होऊन अमलात आणिले गेले असता काही रकमा घटकराज्याच्या कन्सॉलिडेटेड फंडातून खर्च कराव्या लागतील ते गव्हर्नर अथवा राजप्रमुख यांच्या शिफारसी वाचून विधिमंडळाला पास करिता यावयाचे नाही. २०७

कामकाजाची पद्धति

आपल्या कामकाजाची पद्धति काय असावी हे घटना कायद्याला धरून केलेल्या नियमानी विधिमंडळानी ठरवावयाचे आहे. असे नियम जोपर्यंत ठरविण्यात आले नाहीत तोपर्यंत ज्या घटकाना गव्हर्नर्स आहेत त्या घटकराज्यातील जुन्या विधिमंडळाचे कामकाजाचे जे नियम आहेत त्यात त्याना योग्य वाटतील ते बदल करून स्पीकर अथवा चेअरमन त्या त्या विधिमंडळाना लागू करतील. ज्या घटकराज्याना गव्हर्नर्स नसून राजप्रमुख आहेत अशा घटकराज्यातील विधिमंडळानी नियम करून कामकाजाची पद्धति ठरवी पर्यंत राजप्रमुखानी स्पीकर अथवा चेअरमन यांच्याशी विचारविनिमय करून अशा घटकाला पूर्वीचे विधिमंडळ असल्यास त्याचे जे कामकाजाचे नियम होते ते किंवा पूर्वीचे विधिमंडळ नसल्यास भारताच्या दुसऱ्या प्रांतातील जुन्या विधिमंडळातील कामाकाजाचे नियम योग्य वाटतील ते फेरफार करून आपल्या नव्या विधिमंडळाना लागू करावेत.

ज्या घटकात दोन विधिमंडळे आहेत त्यातील विधिमंडळानी एकमेकाशी दळणवळण कसे ठेवावे याबद्दलचे नियम गव्हर्नर अथवा राजप्रमुख यानी स्पीकर व चेअरमन यांचा विचार घेऊन ठरवावयाचे आहेत. २०८

पैशासंबंधीच्या कामकाजास निष्कारण विलंब लागू नये यासाठी असल्या कामकाजाची पद्धति कशी असावी हे कायदे करून ठरविण्याचा अधिकार विधिमंडळाना आहे आणि असा कायदा व पूर्वी त्यासंबंधी घालून दिलेले नियम यात जर विरोध आला तर कायदा प्रमाणभूत मानिला जाणार. २०९

संघराज्याच्या विधिमंडळानी कायदा करून त्यात बदल करीपर्यंत घटकराज्याच्या विधिमंडळातून येणारी बिले, त्यात सुचविल्या जाणाऱ्या दुरुस्त्या, त्यानी केलेले कायदे, त्याखाली काढिलेले हुकूम, केलेले नियम इत्यादींची भाषा ही इंग्रजी राहणार आहे.

विधिमंडळातील कारभार त्या घटकराज्याच्या सरकारी भाषेत, हिंदीत किंवा पंधरा वर्षेपर्यंत इंग्रजीत चालेल पण एखाद्या सदस्याला आपले विचार या भाषातून नीट रीतीने व्यक्त करिता येत नसतील तर त्या विधिमंडळाच्या स्पीकरनी अथवा चेअरमननी त्याना मातृभाषेत भाषण करण्याची परवानगी द्यावी. २१०

वरिष्ठ न्यायालयाच्या अथवा हायकोर्टाच्या न्यायाधीशाच्या वर्तणुकीची चर्चा घटकराज्यातील विधिमंडळात करिता येणार नाही. २११

विधिमंडळातील कारभार योग्य रीतीने चालला आहे का नाही याची कोणत्याही कारणास्तव चौकशी करण्याचा अधिकार कोर्टांना नाही. त्याचप्रमाणे ज्यांची नेमणूक विधिमंडळातील कामकाज नियंत्रित करण्यासाठी अथवा विधिमंडळात व्यवस्था राखण्यासाठी झालेली आहे त्यांच्या विधिमंडळातील वर्तणुकीवर कोणत्याही प्रकारे नियंत्रण घालण्याचा कोर्टांना अधिकार नाही. २१२

प्रकरण ४ थें

गव्हर्नर व राजप्रमुख यांचे कायदे करण्याचे अधिकार

विधिमंडळाच्या बैठकी चालू नसताना गव्हर्नर अथवा राजप्रमुख हे आवश्यकता वाटल्यास वटहुकूम काढू शकतील. पण ज्या बाबीबद्दलचे बिल विधिमंडळानी विचारात घेण्यास राष्ट्राध्यक्षांची पूर्वसंमति लागते अशा बाबीबद्दल किंवा जे बिल राष्ट्राध्यक्षांच्या संमतीसाठी राखून ठेवावे असे त्याना वाटले असते किंवा राष्ट्राध्यक्षांच्या संमतीवाचून जो कायदा कायदेशीर होऊ शकला नसता अशा सर्व विषयांच्याबद्दल त्याना वटहुकूम काढणे आवश्यक वाटले तर त्यानी त्यासाठी राष्ट्राध्यक्षांची अनुमति घेतली पाहिजे, कारण राष्ट्राध्यक्षांच्या आदेशावाचून त्याना तसे वटहुकूम काढिता येणार नाहीत.

वटहुकुमांची अंमलबजावणी कायद्यासारखीच होणार पण विधिमंडळाची बैठक भरल्याबरोबर वटहुकूम हा विधिमंडळाचे पुढे ठेविला पाहिजे. विधिमंडळानी तो नापसंत आहे असा ठराव केला तर त्याचा अंमल तावडतोब संपेल आणि काही झाले तरी विधिमंडळाची बैठक सुरू झाल्यापासून सहा आठवड्यापेक्षा जास्त वटहुकुमाचा अंमल राहू शकत नाही. गव्हर्नर अथवा राजप्रमुख हे केव्हाही वटहुकूम मागे घेऊ शकतात. ज्या बाबतीत कायदे करण्याचा अधिकार घटकराज्याच्या विधि-

मंडळाला नाही त्या बाबतीत वटहुकूम काढण्याचा हक्क गव्हर्नर अथवा राजप्रमुख याना नाही आणि तसा त्यानी वटहुकूम काढिला तर तो रद्बातल समजला जाईल.

ज्या बाबतीत संघराज्याची विधिमंडळे आणि घटकराज्याची विधिमंडळे याना कायदे करण्याचा सारखाच अधिकार आहे अशा बाबतीत वटहुकूम करण्यात आला आणि त्यामुळे संघराज्याच्या विधिमंडळाने केलेल्या योजनेत जरी बदल होत असला तरी हरकत नाही. त्या घटकराज्यात वटहुकमाने केलेला कायदा हा श्रेष्ठ ठरेल परंतु असा वटहुकूम जारी झाल्यानंतर संघराज्याच्या विधिमंडळानी त्या बाबतीत कायदा केला तर तेवढ्या पुरत्या अशा वटहुकमाच्या योजना रद्द समजण्यात येतील. २१३–२५४

प्रकरण ९ वें

घटक राज्यातील हायकोर्टस्

प्रत्येक घटक राज्यासाठी एक एक हायकोर्ट असणार. घटना अमलात येण्यापूर्वी ज्या प्रांतातून व संस्थानातून हायकोर्टें होती त्या प्रांतातील व संस्थानातील ती हायकोर्टें कायम राहतील. २१४

प्रत्येक हायकोर्टाला आपल्या बेअदबीसाठी शिक्षा करण्याचे अधिकार आहेत. २१५

प्रत्येक हायकोर्टाला एक सरन्यायाधीश आणि राष्ट्राध्यक्ष अवश्यक ठरवितील तितके इतर न्यायाधीश असणार. २१६

हायकोर्टाच्या सरन्यायाधीशांची नेमणूक राष्ट्राध्यक्षांनी भारताचे सरन्यायाधीश व त्या त्या घटकाचे गव्हर्नर अथवा राजप्रमुख यांच्या सल्ल्याने करावयाची आहे आणि हायकोर्टाच्या इतर न्यायाधीशांच्या नेमणुकीचे वेळी त्या त्या हायकोर्टाच्या सरन्यायाधीशांचा सुद्धा सल्ला त्यानी घ्यावयाचा आहे. हायकोर्ट जज्जानी वयाच्या साठ वर्षापर्यंत काम करावयाचे आहे.

हायकोर्ट जज्जाला राजीनामा द्यावयाचा झाल्यास त्यानी तो राष्ट्राध्यक्षांचे कडे पाठविला पाहिजे. राष्ट्राध्यक्षांनी एखाद्या हायकोर्ट जज्जाची नेमणूक वरिष्ठ न्यायालयावर केली किंवा दुसऱ्या एखाद्या हायकोर्टावर त्यांची बदली केली तर त्यांची जागा रिकामी पडेल. हायकोर्ट जज्जाना नालायकी अथवा दुर्वर्तन यासाठी जागेवरून

काढून टाकावयाचे झाल्यास त्यासाठी संघराज्याच्या विधिमंडळाने दोन तृतीयांश बहुमताने ठराव करून राष्ट्राध्यक्षांना तशी विनंति केली पाहिजे आणि मग राष्ट्राध्यक्ष त्याप्रमाणे त्याना काढून टाकण्याचा ठराव करितील.

भारताच्या नागरिकालाच हायकोर्टाचे जज्ज होता येईल. याशिवाय अशा व्यक्तीने भारतात कमीत कमी दहा वर्षे न्यायाधीश म्हणून काम केलेले असावे किंवा घटकराज्यातील कोणत्याही हायकोर्टात ॲडव्होकेट म्हणून काम केलेले असावे.

हायकोर्ट जज्जाला नोकरीवरून काढून टाका अशी राष्ट्राध्यक्षांना विनंति करणारा ठराव कोणत्या रीतीने संघराज्याच्या विधिमंडळापुढे आणावयाचा व न्यायाधीशाच्या नालायकीची अथवा दुर्वर्तनाची चौकशी कोणत्या रीतीने करावयाची हे संघराज्याच्या विधिमंडळानी कायदा करून ठरवावयाचे आहे. २१८

घटना कायद्याशी एकनिष्ठ राहून पूर्णपणे निःपक्षपातीपणाने न्यायदान करीन अशी शपथ अधिकारग्रहणापूर्वी प्रत्येक न्यायाधीशाने गव्हर्नर अथवा राजप्रमुख अथवा त्यानी नियुक्त केलेल्या इसमाचे देखत घ्यावयाची आहे. २१९

घटना अमलात आल्यानंतर ज्याने हायकोर्ट जज्ज म्हणून काम केले आहे त्याने भारतात पुनश्च केव्हाही कोणत्याही कोर्टापुढे अथवा अधिकाऱ्यापुढे वकील म्हणून काम करिता कामा नये. २२०

आसाम, बिहार, मुंबई, मध्यप्रदेश, मद्रास, ओरिसा, पंजाब, युक्तप्रांत व पश्चिम बंगाल या घटकराज्यातील हायकोर्टाच्या सरन्यायाधीशाना दरमहा चार हजार रुपये पगार व बाकीच्या न्यायाधीशाना दरमहा साडेतीन हजार रुपये पगार मिळावयाचा आहे. इतर घटकराज्यातील हायकोर्ट जज्जाना काय पगार मिळावयाचा हे राष्ट्राध्यक्षांनी राजप्रमुखांचे सल्ल्याने ठरवावयाचे आहे.

हायकोर्ट जज्जांचा फिरतीचा खर्च, रजा, पेन्शन वगैरे सर्व बाबी कायदे करून संघराज्याच्या विधिमंडळानी ठरवावयाच्या आहेत आणि त्यांनी तशा त्या ठरवी पर्यंत आसाम, बिहार, मुंबई, मध्यप्रदेश, मद्रास, ओरिसा, पंजाब, युक्तप्रांत व पश्चिम बंगाल या घटकातील हायकोर्ट जज्जाना पूर्वी या बाबतीत जे नियम लागू होते तेच चालू राहतील व इतर घटकराज्यात या गोष्टी राजप्रमुखांच्या सल्ल्याने राष्ट्राध्यक्ष ठरवितील.

पण हायकोर्ट जज्जाची एकदा नेमणूक झाली म्हणजे त्यांचा पगार, त्यांच्या सवलती इत्यादि गोष्टी ते अधिकारावर आहेत तोपर्यंत कमी करिता येणार नाहीत. २२१

भारताच्या सरन्यायाधीशांचा सल्ला घेऊन राष्ट्राध्यक्ष एका हायकोर्ट जज्जाची बदली दुसऱ्या हायकोर्टावर करू शकतात. अशा तऱ्हेने त्यांची बदली झाली असता त्यास पडणाऱ्या त्रासाबद्दल म्हणून त्यांच्या नेहमीच्या वेतन इत्यादिपेक्षा जास्त आणखी त्याना काय द्यावयाचे हे संघराज्याच्या विधिमंडळानी ठरवावयाचे आहे आणि तसे त्यानी ठरवीपर्यंत या गोष्टी राष्ट्राध्यक्षांनी ठरवावयाच्या आहेत.२२२

हायकोर्टाच्या सरन्यायाधीशांची जागा काही कारणाने रिकामी असली अथवा ते रजेवर असल्यामुळे म्हणा किंवा दुसऱ्या काही कारणाने ते काम करू शकत नसले तर त्यांच्या जागी दुसऱ्या कोणत्या न्यायाधीशानी काम करावयाचे हे राष्ट्राध्यक्ष ठरवितील. २२३

कोणत्याही हायकोर्टाचे सर न्यायाधीश हे राष्ट्राध्यक्षांच्या परवानगीने सेवानिवृत्त झालेल्या कोणाही हायकोर्ट जज्जाला आपल्या हायकोर्टावर न्यायाधीश म्हणून काम करण्यास बोलावू शकतील. अशा तऱ्हेने काम करीत असणाऱ्या व्यक्तीला हायकोर्ट जज्जांचे पगार, सवलती, अधिकार वगैरे मिळतील पण कोणाच्या मर्जीविरुद्ध त्याला हायकोर्ट जज्ज बनविता येणार नाही.२२४

घटना कायद्याने व घटना कायद्याने दिलेल्या अधिकाराअन्वये विधिमंडळानी केलेल्या कायद्यानी त्यात जोपर्यंत बदल केला नाही तोपर्यंत हायकोर्टाना घटना अंमलात येण्यापूर्वी जे जे अधिकार होते ते ते कायम राहणार आहेत.सारावसुली आणि तत्संबंधी केलेल्या गोष्टी यांचे बद्दल विचार करण्याच्या हायकोर्टाच्या अधिकारावर जी बंधने होती ती घटना कायद्याने दूर केलेली आहेत.२२५

नागरिकांच्या मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी किंवा दुसऱ्या कोणत्याहि कारणासाठी व्यक्ति हजर करण्यासाठी, अमुक करा किंवा अमुक करू नका, कोणत्या अधिकाराने तुम्ही अमुक एक गोष्ट करिता असे प्रश्न विचारणारे त्याचप्रमाणे खटला दुसऱ्या कोर्टाकडून आपल्याकडे काढून घेण्याचे इत्यादि आज्ञापत्रके काढण्याचे अधिकार हायकोर्टाना आपल्या घटकराज्यापुरते दिले आहेत. पण या योगाने वरिष्ठ न्यायालयाला अशा प्रकारचे जे अधिकार दिले आहेत त्यात कोणत्याही प्रकारची उणीव येणार नाही. २२६

घटकराज्यातील सर्व न्यायालये आणि ट्रायब्यूनल्स यांच्या कारभारावर देखरेख ठेवण्याचा अधिकार हायकोर्टाला आहे व त्यांचेकडून कामकाजाचा आढावा मागणे, त्यांची कामाकाजाची पद्धति कशी असावी हे ठरविणे, हिशेब कसे ठेवावे, दफ्तर कसे

लावावे इत्यादि गोष्टी ठरवून देणे त्या कोर्टांचे अधिकारी, कारकून व त्यांचे पुढे काम करणारे मुखत्यार व वकील इत्यादींचा मेहनताना ठरवून देणे या गोष्टी हायकोर्टांना करिता येतात पण नियम घालून देणे वगैरे गोष्टी त्यानी कायद्याला धरून आणि गव्हर्नर वा राजप्रमुख यांच्या सल्ल्याने करावयाच्या आहेत. पण संरक्षक दलांच्या (सैन्य आरमार इत्यादि) कायद्याखाली स्थापन केलेल्या न्यायालयांचेवर आणि ट्रायब्यूनल्सचे कामावर देखरेख ठेविण्याचा अधिकार मात्र हायकोर्टांना नाही. २२७

आपल्या हाताखालच्या चालू कामात घटना कायद्याच्या कलमांचा अर्थ लावण्याचा प्रश्न निघाला आहे आणि असा अर्थ लाविल्यावाचून त्या कामाचा नीट रीतीने निर्णय करिता येणार नाही असे जर हायकोर्टाला वाटले तर हायकोर्ट असे काम हाताखालच्या कोर्टाकडून काढून घेऊन स्वतः चालवू शकते किंवा अशा प्रश्नाचा स्वतः विचार करून त्यावर आपला निकाल देऊन त्या कामातील बाकीच्या प्रश्नांचा निर्णय लाविण्यासाठी खाली त्या कोर्टाकडे परत पाठवू शकते. २२८

हायकोर्टातील अधिकारी व नोकरवर्ग यांच्या नेमणुका हायकोर्टाच्या सरन्यायाधीशानी किंवा त्यानी नियुक्त केलेल्या न्यायाधीशानी करावयाच्या आहेत पण या बाबतीत घटक राज्याचे गव्हर्नर अथवा राजप्रमुख असा नियम करू शकतात की नवीन नेमणुका करावयाच्या झाल्यास त्या घटकराज्याच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनचा सल्ला घेतल्यावाचून करण्यात येऊ नयेत.

घटकराज्याच्या विधिमंडळानी या बाबतीत घालून दिलेल्या मर्यादा संभाळून आपले अधिकारी व नोकरवर्ग यांच्या नोकरीच्या अटी वगैरेचे बाबतीत हायकोर्टांचे सरन्यायाधीश अथवा त्यानी नियुक्त केलेले न्यायाधीश यानी नियम करावयाचे आहेत पण पगार, भत्ते, रजा, पेन्शन्स या बाबतीतील नियमाना त्या त्या घटकातील गव्हर्नर अथवा राजप्रमुख यांची संमति पाहिजे.

हायकोर्टाच्या नोकरवर्गाचे पगार भत्ते पेन्शन्स वगैरेचा खर्च हा घटकराज्याच्या कन्सॉलिडेटेड फंडावर लादलेला खर्च राहील त्याचप्रमाणे कोर्टाने घेतलेल्या फीज वगैरे त्या फंडात जमा होतील. २२९

हायकोर्टाच्या अधिकारक्षेत्राच्या मर्यादा वाढविणे अथवा कमी करणे अथवा त्यात बदल करणे या गोष्टी संघराज्याच्या विधिमंडळाला कायदे करून करिता येतील. २३० परंतु संघराज्याच्या विधिमंडळाने अशा तऱ्हेने हायकोर्टाच्या अधिकारक्षेत्रात फेरफार

केले असता त्यात बदल करणारे कायदे करण्याचा अधिकार घटकराज्याच्या विधिमंडळाना नाही.२३१

प्रकरण ६ वें

दुय्यम कोर्टे

डिस्ट्रिक्ट जज्जांच्या नेमणुका बढत्या बदल्या वगैरे गव्हर्नर व राजप्रमुख यानी आपआपल्या हायकोर्टाचा सल्ला घेऊन करावयाच्या आहे. घटकराज्याच्या अथवा संघराज्याच्या नोकरीत नसलेल्यांची डिस्ट्रिक्ट जज्ज म्हणून नेमणूक करावयाची असेल तर त्यानी कमीतकमी ७ वर्षे वकिली केलेली असली पाहिजे आणि हायकोर्टाने त्यांची शिफारस केलेली असली पाहिजे.२३३

न्यायखात्यातील बाकीच्या सिव्हिल जज्जांच्या नेमणुका गव्हर्नरनी अथवा राजप्रमुखानी हायकोर्ट आणि पब्लिक सर्व्हिस कमिशन यांचा विचार घेऊन केलेल्या नियमांच्या अनुसार करावयाच्या आहेत.२३४

डिस्ट्रिक्ट कोर्टे आणि त्याच्या खालची कोर्टे यातील न्यायाधीश (डिस्ट्रिक्ट जज्ज वगळून) व इतर सिव्हिल जज्ज यांच्या नेमणुका कोणत्या ठिकाणी करावयाच्या, त्याना बढत्या केव्हा व कशा द्यावयाच्या, रजा वगैरे केव्हा द्यावयाच्या या सर्व गोष्टी हायकोर्टाने ठरवावयाच्या आहेत. पण ज्या कायद्याखाली एखाद्या इसमाची नेमणूक करण्यात आलेली असेल त्याच कायद्याप्रमाणे हायकोर्टाने त्याचा विचार करावयाचा आहे आणि अशा हुकमांचे विरुद्ध अपील करण्याचे पूर्वी जे काय हक्क दिलेले असतील ते कायम राहणार.२३५

डिस्ट्रिक्ट जज्जाच्या व्याख्येत सिटी सिव्हिल कोर्टाचे जज्ज, ॲडिशनल, जॉईंट आणि असिस्टंट डिस्ट्रिक्ट जज्ज त्याचप्रमाणे चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट, ॲडिशनल चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट, सेशन्स जज्ज, ॲडिशनल व असिस्टंट सेशन्स जज्ज यांचा अंतर्भाव होतो.२३६

या प्रकरणात आलेल्या योजना सर्व मॅजिस्ट्रेटस्ना अथवा त्यांच्या पैकी एखाद्या वर्गाला पूर्णतः अथवा अंशतः अथवा काही फरकाने लागू होतील असा जाहीरनामा काढण्याचा गव्हर्नर व राजप्रमुखाना अधिकार आहे.२३७

भाग ८ वा

अजमेर, भोपाळ, बिलासपूर, कुचबिहार, कूर्ग, दिल्ली, हिमाचल-प्रदेश, कच्छ, मणिपूर आणि त्रिपुरा या घटकांतील राज्यव्यवस्था.

या घटकातील राज्यकारभार राष्ट्राध्यक्षांनी चीफ कमिशनर अथवा लेफ्टनंट गव्हर्नर्स नेमून करावयाचा आहे किंवा शेजारच्या घटकराज्याच्या सरकारचे मार्फत करावयाचा आहे पण असे करण्यापूर्वी त्या सरकारचा विचार घेतला पाहिजे आणि राष्ट्राध्यक्षांनी त्याना योग्य वाटेल त्या पद्धतीने ज्यांच्या राज्यकारभाराची व्यवस्था करावयाची त्या लोकांच्या इच्छा समजून घेतल्या पाहिजेत. २३९

ज्या घटकाकरिता चीफ कमिशनर किंवा लेफ्टनंट गव्हर्नर यांची नेमणूक झाली आहे त्या घटकाकरिता विधिमंडळ असावे आणि त्यातील सदस्य लोकानी निवडलेले किंवा सरकारने नेमलेले असावेत असे कायदा करून ठरविण्याचा अधिकार संघराज्याच्या विधिमंडळांचा आहे. त्याचप्रमाणे प्रधानमंडळ असावे का नाही व विधिमंडळ आणि प्रधानमंडळ यांचे अधिकार, त्यांची कर्तव्ये व त्यांची कार्यक्षेत्रे इत्यादि काय असावीत हे सुद्धा संघराज्याच्या विधिमंडळाना कायदे करून ठरविता येईल. अशा स्वरूपाचे कायदे करणे म्हणजे घटना कायद्यात दुरुस्ती करणे आहे असे समजले जावयाचे नाही. २४०

या घटकांचे करिता कायदा करून हायकोर्ट निर्माण करणे अथवा त्या घटकात असलेल्या कोर्टाला हायकोर्ट बनविणें हा अधिकार संघराज्याच्या विधिमंडळाना आहे. इतर घटकराज्यातील हायकोर्टांना घटना कायद्यातील सर्व योजना लागू करावयाच्या का त्यापैकी काही लागू करावयाच्या हे संघराज्याची विधिमंडळे ठरवू शकतील. नवी हायकोर्टे निर्माण न करिता इतर घटक राज्यातील हायकोर्टानाच ते अधिकार द्यावे असे संघराज्याच्या विधिमंडळाना वाटले तरी तसेही करण्यास हरकत नाही. नवी व्यवस्था होईपर्यंत घटना कायदा अमलात येण्याचेपूर्वी त्या त्या क्षेत्रापुरती जी हायकोर्टाची व्यवस्था होती ती कायम राहावयाची आहे. २४१

संघराज्याच्या विधिमंडळानी कायदा करून त्यात बदल करीपर्यंत कूर्गच्या विधिमंडळाची जी घटना होती तीच घटना कायम राहील आणि विधिमंडळाचे अधिकार आणि कर्तव्ये ही पण तीच राहतील.

राष्ट्राध्यक्षांनी हुकूम काढून त्यात बदल करीपर्यंत कूर्गच्या कर वगैरेच्या वसुलाची आणि खर्चाची आहे तीच व्यवस्था कायम राहील. २४२

भाग ९ वा

अंदमान आणि निकोबार ह्या बेटांचा आणि ज्याचा आतापर्यंत उल्लेख आला नाही अशा भारतातील प्रदेशाचा राज्यकारभार राष्ट्राध्यक्षांनी चीफ कमिशनर अथवा अन्य अधिकारी नेमून करावयाचा आहे.

राज्यव्यवस्था नीट व्हावी यासाठी या घटकापुरते कायदे व नियम करण्याचा राष्ट्राध्यक्षांना अधिकार आहे आणि संघराज्याच्या विधिमंडळानी केलेले कायदे या टापूपुरते रद्द करण्याचा अथवा बदलण्याचा राष्ट्राध्यक्षांना अधिकार आहे. २४३

भाग १०

शेडयूल्ड टापू व शेडयूल्ड जाती.

बिहार, मुंबई, मध्यप्रदेश, मद्रास, ओरिसा, पंजाब, युक्तप्रांत, पश्चिम बंगाल, हैद्राबाद, जम्मू व काश्मीर, मध्यभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानांचा संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर कोचीन आणि विंध्यप्रदेश यातील शेडयूल्ड एरियाज (हे टापू कोणते हे राष्ट्राध्यक्षांनी हुकूम काढून ठरवावयाचे आहे) आणि शेडयूल्ड जाती यांच्याकरिता राज्यव्यवस्थेत खाली दिलेल्या खास योजना केल्या आहेत.

शेडयूल्ड टापू व जाती यांच्या कारभाराबद्दल गव्हर्नर वा राजप्रमुख यानी राष्ट्राध्यक्षाना वार्षिक रिपोर्ट द्यावयाचा आहे. शेडयूल्ड टापू असलेल्या प्रत्येक घटकात आणि नुसत्याच शेडयूल्ड जाती असलेल्या ज्या घटकाबद्दल राष्ट्राध्यक्ष आज्ञा करितील अशा घटकात त्यांच्या कारभाराबद्दल सल्ला देणारे जास्तीत जास्त वीस सदस्य असलेले मंडळ स्थापिले जाईल. यापैकी $\frac{3}{4}$ सदस्य त्या जातींचे विधिमंडळातील प्रतिनिधि असावेत व बाकीचे त्या जातीचे अन्य प्रतिनिधि असावेत. जातीच्या कल्याणाच्या आणि सुधारणेच्या बाबतीत गव्हर्नर वा राजप्रमुख यानी सल्ला मागितला म्हणजे तो या मंडळाने द्यावयाचा आहे.

नेहमीच्या कायद्यापैकी कोणते या टापूना व जातीना लागावयाचे, कोणते लागावयाचे नाहीत अथवा फरकाने लागावयाचे हे गव्हर्नर अथवा राजप्रमुख ठरवितील व

शांतता आणि सुव्यवस्था यासाठी ते कायदेही करू शकतील. या जातीच्या लोकांच्या मिळकतींची खरेदीविक्री, त्यांच्याशी चाललेले इतरांचे सावकारीचे व्यवहार, त्यांच्यातील जमिनींची विभागणी यासंबंधीचे कायदे, जातीच्या सल्लागार मंडळाला विचारून आणि राष्ट्राध्यक्षांच्या अनुमतीने गव्हर्नर वा राजप्रमुख करू शकतील आणि अशा कायद्यानी संघराज्याच्या विधिमंडळाच्या कायद्यात बदल झाला तरी हरकत नाही.

शेड्यूल्ड टापू व शेड्यूल्ड जाती यांच्याबद्दल वेगळी राज्यव्यवस्था असावी अशाबद्दलच्या या योजनात संघराज्याची विधिमंडळे कायदे करून बदल करू शकतात.

आसाममधील संयुक्त खासी जैंतिया टेकड्या, गारो टेकड्या, लुशाई टेकडया, नागा टेकडया, उत्तर काचर टेकडया, मिकीर टेकडया, ईशान्य सरहद्दीचा टापू, बालीपारा सरहद्द जिल्हा, अबोर टेकडया, मिसीमी टेकडया आणि नागा टोळ्यांचा मुलूख यांची राज्यव्यवस्था खाली दिल्याप्रमाणे होईल.

संयुक्त खासी जैंतिया टेकड्या, गारो टेकड्या, लुशाई टेकडया, नागा टेकडया, उत्तर काचर टेकडया व मिकीर टेकडया हे स्वायत्त जिल्हे आहेत. एका जिल्ह्यात वेगळ्या जाती असल्या तर त्यांचे स्वायत्त प्रदेश जाहीर करण्याचा आसामच्या गव्हर्नरना अधिकार आहे. स्वायत्त जिल्ह्यांच्या संख्येत वा क्षेत्रात फेरबदल करणे वगैरे गोष्टी गव्हर्नर जाहीरनामा काढून करू शकतील पण याचेपूर्वी त्यानी कमिशनचा (याची माहिती पुढे येईल) सल्ला घ्यावयास पाहिजे.

प्रत्येक जिल्ह्यासाठी २४ किंवा कमी सदस्यांचे मंडळ असणार. यापैकी $\frac{3}{4}$ प्रौढ मतदान पद्धतीने निवडून आलेले असणार. प्रत्येक स्वायत्त प्रदेशासाठी सुद्धा एक मंडळ असणार. जे अधिकार प्रादेशिक मंडळाला दिलेले नाहीत ते जिल्हा मंडळ चालविणार.

जातीच्या मंडळांचा सल्ला घेऊन गव्हर्नर हे जिल्हा मंडळ व प्रादेशिक मंडळ यांच्या सदस्यांची संख्या, मतदारसंघ, मतदानाची व प्रतिनिधींची लायकी, प्रतिनिधींच्या अधिकाराची मुदत, त्याना नियुक्त करण्याच्या अटी, त्यांची कामकाजाची पद्धति, त्यांच्या अधिकाऱ्यांच्या निवडणुकी इत्यादि गोष्टींचे बद्दल नियम करू शकतात. ही मंडळे आपल्या कारभाराच्या व्यवस्थेसाठी नियम घालून देण्यास व कामाकाजाच्या सोईसाठी पोटमंडळे बनविण्यास समर्थ आहेत पण उत्तर काचर आणि

मिकीर टेकड्यातील डेप्युटि कमिशनर अथवा सबडिव्हिजनल ऑफिसर जिल्हा मंडळाचे पदसिद्ध चेअरमन राहतील व पहिली सहा वर्षे गव्हर्नरांच्या संमतीने या मंडळांचे निर्णय फिरवू शकतील आणि या मंडळाना त्याना स्वतःला योग्य वाटतील त्या आज्ञा देऊ शकतील.

ही जिल्हा आणि प्रादेशिक मंडळे आपआपल्या मुलखात सार्वजनिक हितासाठी जमिनी राखून ठेवणे, जंगलांची (राखीव खेरीज) व्यवस्था लावणे, शेतीसाठी कालवे पाट इत्यादींचे पाणी घेणे, पिकात बदल करणे, ग्रामपंचायती वगैरे स्थापणे, शहरांच्या कारभारांची मंडळे स्थापणे, त्यांच्या कार्यासंबंधी नियम करणे, जातींचे मुख्य निवडणे, वारसा हक्काबद्दल, लग्नाबद्दल व सामाजिक चालीरीति या सर्व बाबतीत कायदे करू शकतात पण गव्हर्नरनी त्याना संमति देईपर्यंत त्यांची अंमलबजावणी करिता येणार नाही.

आपआपल्या टापूत न्यायदान करण्यासाठी अधिकारी नेमणे, ग्रामपंचायती स्थापिणे, त्यांच्या कामकाजाच्या पद्धति ठरविणे इत्यादि गोष्टी जिल्हा आणि प्रादेशिक मंडळे करू शकतात व अशा रीतीने त्यानी स्थापिलेल्या कोर्ट इत्यादिकांवर अधिकार फक्त हायकोर्ट व भारताच्या वरिष्ठ न्यायालयाचा राहील. अशा कोर्टांना गव्हर्नर हे सिव्हिल व क्रिमिनल प्रोसिजर कोड खाली अधिकार देऊ शकतात.

या जिल्हा आणि प्रादेशिक मंडळाना शाळा स्थापन करणे, दवाखाने स्थापन करणे, रस्ते आणि जलमार्ग यांची व्यवस्था पाहणे इत्यादि गोष्टी करिता येतात. प्रत्येक स्वायत्त जिल्हा अथवा प्रदेश यांच्या मंडळाना कर बसविणे जमीन महसूल नेहमीच्या पद्धतीने वसूल करणे इत्यादि गोष्टी करिता येतात. या स्वायत्त विभागांच्या करिता जिल्हा आणि प्रादेशिक फंड असे वेगळे ठेविले जातील. यात पैसे जमा कसे करावयाचे आणि त्यातून खर्च कसे चालवावयाचे याबद्दलचे नियम ही मंडळे गव्हर्नरांचे संमतीने करू शकतात. खनिज पदार्थ काढण्यासाठी जे परवाने दिले जातील त्यांचेपासून होणाऱ्या उत्पन्नाचा कोणता भाग या प्रत्येक मंडळाला मिळावयाचा हे आसाम सरकार व ही मंडळे आपसात करार करून ठरविणार.

या स्वायत्त टापूमधील सावकारी नियंत्रण करणारे कायदे गव्हर्नरांच्या संमतीने करण्याचा जिल्हा व प्रादेशिक मंडळाना अधिकार आहे. ज्या बाबतीत या मंडळाना

कायदे करण्याचा अधिकार आहे त्या बाबतीतील आणि दारुबंदीविषयक संघराज्याच्या अथवा आसामच्या विधिमंडळाना केलेले कायदे हे या टापूना कितपत आणि कोणत्या फरकाने लागू व्हावयाचे हे ही मंडळे ठरविणार आहेत. या स्वायत्त जिल्हा मंडळाच्या जमाखर्चाचे वार्षिक अंदाजपत्रक प्रथम जिल्हा मंडळांचेपुढे चर्चेसाठी ठेवून मग आसामच्या अंदाजपत्रकात ते सामील करावयाचे आहे.

स्वायत्त प्रदेशात राज्यकारभार कसा काय चालला आहे, शिक्षण, आरोग्य, दळणवळणाची साधने, नव्या कायद्यांची आवश्यकता, कायद्यांची अंमलबजावणी इत्यादि बाबतीत चौकशी करून रिपोर्ट करण्यासाठी कमिशन नेमण्याचा अधिकार आसामच्या गव्हर्नरना आहे. हे खाते ज्या प्रधानाकडे सोपविलेले आहे त्याने हा रिपोर्ट आपल्या स्पष्टीकरणासह आसामच्या विधिमंडळाचे पुढे ठेवावयाचा आहे.

भारताच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तसे करणे अवश्य वाटल्यास आसामचे गव्हर्नर या प्रादेशिक मंडळानी केलेले कायदे रद्द करू शकतात एवढेच नाही तर ही मंडळे रद्द करून त्यांचे अधिकार आपलेकडे घेऊ शकतात. पण असे करणारा हुकूम त्यानी आपल्या कारणासह विधिमंडळापुढे ठेवावयाचा आहे व या हुकमाची अंमलबजावणीची मुदत विधिमंडळानी तो अमान्य केला नाही तर एक वर्षाची आहे. विधिमंडळे या हुकमाचा अंमल ठराव करून एक एक वर्षाने वाढवू शकतील.

चौकशी कमिशनने तसे सुचविल्यास गव्हर्नर जाहीरनामा काढून ही जिल्हा व प्रादेशिक मंडळे बरखास्त करून नव्या निवडणुकी घडवून आणू शकतात किंवा विधिमंडळाच्या संमतीने कारभार एक वर्षपर्यंत स्वतःकडे घेऊ शकतात किंवा दुसऱ्या कोणाकडे सोपवू शकतात. प्रादेशिक मंडळे बरखास्त करण्याचे पूर्वी त्याना आपली बाजू विधिमंडळांच्या पुढे मांडण्याची संधि द्यावयास पाहिजे.

अशाच सर्व योजना ईशान्य सरहद्द प्रांत, बालीपारा सरहद्द प्रांत, निराप सरहद्द प्रांत, अबोर टेकड्या आणि मिसिमी टेकड्या व नागा टोळ्यांचा प्रांत याना राष्ट्राध्यक्षांच्या संमतीने लागू करण्याचा अधिकार गव्हर्नराना आहे. असा त्यानी हुकूम काढीपर्यंत ज्या पद्धतीने अंदमान निकोबार बेटांची राज्यव्यवस्था केली जाते त्याचप्रमाणे या टापूंची राज्यव्यवस्था राष्ट्राध्यक्षांनी आसामच्या गव्हर्नरांच्या मार्फत करावयाची आहे.

घटना अमलात आल्याबरोबर शक्य तितक्या लवकर गव्हर्नरानी स्वायत्त जिल्ह्यांची आणि प्रदेशांची मंडळे बनवावयाची आहेत आणि तोपर्यंत तेथील सर्व

कारभार आसामच्या गव्हर्नरांनी पाहावयाचा आहे. या काळात संघराज्यानी व आसाम सरकारने केलेल्यापैकी कोणते व किती कायदे या टापूला लागू करावयाचे हे गव्हर्नरानी ठरवावयाचे आहे व वाटल्यास राष्ट्राध्यक्षांच्या अनुमतीने नवे कायदे पण त्यानी करावयाचे आहेत.

या भागात आलेल्या योजना संघराज्याची विधिमंडळे कायदे करून बदलू शकतात व असे बदल म्हणजे घटना कायद्यातील बदल आहेत असे समजले जाणार नाही.

भाग १० वा

संघराज्य व घटकराज्ये यांचे परस्पर संबंध

प्रकरण १ ले

कायदे करण्याच्या अधिकारांची विभागणी

घटना कायद्याला अनुसरून भारतातील कोणत्याही विभागासाठी कायदे करण्याचा अधिकार संघराज्याच्या विधिमंडळाना आहे आणि घटकराज्यातील कोणत्याही विभागाबद्दल कायदे करण्याचा अधिकार घटकराज्याच्या विधिमंडळाना आहे.

भारताच्या क्षेत्राच्या बाहेर तो लागू करावा लागेल या सबबीवर संघराज्याच्या विधिमंडळानी केलेला कोणताही कायदा बेकायदेशीर ठरविता येणार नाही. २४५

भारताचे संरक्षण व युद्ध सुरू झाल्यास, युद्ध नीट रीतीने चालविता यावे यासाठी अवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टी करणे, सैन्य, आरमार, विमानदल व इतर संरक्षक दले, कॅन्टोनमेंट विभागांच्या मर्यादा निश्चित करणे, तेथील स्थानिक कारभाराची व्यवस्था करणे, आरमार, सैन्य व वैमानिक दल यांचे कारखाने, हत्यारे, तोफा, बंदुका, दारुगोळा, स्फोटक द्रव्ये, अणुशक्ति आणि तिच्या उत्पादनासाठी अवश्य असलेली खनिज द्रव्ये, संरक्षणासाठी अथवा युद्धासाठी अवश्य असलेले उद्योगधंदे व कारखानदारी, गुप्त हेर खाते, संरक्षण, परराष्ट्रीय संबंध अथवा भारताच्या सुरक्षिततेसाठी कोणाला प्रतिबंधात ठेवणे, परराष्ट्रीय संबंध, परराष्ट्रातील भारताचे व्यापारी व राजकीय प्रतिनिधि, आंतरराष्ट्रीय परिषदा संस्था इत्यादीत भाग घेणे आणि त्यात घेतलेले निर्णय अंमलात आणणे, परराष्ट्राबरोबर तह, करार

इत्यादि करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे, युद्ध पुकारणे आणि तह करणे, परमुलखात अधिकार चालविणे, नागरिकत्व आणि परराष्ट्रातील प्रजाजन, गुन्हेगाराना परराष्ट्रांच्या हवाली करणे, भारतात प्रवेश, भारतातून बाहेर जाणे व घालविणे, प्रवासाचे परवाने, भारताच्या बाहेर यात्रेसाठी जाणे, चांचेगिरी व आंतरराष्ट्रीय कायद्यांचे खालचे गुन्हे, रेल्वे, राष्ट्रीय रस्ते (संघराज्याच्या विधिमंडळानी राष्ट्रीय म्हणून ठरविलेले), भारतातील राष्ट्रीय जलमार्ग व त्यावर यंत्रांच्या सहाय्याने होणारी वाहतूक, जहाजामधून वाहतूक व नाविक शिक्षण, दीपगृहे व आगबोटी आणि विमाने यांच्या संरक्षणासाठी वापरली जाणारी साधने, मुख्य बंदरे–त्यांच्या मर्यादा जाहीर करणे–बंदरावरील अधिकाऱ्यांची कार्यक्षेत्रे व अधिकार ठरविणे, बंदरातील रुग्णालये, क्वारंटाईनच्या योजना, विमानदल, विमानमार्ग, विमानतळ, वैमानिक वाहतुकीचे नियंत्रण, वैमानिकांचे शिक्षण, सर्व साधनानी माल व उतारूंची वाहतूक, पोस्ट आणि तारखाते, टेलिफोन, बिनतारी संदेश, ब्रॉडकास्टिंग वगैरे, अजमीर, भोपाळ, बिलासपूर, कुचबिहार, कूर्ग, दिल्ली, हिमाचल प्रदेश, कच्छ, मणिपूर, त्रिपुरा, अंदमान व निकोबार बेटे या ठिकाणची संघराज्याची मिळकत व तिचे उत्पन्न, संघराज्याच्या विधिमंडळानी कायदे करून जिच्याविषयी व्यवस्था केली आहे अशी संघराज्याची इतर घटकातील मिळकत व तिचे उत्पन्न, संघराज्यासाठी मालमत्ता संपादन करणे, हिंदी संस्थानिकांच्या मिळकतासाठी कोर्ट ऑफ वॉर्डस्ची व्यवस्था, भारताचे कर्ज, चलन, नाणी व परराष्ट्रीय हुंडणावळ, परराष्ट्रीय कर्ज, रिझर्व्ह बँक, पोस्ट ऑफिस, सेव्हिंग्ज बँक, भारतीय सरकारने अथवा घटकराज्याच्या सरकारने काढिलेल्या लॉटरीज, परराष्ट्रांशी दळणवळण व व्यापार, आयात निर्यातीवरील कर, घटकराज्यातील व्यापार, सहकारी संस्था व युनिव्हर्सिटयाखेरीज बाकी सर्व प्रकारच्या व्यापारी व इतर कंपन्याची स्थापना, कारभार आणि त्यांचा कारभार गुंडाळणे, बँका, हुंड्या, चेक, प्रॉमेसरी नोटा वगैरे, विमे उतरणे, स्टॉक एक्सचेंज व वायद्यांचे व्यवहार, पेटंटस्, डिझाइन्स, शोध कॉपीराईट, ट्रेडमार्क, मर्केन्डाइज मार्क, वजनेमापे, एका घटकराज्यातून दुसऱ्या घटकराज्यात अथवा परदेशात पाठविल्या जाणाऱ्या मालाचा दर्जा, सार्वजनिक हितासाठी ज्या उद्योगधंद्यांचे नियंत्रण करणे अवश्य आहे असे कायदे करून संघराज्याच्या विधिमंडळानी ठरविले आहे ते उद्योगधंदे, खनिज तेले अथवा ज्वालाग्राही पदार्थ, भारत सरकारने कायदा करून ज्या खाणी व खनिज पदार्थांचे जर नियंत्रण अवश्य ठरविले असेल तर त्या खाणी व ते खनिज पदार्थ, तेलाच्या खाणी व इतर खाणीतील

मजुरांचे संरक्षण व काम, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने संघराज्याच्या विधिमंडळाला आवश्यक वाटेल त्या प्रमाणात दोन घटकराज्यातून वाहणाऱ्या नद्यांच्या प्रवाहांचे नियंत्रण, जमिनीपासून तीन मैलाच्या पलीकडच्या हद्दीतील मासेमारीचा धदा, मिठाचे उत्पादन पुरवठा वाटप, अफूची लागवड, निर्यात इत्यादि, सिनेमा फिल्म्स दाखविण्याची मंजुरी, सरकारी कारखान्यातील नोकरांचे तंटे, राष्ट्रीय ग्रंथालय, इंडियन म्यूझियम, इंपीरियल वॉर म्यूझियम, व्हिक्टोरिया मेमोरियल, इंडियन वॉर मेमोरियल आणि भारत सरकारने चालविलेल्या आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्था, बनारस हिंदु युनिव्हर्सिटी, अलिगड मुस्लीम युनिव्हार्सिटी व भारत सरकारच्या आर्थिक (पूर्णतः अथवा अंशतः) साहाय्याने चालणाऱ्या शास्त्रीय आणि औद्योगिक संस्था, शास्त्रीय शिक्षण, तांत्रिक शिक्षण, संशोधन करणाऱ्या संस्था, पोलिसाना शिक्षण देणाऱ्या वगैरे ज्या संस्था संघराज्याने चालविल्या आहेत त्या संस्था, उच्च शिक्षण, संशोधन, शास्त्रीय व औद्योगिक शिक्षण यात एकसूत्रीपणा आणणे, पुराणवस्तु-संशोधन व रक्षण विभाग, सर्व्हे ऑफ इंडिया (निरनिराळ्या शास्त्राकरिता) हवामान खाते, खानेसुमारी, भारत सरकारच्या व अखिल भारतीय नोकऱ्या, भारत सरकारचे पब्लिक सर्व्हिस कमिशन, भारत सरकारने कन्सॉलिडेटेड फंड ऑफ इंडिया-मधून द्यावयाची पेन्शन्स, निवडणुका, इलेक्शन कमिशन, संघराज्याच्या विधिमंडळाच्या सदस्यांचे व अधिकाऱ्यांचे पगार, भत्ते, त्यांचे अधिकार त्यांना मिळणाऱ्या सवलती त्यांचे कमिटयांच्यापुढे देण्यात येणारा पुरावा, राष्ट्राध्यक्ष व गव्हर्नर्स मुख्य हिशेब तपासनीस व संघराज्याचे प्रधान याना मिळणारे पगार भत्ते इत्यादि, संघराज्याचे व घटकराज्यांचे हिशेब तपासणे, वरिष्ठ न्यायालयाची घटना–अधिकार त्यांच्या–फीज त्यांच्यापुढे काम करणाऱ्या वकिलांची लायकी, हायकोर्टांची घटना–त्यांचे अधिकारी–त्यांचेपुढे काम करणारे वकील, त्यांच्या क्षेत्रातील वाढ व क्षेत्र मर्यादित होणे; घटकराज्यातील साध्या व रेल्वे पोलिसाना घटक राज्याबाहेर देण्यात येणारे अधिकार, एका घटकराज्यातून दुसऱ्या घटकराज्यात वस्तीसाठी जाणे, क्वारंटाईन, शेतकीखेरीज दुसऱ्या उत्पन्नावरील कर, कस्टम्सचे कर, दारू व अफू व इतर अमली पदार्थ वगळून बाकीच्या तंबाखू व भारतात तयार झालेल्या वस्तूवरील कर, कॉर्पोरेशन कर, भांडवलाच्या किंमतीमधील वाढीचे कर, शेतजमिनीखेरीज दुसऱ्या मिळकतीवरील स्वामित्वाचा कर, शेतजमिनी-व्यतिरिक्त इतर मिळकतीवरील वारसा कर, उतारू व मालाच्या वाहतुकीबाबत टर्मि-

नल टॅक्सेस, स्टॉक एक्सचेंज व वायद्याचे व्यवहाराबद्दल स्टँपाव्यतिरिक्त इतर कर, हुंड्या, प्रॉमेसरी चेक्स, बिल्स ऑफ लेडिंग, क्रेडिट लेटर, शेअर ट्रान्स्फर, प्रॉक्झी व पावत्या, वृत्तपत्रावरील व जाहिरातीवरील कर, यासंबंधीच्या कायद्यांच्या उल्लंघनाबद्दल शिक्षा या यादीसंबंधाने चौकशी सर्व्हे व आकडेवारी माहिती, वरिष्ठ न्यायालयाखेरीज बाकीच्या सर्व न्यायालयांचे अधिकार व न्यायालयांचे समुद्रावरील अधिकार, या यादीतील गोष्टींचेबद्दल घेतलेल्या फीज–या सर्व विषयांचेबद्दल कायदे करण्याचे अधिकार **फक्त** संघराज्याच्या विधिमंडळाना आहेत.

सार्वजनिक सुव्यवस्था (सैन्य आरमार विमानदल यांच्या उपयोगाचा यात समावेश होत नाही.) पोलीस (रेल्वे व खेडेगावचे यासुद्धा) न्यायदान (वरिष्ठ न्यायालय व हायकोर्ट याखेरीज) हायकोर्टांचे नोकर, भाडे व महसूल वसुलीच्या कोर्टातील कामकाजाची पद्धति, वरिष्ठ न्यायालयाखेरीज बाकीच्या कोर्टात घेतलेली फी, तुरुंग व रेफर्मेटरी स्कूल्स, स्थानिक स्वराज्यसंस्था व ग्रामपंचायती, सार्वजनिक आरोग्य रुग्णालये, औषधालये, यात्रा (भारताच्या बाहेरच्या वगळून) दारू व मादक द्रव्ये, पंगु व बेकार याना मिळणारी मदत, प्रेते पुरण्याची व जाळण्याची व्यवस्था, शिक्षण, ग्रंथालये, म्युझियम्स, संघराज्याकडे व्यवस्था नसलेले ऐतिहासिक अवशेष, दळणवळणाची साधने (संघराज्याकडे व्यवस्था नसलेली) शेती, शेतीचे शिक्षण वनस्पतीवरील कीड टाळणे–निवारणे,जनावरांच्या रोगराईविरुद्ध उपाययोजना, त्यांच्या जाति सुधारणे–व्हेटर्नरी डॉक्टर, कोंडवाडे, कालवे व पाणी-पुरवठा, पाण्याचे साठे, जलविद्युत्, जमिनी–त्यांची मालकी–त्या खंडाने देणे–शेतीच्या जमिनी–वसाहती करणे शेती सुधारणे, जंगले, जनावरे व पक्षी यांचे संरक्षण–मासेमारी–कोर्ट ऑफ वॉर्डस–संघराज्याने आपल्याकडे न घेतलेल्या खाणी व कारखानदारी, गॅस, संघराज्याकडे नसलेला व्यापार व मालाचे उत्पादन, बाजार व जत्रा, वजने-मापे (परिमाणे ठरविणे वगळून) सावकारी, शेतकऱ्यांचे ऋणविमोचन, खाणावळी, संघराज्याकडे नसलेले कंपनीविषयक कारभार, शैक्षणिक शास्त्रीय धार्मिक आणि इतर संस्था संघटना व सहकारी संस्था, नाटकगृहे, चित्रपटगृहे, करमणुकीचे व खेळांचे कार्यक्रम, जुगार व सट्टे, घटकराज्याच्या मालकीच्या मिळकती, मिळकती संपादन करणे, घटकराज्यातील विधिमंडळाच्या निवडणुकी (संघराज्याने घालून दिलेल्या मर्यादात) विधिमंडळाच्या अधिकाऱ्यांचे व सदस्यांचे पगार भत्ते, त्यांना मिळणाऱ्या सवलती त्यांचे अधिकार, प्रधानांचे पगार भत्ते, घटकराज्याचे अधिकारी व पब्लिक

सर्व्हिस कमिशन, सरकारी पेन्शन्स, घटकराज्याचे कर्ज, गुप्त धन, जमीन महसूल व तत्संबंधी सर्व गोष्टी, शेतीच्या उत्पन्नावरील कर-वारसाहक्क-इस्टेट ड्यूटी; जमिनी-वरील व इमारतीवरील कर,खनिज पदार्थांच्या मालकीवरील कर, दारू व मादक द्रव्ये यावरील कर वगैरेचे उत्पन्न, जकातींचे उत्पन्न, विजेवरील कर, वर्तमानपत्राखेरीज बाकीच्या गोष्टींच्या विक्रीवरील कर, वृत्तपत्राखेरीज इतर ठिकाणी आलेल्या जाहिरातीवरील कर, माल व उतारूंच्या वाहतुकीवरील कर, वाहनावरील कर, जनावरे व बोटीवरील कर, टोलनाक्यावरील कर, उद्योगधंदे व व्यवसाय यावरील कर, डोईपट्टी, करमणुकी, चैनीचे पदार्थ,जुगारी, सट्टेबाजी यावरील कर, दस्तऐवजाना लागणारे स्टँप, या यादीतील विषयासंबंधाने केलेल्या कायद्यांच्या उल्लंघनाबद्दल शिक्षा, वरिष्ठ न्यायालयाखेरीज इतर न्यायालयांचे वरील विषयाबाबतचे अधिकार व वरील बाबीत कोर्टाखेरीज इतरानी घेतलेल्या फीज या बाबतीत कायदे करण्याचे अधिकार फक्त आसाम, बिहार, मुंबई, मध्यप्रदेश, मद्रास, ओरिसा, पंजाब, युक्तप्रांत, पश्चिम बंगाल, हैद्राबाद, काश्मीर व जम्मू, मध्यभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानांचा संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर-कोचीन, विंध्यप्रदेश या घटक-राज्याना आहेत व इतर घटकांच्या बाबतीत या विषयांचेबद्दल कायदे करण्याचे अधिकार संघराज्याचे विधिमंडळाना आहेत.

फौजदारी कायदे (आतापर्यंत जे येऊन गेले नाहीत ते) सार्वजनिक सुव्यवस्था, आवश्यक वस्तूंचा पुरवठा आणि घटकराज्याची सुरक्षितता यांचे बाबतीत गुन्हे होऊ नयेत यासाठी व्यक्तींना प्रतिबंधात ठेवण्याचे अधिकार देणारे कायदे, गुन्हेगार व प्रतिबंधात ठेविलेल्या व्यक्तीने एका घटकराज्यातून दुसऱ्या घटकराज्यात नेणे, विवाह, विवाहविच्छेद, अज्ञान, दत्तक, मृत्युपत्रे, वारसा, एकत्र कुटुंबे, वाटण्या व ज्या ज्या बाबतीत व्यक्तिगत कायदा लागू होत असेल त्या बाबी, बिनशेतीच्या जमिनींची खरेदीविक्री, गहाण वगैरे व्यवहार, दस्तऐवज रजिस्टर करणे, करार, भागीदारी, एजन्सी, मालाच्या वाहतुकीचे व इतर करार, दावे लाविण्याचे हक्क, नादारी, ट्रस्ट, पुराव्याचे कायदे, कोर्टापुढील कामाकाजासंबंधीचे कायदे, भटक्या टोळ्या व उडाणटप्पू लोकांचेबद्दलचे कायदे, वेड लागलेले इसम व त्याना ठेवण्याच्या व्यवस्था, जनावराना क्रूर रीतीने वागविले जाऊ नये याच्या योजना, अन्न व इतर पदार्थातील भेसळ, औषधे बनविणे (अफू खेरीज), आर्थिक व सामाजिक योजना करणे, व्यापारी व औद्योगिक मक्तेदारी ट्रस्ट व कारखानदारांचे

संघ इत्यादि, सामाजिक सुरक्षितता आणि विमे, बेकारी, कामगारांच्या कामाच्या अटी, प्रॉव्हिडंट फंड, मालकांच्या जबाबदाऱ्या, कामगारांना मिळणारी नुकसान भरपाई सवलती व इतर सोई, धंदेशिक्षण. वकिली डाक्टरी व इतर धंदे, निर्वासितांच्या वसाहती व त्याना देण्याच्या सवलती, धर्मादाय व धार्मिक संस्था, जनावरे व वनस्पति व माणसे यांच्या रोगराईचा एका घटकराज्यातून दुसऱ्या घटकराज्यात फैलाव होऊ न देणे, जन्ममृत्यूंच्या नोंदी, मुख्य बंदरे सोडून बाकीची बंदरे, अंतर्गत जलमार्ग व त्यावरील वाहतूक, संघराज्याच्या विधिमंडळानी ज्या उद्योगधंद्याचे नियंत्रण सार्वजनिक हिताचे आहे असे ठरविलें आहे ते उद्योगधंदे व त्या मालाचे उत्पादन खरेदीविक्री वगैरे, भावनियंत्रण, यंत्रानी चालणारी वाहने, फॅक्टरीज, बॉयलर्स, वीज, वृत्तपत्रे, पुस्तके आणि छापखाने, पुराणकालीन अवशेष, निर्वासितांच्या मिळकती, सरकारी किंवा सार्वजनिक कामासाठी घेतलेल्या मिळकतींच्यासाठी द्यावयाचे नुकसान, करवसुली, स्टँपड्यूटी, माहिती व आकडे गोळा करणे, वरिष्ठ न्यायालयाखेरीज इतर न्यायालयांचे अधिकारक्षेत्र, कोर्टाखेरीज अन्यत्र घेतलेल्या फीज या सर्व विषयांचे बद्दल कायदे करण्याचे अधिकार संघराज्याची विधिमंडळे व आसाम, बिहार, मुंबई, मध्यप्रदेश, मद्रास, ओरिसा, पंजाब, युक्तप्रांत व पश्चिम बंगाल आणि हैद्राबाद, काश्मीर व जम्मू, मध्य भारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानांचा संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर व कोचीन, आणि विंध्यप्रदेश या घटक राज्यांच्या विधिमंडळाना आहेत. २४६

संघराज्याच्या विधिमंडळाच्या अधिकारक्षेत्रातील कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी जास्त कोर्टांची स्थापना करण्याचा अधिकार संघराज्याच्या विधिमंडळाला आहे. २४७ घटकराज्याना ज्या विषयाबद्दल कायदे करण्याचे अधिकार आहेत ते विषय व ज्या विषयांचे बद्दल कायदे करण्याचे अधिकार संघराज्य व घटकराज्ये या दोघानाही आहेत ते वगळून बाकीच्या सर्व विषयाबद्दल कायदे करण्याचे व कर बसविण्याचे अधिकार संघराज्याच्या विधिमंडळाना आहेत. २४८

घटकराज्याना ज्या विषयांचेबद्दल कायदे करण्याचे अधिकार आहेत त्या विषयाबद्दल सुद्धा संघराज्याच्या विधिमंडळानी कायदे करणे हे राष्ट्रहिताच्या दृष्टीने युक्त व इष्ट आहे असे संघराज्याच्या वरिष्ठ विधिमंडळानी $\frac{2}{3}$ बहुमताने ठरविले तर संघराज्याच्या विधिमंडळाना त्या विषयाबद्दल कायदे करण्याचा अधिकार आहे. असे अधिकार देणाऱ्या ठरावाची मुदत वेळोवेळी एक एक वर्षाने वाढविता येते. अशा ठरावाने

प्राप्त झालेल्या अधिकारात केलेल्या कायद्यांचा अंमल या ठरावाची मुदत संपल्य नंतर फक्त सहा महिने रहावयाचा आहे. याशिवाय संघराज्याच्या विधिमंडळाना अखिल भारताकरिता वाटेल त्या विषयासंबंधी कायदे करण्याचा जो अधिकार उत्पन्न होतो तो आणीबाणीची परिस्थिति जाहीर करण्यात आली म्हणजे व हा अधिकार ही परिस्थिति संपल्यापासून ६ महिन्याच्या आत संपतो. २५० अशा दोन्ही प्रसंगाने संघराज्याच्या विधिमंडळाना कायदे करण्याचे विशेष अधिकार जरी प्राप्त झाले असले तरी त्याचा अर्थ घटकराज्यांचे त्या विषयाबद्दलचे कायदे करण्याचे अधिकार काढून घेतले आहेत असा नाही. घटकराज्ये त्या काळात सुद्धा त्या विषयाबद्दल कायदे करू शकतात पण संघराज्याच्या विधिमंडळानी केलेले कायदे आणि घटकराज्यानी केलेले कायदे यात विरोध येत असला तर संघराज्याची कायदे करण्याची ही मुदत संपेपर्यंत घटकराज्यानी केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी तहकूब राहते. २५१

दोन अथवा अधिक घटकराज्याची विधिमंडळे एखाद्या विषयाबद्दल संघराज्याने कायदे करावे असे ठराव करून संघराज्याच्या विधिमंडळाना त्या विषयाबाबत घटकराज्यांचेवर बंधनकारक होतील असे कायदे करिता येतात. असा ठराव मुळात न करणारे घटकराज्यसुद्धा अशा कायद्याला विधिमंडळात मागून मान्यता देऊन आपल्याला असा कायदा लागू करून घेऊ शकते. पण मग अशा कायद्यात बदल करण्याचा अथवा ते रद्द करण्याचा अधिकार कोणाही एका घटकराज्याला राहू शकत नाही. २५२

दुसऱ्या राष्ट्राशी झालेले तह किंवा करार अंमलात आणण्यासाठी अथवा आंतरराष्ट्रीय संस्थामधून भारताने स्वीकारलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी कायदे करणे अवश्य असल्यास तसे कायदे करण्याचा अधिकार संघराज्याच्या विधिमंडळाना आहे. २५३

संघराज्य व घटकराज्ये या दोघानाही ज्या बाबतीत कायदे करण्याचे अधिकार आहेत अशा बाबतीत त्यांच्या कायद्यात विसंगती असेल तर सामान्यतः संघराज्याच्या कायद्याला प्राधान्य मिळेल पण घटकराज्याच्या कायद्याला राष्ट्राध्यक्षांची संमति मिळाली असली तर त्या घटकापुरता तो कायदा चालेल पण संघराज्याला वाटल्यास पुनश्च कायदा करून घटकराज्यात आपला कायदा लागू करिता येईल. २५४

ज्या कायद्यांना गव्हर्नर राजप्रमुख अथवा राष्ट्राध्यक्ष यांची पूर्व संमति घ्यावी असे घटना कायद्याने ठरविले आहे त्याना पूर्व संमति घ्यावयाची राहून गेली असेल त्याना गव्हर्नर, राजप्रमुख, अथवा राष्ट्राध्यक्ष यानी जर मागून संमति दिली तर ते कायदे कायदेशीर ठरतात. २५५

प्रकरण २

राज्यकारभाराबाबतचे संबंध

सर्व साधारण योजना

संघराज्याच्या विधिमंडळानी केलेल्या कायद्याना मान देऊन घटक राज्यानी आपला राज्यकारभार चालविला पाहिजे. संघराज्याच्या कायद्याना मान मिळवा यासाठी घटकराज्याना जरूर ते आदेश देण्याचा संघराज्याला अधिकार आहे. २५६ संघराज्याच्या कारभारात अडथळा येऊ नये यासाठी घटकराज्यानी खबरदारी घ्यावयाची आहे आणि त्यासाठी त्याना तसे आदेश देण्याचा अधिकार संघराज्याला आहे.

युद्धदृष्ट्या आवश्यक असलेले दळणवळणाचे मार्ग व रेल्वेज निर्माण करणे व सुस्थितीत ठेवण्यासाठी योग्य वाटतील त्या आज्ञा घटक राज्याना करण्याचा अधिकार संघराज्याला आहे. यासाठी घटकराज्याला जास्त खर्च आला तर नुकसानीदाखल म्हणून आपसात ठरविलेली अथवा भारताच्या सरन्यायाधीशानी नेमलेल्या लवादानी ठरविलेली रक्कम संघराज्याने घटकराज्याला द्यावयाची आहे. २५७

राष्ट्राध्यक्ष हे घटकराज्यांच्या संमतीने घटकराज्याच्या सरकारी अधिकाऱ्याना संघराज्याने चालविण्याचे अधिकार, चालविण्यासाठी देऊ शकतात. ज्या बाबतीत घटकराज्यास कायदे करण्याचे अधिकार नाहीत अशा बाबतीत घटकराज्याच्या सरकारी नोकराना संघराज्य कायदे करून अधिकार चालविण्यास देऊ शकते आणि त्यांच्यावर कर्तव्यांची जबाबदारी टाकू शकते. असली कामे त्याना करावी लागल्यामुळे घटकराज्यास जास्त माणसे नेमणे वगैरे जो जादा खर्च येणार त्यासाठी नुकसान-भरपाई संघराज्याने द्यावयाची आहे. नुकसानीच्या आकड्याबद्दल दोन्ही राज्यांचे एकमत झाले तर ठीकच नाहीतर भारताच्या सर न्यायाधीशाने नेमलेल्या लवादाचा निर्णय दोघानी मान्य केला पाहिजे. २५८

संघराज्याच्या विधिमंडळानी कायदा करून दुसरी व्यवस्था करीपर्यंत राष्ट्राध्यक्षांच्या अनुमतीने हैद्राबाद, जम्मू व काश्मीर, मध्यभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानी संघ, राजस्थान, सौराष्ट्र त्रावणकोर व कोचीन आणि विंध्यप्रदेश या घटकानी घटना कायद्याचा अंमल सुरू होण्यापूर्वी त्यांची सैन्ये वगैरे होती तीच कायम ठेवावयाची आहेत. ही सैन्ये भारताच्या सैन्य वगैरेचा एक भाग म्हणून असणार. २५९

भारताच्या बाहेरच्या एखाद्या सरकारशी करार करून त्या प्रदेशातील राज्यकारभार, कायदे करण्याची सत्ता व न्यायदानाची कामे यांचा अंगीकार संघराज्य करू शकेल पण या गोष्टी त्या बाबतीत केलेल्या कायद्यानी नियंत्रित राहतील. २६०

संघ व घटकराज्ये यांची सार्वजनिक कृत्ये, या कृत्यांच्या नोंदी आणि न्यायालयातील कामकाज याना भारतात सर्वत्र मान्यता दिली गेली पाहिजे. ही कृत्ये, या नोंदी आणि ही कामे न्यायालयांचे पुढे कशा पद्धतीने शाबीत केली जावीत हे संघराज्याच्या विधिमंडळांनी कायदे करून ठरवावयाचे आहे. भारताच्या एका भागातील कोर्टांच्या निकालांची अंमलबजावणी ही भारताच्या दुसऱ्या कोणत्याही भागात कायद्याने करिता येईल.२६१ दोन किंवा अनेक घटाकातून वाहणाऱ्या नदीच्या पाण्याचा उपयोग, पाण्याची वाटणी किंवा पाणी अडविणे वगैरे संबंधाने वाद उपस्थित झाल्यास या वादाचा निर्णय लवादामार्फत व्हावा अशी योजना संघराज्याची विधिमंडळे कायदा करून करू शकतात. त्याचप्रमाणे असा वाद वरिष्ठ न्यायालय किंवा इतर कोणत्याही कोर्टापुढे नेता येणार नाही असाही कायदा करिता येतो २६२

घटकराज्यांच्या मधील वादग्रस्त प्रश्नांची चौकशी करणे व त्यांचेबद्दल सल्ला देणे, ज्या प्रश्नामध्ये संघराज्य व इतर घटक अथवा दोन किंवा दोहापेक्षा जास्त घटकांचा संबंध येत आहे अशा प्रश्नांची चर्चा करणे व घटकांच्यामध्ये सहकार्य कसे करिता येईल याबद्दल सूचना देणे ही कार्ये करण्यासाठी एखाद्या मंडळाची नेमणूक करणे सार्वजनिक हिताचे होईल असे वाटल्यास त्यासाठी आज्ञापत्र काढून मंडळ नेमणे, या मंडळाची कर्तव्ये त्याची घटना व त्याची कार्यपद्धति निश्चित करणे हे अधिकार राष्ट्राध्यक्षांना आहेत.२६३

भाग १२

पैसा, मिळकती, करार व दावे

प्रकरण १ लें

पैशासंबंधी

घटना अमलात आल्यापासून दोन वर्षाच्या आत राष्ट्राध्यक्षांनी आर्थिक प्रश्नासाठी एक सल्लागार मंडळ नेमावयाचे आहे. या मंडळाच्या सदस्यांची मुदत जास्तीत-

जास्त पाच वर्षांची राहील. या मुदतीनंतर राष्ट्राध्यक्षांनी पुनश्च नवीन सल्लागार मंडळ नेमिले पाहिजे. या मंडळाला एक चेअरमन असणार व चार दुसरे सभासद असतील.

कोणाला या सल्लागार मंडळावर नेमिता येईल आणि त्याना कसे नियुक्त केले जाईल हे संघराज्याच्या विधिमंडळानी कायदे करून ठरवावयाचे आहे.

ज्या करापासून होणाऱ्या उत्पन्नाची वाटणी संघराज्य व घटक राज्ये यांच्यामध्ये व्हावयाची आहे त्याच्यामध्ये ती वाटणी कशा प्रकारे व्हावी, भारताच्या कन्सॉलिडेटेड फंडामधून घटक राष्ट्राना कोणत्या तत्त्वाप्रमाणे मदत व्हावी, भारत सरकारने हैद्राबाद, काश्मीर व जम्मू, मध्यभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानी संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर व कोचीन आणि विंध्यप्रदेश या घटकांशी केलेल्या करारांच्या अटी कायम ठेवाव्यात का त्यात बदल करावेत आणि कोणते करावेत यासंबंधाने राष्ट्राध्यक्षाना सल्ला देणे व इतर बाबतीत त्यानी सल्ला मागितल्यास तो देणे हे या मंडळाचे कर्तव्य असणार.

या मंडळाची कार्यपद्धति काय असावी हे मंडळाने ठरवावयाचे आहे आणि त्याना आपले कार्य नीट रीतीने करिता येण्यासाठी त्याना कोणते अधिकार द्यावयाचे हे संघराज्याची विधिमंडळे कायदे करून ठरवितील. २८० या मंडळाने केलेली प्रत्येक सूचना तिचे स्पष्टीकरण आणि या सूचनेप्रमाणे पुढे काय कार्य करण्यात आले ये सर्व गोष्टी राष्ट्राध्यक्ष संघराज्याच्या विधिमंडळापुढे ठेवितील. २८१

कोणताही कर बसवावयाचा अथवा वसूल करावयाचा तो कायद्याप्रमाणेच बसविला पाहिजे आणि वसूल केला पाहिजे २६५

संघराज्याची विधिमंडळे कायदा करून भारताचा एक कॉन्टिंजन्सी फंड निर्माण करू शकतील. या फंडात कोणत्या रकमा जमा व्हावयाच्या हे ती विधिमंडळे कायदे करून ठरवितील व हा फंड राष्ट्राध्यक्षांच्या हवाली केला जाईल. ज्या अनपेक्षित खर्चांना संघराज्याच्या विधिमंडळाची मंजुरी मिळेपर्यंत थांबण्यास सवड नाही असे अनपेक्षित खर्च राष्ट्राध्यक्षांनी या फंडातून करावयाचे आहेत.

अजमेर, भोपाळ, बिलासपूर, कुचबिहार, कूर्ग, दिल्ली, हिमाचल प्रदेश, कच्छ, मणिपूर, त्रिपुरा व अंदमान आणि निकोबार बेटे याखेरीज बाकीच्या घटकराज्याच्या विधिमंडळाना कायदा करून घटकराज्याचा कॉन्टिंजन्सी फंड निर्माण करिता येईल. या फंडात कोणत्या रकमा जमा व्हाव्यात हे ही विधिमंडळे वेळोवेळी कायदे करून ठरवितील. या फंडाची रक्कम गव्हर्नर अथवा राजप्रमुख यांच्या हवाली केली

जाईल. ज्या अनपेक्षित खर्चासाठी विधिमंडळांची मंजुरी मिळेपर्यंत वाट पाहण्यास सवड नाही असा खर्च गव्हर्नर अथवा राजप्रमुख यानी या फंडातून करावयाचा आहे. २६७

भारताच्या कॉन्टिन्जन्सी फंडात जमा करावयाच्या रकमा आणि अजमेर, भोपाळ, बिलासपूर, कुचबिहार, कूर्ग, दिल्ली, हिमाचल प्रदेश, मणिपूर, त्रिपुरा, अंदमान व निकोबार या घटकाखेरीज बाकीच्या घटकराज्याना करातून वसूल होणारे जे उत्पन्न द्यावयाचे हे सर्व सोडून भारत सरकारला मिळणारे सर्व उत्पन्न, सरकारने ट्रेझरी बिल्स काढून अथवा अन्य उपायानी उभारलेले सर्व कर्ज आणि कर्जाच्या फेडीत मिळणाऱ्या सर्व रकमा या सर्वांचा मिळून एक भारताचा कन्सॉलिडेटेट फंड होणार आहे.

घटकराज्याला मिळणारे सर्व उत्पन्न, घटकराज्यानी ट्रेझरी बिल्सच्या द्वारा अथवा अन्य उपायाने काढिलेले सर्व कर्ज आणि कर्जाच्या फेडीत मिळालेल्या सर्व रकमा मिळून एक घटकराज्याचा कन्सालिडेटेड फंड होणार आहे. यातून घटकराज्याच्या कॉन्टिन्जन्सी फंडाला द्यावयाच्या त्या रकमा वगळण्यात येणार आहेत.

भारताच्या अथवा घटकराज्याच्या कन्सॉलिडेटेड फंडाच्या रकमांचा विनियोग फक्त कायद्यानेच करिता येईल. २६६

ज्या औषधींचे बद्दल आणि टॉयलेटच्या साधनांच्या बद्दल फक्त संघराज्याच्या विधिमंडळांना कायदे करण्याचे अधिकार आहेत त्यांचे वरील स्टँप एक्साईज कर हा अजमेर, भोपाळ, बिलासपूर, कुचबिहार, कूर्ग, दिल्ली, हिमाचल प्रदेश, कच्छ मणिपूर, त्रिपुरा व अंदमान आणि निकोबार या घटकांचे पुरते भारतसरकारने गोळा करावयाचे आहेत आणि इतर घटकांच्या बाबतीत ते गोळा करण्याचे कामही घटकराज्यानीच करावयाचे आहे आणि ते पैसेही त्या घटकराज्यानाच मिळावयाचे आहेत. ते पैसे भारताच्या कन्सॉलिडेटेड फंडात सामील व्हावयाचे नाहीत. २६८

बिनशेतीच्या जमिनींचे वारसाचे कर व इस्टेटीचे कर, माल व उतारूंच्या वाहतुकीवरील कर, रेल्वे भाड्यावरील कर, स्टॉक एकसचेंज व वायदेबाजार यातील स्टँपाखेरीज इतर कर, वृत्तपत्रे आणि त्यातील जाहिरातीवरील कर हे संघराज्याने बसवावयाचे आणि वसूल करावयाचे आहेत पण हे पैसे भारताच्या कन्सॉलिडेटेड फंडात जमा न करिता ते आसाम, बिहार, मुंबई, मध्यप्रदेश, मद्रास, ओरिसा, पंजाब, युक्तप्रांत (उत्तर प्रदेश) व पश्चिम बंगाल आणि हैद्राबाद, काश्मीर व जम्मू, मध्यभारत, म्हैसूर,

पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानांचा संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर व कोचीन व विंध्यप्रदेश या घटकाना संघराज्याच्या विधिमंडळानी ठरविलेल्या प्रमाणात वाटून द्यावयाचे आहेत.

शेती आणि कॉर्पोरेशन्स वरील कर हे सोडून बाकीचे सर्व प्राप्तीवरील कर हे संघराज्याने बसवावयाचे आहेत आणि वसूलही पण करावयाचे आहेत

या उत्पन्नापैकी कोणता भाग अजमेर, भोपाळ, बिलासपूर, कुचबिहार, कूर्ग, दिल्ली, हिमाचल प्रदेश, कच्छ, मणिपूर, त्रिपुरा आणि अंदमान व निकोबार या घटकातून वसूल झाला असे समजावयाचे हे राष्ट्राध्यक्षानी आर्थिक सल्लागार मंडळाची नेमणूक होईपर्यंत स्वतःच्या विचाराने ठरवावयाचे आहे आणि मंडळाची नेमणूक झाल्यावर त्याचा विचार घेऊन ठरवावयाचे आहे.

अशा उत्पन्नाच्या बाकीच्या भागापैकी किती भाग भारताच्या कन्सॉलिडेटेड फंडात जमा करावयाचा आणि किती भाग आसाम, बिहार, मुंबई, मध्यप्रदेश, मद्रास, ओरिसा, पंजाब, युक्तप्रांत (उत्तर प्रदेश) आणि पश्चिम बंगाल व हैद्राबाद, काश्मीर व जम्मू, मध्यभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानांचा संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर व कोचीन आणि विंध्य प्रदेश या घटकांच्या मध्ये वाटून द्यावयाचा आणि कोणत्या प्रमाणात वाटून द्यावयाचा हे राष्ट्राध्यक्षांनी आर्थिक सल्लागार मंडळ स्थापन झाल्यावर त्याच्या सल्ल्याने व तोपर्यंत स्वतःच्या बुद्धीने ठरवावयाचे आहे. २७०

वर उल्लेखिलेल्या करात भारत सरकारच्या उपयोगासाठी कायद्याने वाढ करण्याचा अधिकार संघराज्याच्या विधिमंडळाना आहे आणि अशा करवाढीमुळे होणारे सर्व उत्पन्न भारताच्या कन्सॉलिडेटेड फंडामध्ये जमा होईल. औषधि आणि टॉयलेटची साधने वगळून एक्साईजचे जे कर फक्त संघराज्याला वसूल करिता येतात ते सर्व कर भारत सरकारने वसूल करावयाचे आहेत. या करांच्या निव्वळ उत्पन्नापैकी कोणकोणता भाग आसाम, बिहार, मुंबई, मध्यप्रदेश, मद्रास, ओरिसा, पंजाब, युक्तप्रांत, (उत्तर प्रदेश) व पश्चिम बंगाल आणि हैद्राबाद, काश्मीर व जम्मू, मध्यभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानी संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर व कोचीन आणि विंध्य प्रदेश या घटकाना भारताच्या कन्सॉलिडेटेड फंडातून काढून द्यावयाचा हे संघराज्याच्या विधिमंडळानी कायदे करून ठरवावयाचे आहे. २७२

घटना अमलात आल्यापासून दहा वर्षेपर्यंत किंवा भारत सरकारने ज्यूट व ज्यूटपासून तयार झालेल्या पदार्थांचेवर निर्यात कर घेण्याचे या मुदतीचे पूर्वी बंद

केल्यास तेथपर्यंत भारत सरकारने, राष्ट्राध्यक्ष आर्थिक सल्लागार मंडळाला विचारून किंवा ते स्थापन झाले नाही तोपर्यंत स्वतःच्या मताने ठरवितील त्या रकमा दर वर्षी या उत्पन्नाचा भाग म्हणून आसाम, बिहार, ओरिसा आणि पश्चिम बंगाल या घटकाना द्यावयाच्या आहेत. या रकमा देण्याचा बोजा भारताच्या कन्सॉलिडेटेड फंडावर लादलेला आहे. २७३

ज्या बिलानी अथवा दुरुस्त्यानी घटकराज्यांचा ज्यात संबंध येत आहे अशा करामध्ये बदल केला जातो किंवा प्राप्तीवरील कराच्या दृष्टीने केलेली शेतीच्या उत्पन्नाची व्याख्या बदलली जाते, अथवा ज्या तत्त्वांचेवर घटकराज्यांचेमध्ये उत्पन्नाची विभागणी केली जाते किंवा भारताच्या हिताच्या दृष्टीने करवाढ (Surcharge) केली जाते अशी बिले अथवा अशा दुरुस्त्या राष्ट्राध्यक्षांच्या शिफारसीवाचून संघराज्याच्या विधिमंडळाना विचारात घेता येणार नाहीत. २७४

घटकराज्यानी जर संघराज्याच्या संमतीने शेड्यूल्ड जातींच्या व क्षेत्राच्या सुधारणाच्या योजना हाती घेतल्या तर या योजनासाठी त्याना जो जादा खर्च लागेल त्याप्रीत्यर्थ भारताच्या कन्सॉलिडेटेड फंडातून त्याना एकदम अथवा दर वर्षी अशा रकमा दिल्या गेल्या पाहिजेत.

घटना अंमलात येण्याचे पूर्वी आसाममधील शेड्यूल्ड जाती व क्षेत्रे यांच्यापासून होणाऱ्या उत्पन्नापेक्षा गेल्या दोन वर्षात ज्या जास्त रकमा त्यांच्यावर सरासरीने खर्च केल्या जात होत्या तेवढ्या रकमा आणि जातींची आणि क्षेत्राची इतर लोकांच्या इतकी सुधारणा करण्यासाठी आसामने भारत सरकारच्या संमतीने ज्या योजना हाती घेतल्या असतील त्यांचा खर्च भागेल एवढ्या रकमा मदत म्हणून संघराज्याने भारत सरकारच्या कन्सॉलिडेटेड फंडातून आसामला दिल्या पाहिजेत.

याशिवाय ज्या घटकराज्याना भारत सरकारकडून मदत पाहिजे असेल त्याना भारताच्या कन्सॉलिडेटेड फंडातून किती व कशी मदत मिळावयाची हे प्रायः संघराज्याच्या विधिमंडळानी कायदे करून ठरवावयाचे आहे. असे कायदे जोपर्यंत करण्यात आले नाहीत तोपर्यंत या गोष्टी राष्ट्राध्यक्षांनी आर्थिक सल्लागार मंडळाचा (ते अस्तित्वात आले नाही तोपर्यंत स्वतःच्या बुद्धीने) सल्ला घेऊन ठरवावयाच्या आहेत. २७५

सर्वसाधारणतः प्राप्तीवर कर आकारण्याचा जरी घटकराज्याना अधिकार नसला तरी सुद्धा स्थानिक स्वराज्याच्या (म्युनिसिपॅलिटया, लोकल बोर्डस इत्यादि) संस्थांच्या

फायद्यासाठी म्हणून उद्योगधंदे नोकऱ्या इत्यादीवर कर बसविण्याचा त्याना अधिकार आहे पण हा कर साधारणपणे एका व्यक्तीला एका वर्षात अडीचशे रुपायापेक्षा जास्त द्यावा लागू नये. घंटना सुरू होण्याच्या पूर्वीच्या वर्षी जर हा कर अडीचशे रुपया-पेक्षा जास्त असला तर मात्र संघराज्याच्या विधिमंडळानी कायदा करून त्यात बदल करीपर्यंत तो तसा घेत राहण्यास हरकत नाही.२७६

घटना कायदा अमलात येण्यापूर्वी जे कर वगैरे घटक सरकारांच्या कायद्याप्रमाणे वसूल केले जात होते ते जरी नव्या घटनेप्रमाणे झालेल्या कायदे करण्याच्या सत्तेच्या विभागणीत बसत नसले तरी जोपर्यंत संघराज्याच्या विधिमंडळानी कायदे करून त्यात बदल केला नाही तोपर्यंत ते पूर्वीप्रमाणेच वसूल करून त्यांचा पूर्वीप्रमाणेच विनियोग करावयास हरकत नाही.२७७

हैद्राबाद, जम्मू व काश्मीर, मध्यभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानी संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर-कोचीन व विंध्य प्रदेश या घटकातील पूर्वीच्या संस्थानिकाना त्यांच्याशी झालेल्या कराराप्रमाणे खानगी म्हणून जे उत्पन्न भारताच्या कन्सॉलिडेटेड फंडातून मिळावयाचे असते त्यापैकी त्या त्या घटकाने खर्च किती सोसावयाचा यासंबधाने, व भारत सरकारने कर वगैरे बसविल्यामुळे त्या घटकाचे जे आर्थिक नुकसान होते ते भरून काढण्यासाठी त्याना मदत म्हणून भारत सरकारने किती मदत द्यावयाची यासंबंधाने व या घटकराज्यात संघराज्याने कर कसे बसवावयाचे त्यांची वसुली कशी करावयाची आणि त्यापैकी किती भाग घटकराज्याना द्यावयाचा या संबधाने या घटकराज्याशी करार करण्याचा संघराज्याला अधिकार आहे. अशा कराराचा अंमल घटना अमलात आल्या पासून दहा वर्षांपेक्षा जास्त राहू शकणार नाही परंतु आर्थिक सल्लागार मंडळ अस्तित्वात आले म्हणजे त्याच्या सल्ल्याने राष्ट्राध्यक्ष अशा कराराला पाच वर्षे झाली म्हणजे तो रद्द करू शकतील किंवा त्याच्या अटीत फेरबदल करू शकतील.२७८

एखाद्या कराचे निव्वळ उत्पन्न याचा अर्थ तो वसूल करण्यासाठी लागलेला खर्च त्या उत्पन्नातून वजा करून जी रक्कम शिल्लक राहील ती. ही रक्कम प्रत्यक्षात किती रहाते हे भारत सरकारच्या मुख्य हिशेबतपासनीसानी ठरवावयाचे आहे आणि या बाबतीत त्यानी दिलेला निकाल हा अखेरचा निकाल म्हणून मानिला जावयाचा आहे. पण कराच्या उत्पन्नाचा हिशेब कसा केला जावा हे त्या बाबतीतल्या संघराज्याच्या

विधिमंडळाने केलेल्या कायद्याने अथवा राष्ट्राध्यक्षांनी केलेल्या हुकुमाअन्वये सुद्धा ठरू शकेल. २७९

संकीर्ण आर्थिक योजना.

ज्या बाबतीत संघराज्याला अथवा घटकराज्याला कायदे करण्याचा हक्क नाही अशा बाबीतसुद्धा सार्वजनिक उपयोगासाठी म्हणून खर्च मंजूर करण्याचा अधिकार त्या त्या राज्याच्या विधिमंडळाना आहे. २८२

भारताच्या कन्सॉलिडेटेड व कॉन्टिन्जन्सी फंडांच्या रकमा कोणाच्या ताब्यात राहावयाच्या, या फंडात रकमांची भर कशी टाकावयाची, त्यातून पैसे कसे काढावयाचे, या फंडात न समाविष्ट होणाऱ्या पण भारत सरकारच्या मालकीच्या पैशांचा ताबा कोणाकडे असावयाचा, ते पैसे भारत सरकारच्या खात्यात कसे जमा व्हावयाचे आणि त्यातून पैसे कसे काढावयाचे वगैरे सर्व बाबी संघराज्याच्या विधिमंडळानी कायदे करून ठरवावयाच्या आहेत आणि असे कायदे होईपर्यंत या बाबी राष्ट्राध्यक्षांनी केलेल्या नियमानी ठरावयाच्या आहेत.

घटकराज्याच्या कन्सॉलिडेटेड व कॉन्टिन्जन्सी फंडांच्या रकमा कोणाच्या ताब्यात राहावयाच्या, या फंडात रकमांची भर कशी टाकावयाची, त्यातून पैसे कसे काढावयाचे, या फंडात न समाविष्ट होणाऱ्या पण घटकराज्याच्या मालकीच्या पैशांचा ताबा कोणाकडे असावयाचा, ते पैसे घटकराज्याच्या खात्यात कसे जमा व्हावयाचे आणि त्यातून पैसे कसे काढावयाचे वगैरे सर्व बाबी घटकराज्याच्या विधिमंडळानी कायदे करून ठरवावयाच्या आहेत आणि असे कायदे होईपर्यंत या बाबी गव्हर्नर अथवा राजप्रमुख यानी केलेल्या नियमानी ठरावयाच्या आहेत. २८३

संघराज्य अथवा घटकराज्य यानी उभारलेली कर्जे आणि त्याना येणारा वसूल याखेरीज, संघराज्याच्या अथवा घटकराज्याच्या मालकीच्या ज्या ज्या रकमा सरकारी अधिकाऱ्यांचे हाती आल्या असतील अथवा कोर्टात आल्या असतील त्या त्या रकमा भारत सरकारच्या अथवा घटकराज्याच्या सरकारच्या खात्यात जमा करण्यात आल्या पाहिजेत. २८४

संघराज्याच्या सरकारच्या मिळकतीवर संघराज्याच्या विधिमंडळानी परवानगी दिल्यावाचून घटकराज्यात कर बसविता येणार नाहीत पण घटना अमलात येण्याचे वेळी जे कर बसलेले असतील त्यात संघराज्याच्या विधिमंडळानी बदल करीपर्यंत ते कर वसूल करण्यास हरकत नाही. २८५

ज्या वस्तु जीवनाला आवश्यक आहेत असे संघराज्याच्या विधिमंडळानी कायदे करून जाहीर केले आहे अशा वस्तूंच्या खरेदीविक्रीवर घटकराज्याने कर बसविला तर तो राष्ट्राध्यक्षांच्या संमतीवाचून कायदेशीर होणार नाही.

ज्या मालाच्या खरेदीविक्रीवर घटकराज्याने कर घेणे घटना कायद्याने बेकायदेशीर ठरते अशा मालाच्या खरेदीविक्रीवर घटना सुरू होण्याचे वेळी जर एखादे घटकराज्य कर वसूल करीत असले तर त्या घटकराज्याला ३१ मार्च १९५१ पर्यंत तसे करीत राहाण्यास राष्ट्राध्यक्ष परवानगी देऊ शकतील. दोन घटकराज्यात व्यापार करण्याच्या दृष्टीने मालाची जी खरेदी विक्री होते तिच्यावर कर बसविण्यास संघराज्याच्या विधिमंडळानी परवानगी दिली तरच घटकराज्य कर बसवू शकते.

मालाची जो खरेदी किंवा विक्री घटकराज्याच्या बाहेर झाली असेल किंवा मालाची भारतात आयात किंवा निर्यात करण्यासाठी जी खरेदीविक्री करावी लागली असेल तिच्यावर कायदे करून कर बसविण्याचा घटकराज्याना अधिकार नाही. पण जर माल एखाद्या घटकराज्यात वापरण्यासाठीच विकत घेऊन त्या घटकराज्यात आणिला तर त्या मालाची त्या घटकराज्यातच खरेदी झाली असे समजून या खरेदीवर कर बसविण्याचा अधिकार या घटकराज्याला आहे. २८६

संघराज्याच्या विधिमंडळानी, कायदा करून परवानगी दिल्यावाचून घटकराज्य हे भारत सरकार अथवा आगगाड्या ज्या विजेचा उपयोग करीत आहे तिच्यावर कर बसवू शकणार नाही. संघराज्याच्या विधिमंडळाने परवानगी दिल्यामुळे अशा विजेवर जर कर बसविण्यात आला तर अशा कर बसविण्याच्या कायद्यात अशी योजना असली पाहिजे की त्या कराची आकारणी हिशेबात धरून सरकारला ती वीज इतर सामान्य माणसाला ज्या दरात पडते त्याच्यापेक्षा महाग लागता कामा नये. २८७

दोन घटकराज्यांच्या मधून वाहणाऱ्या नदीचे साठविलेले पाणी किंवा त्यापासून उत्पन्न केलेली वीज यावर घटकराज्य घटना अमलात येण्याच्या वेळी जर कर घेत असेल तर राष्ट्राध्यक्षांच्या परवानगीवाचून त्याला कर घेत राहणे चालू ठेविता येणार नाही. घटना अमलात येण्याचे वेळी जो कर घटकराज्य अशा पाण्यावर अथवा विजेवर घेत नव्हते असा नवा कर घटकराज्य बसवू इच्छित असेल तर त्याला सुद्धा राष्ट्राध्यक्षांची परवानगी पाहिजे. २८८

घटकराज्याची मिळकत आणि घटकराज्याचे उत्पन्न यावर संघराज्याला कर बसविता येणार नाही पण घटकराज्याने एखादा धंदा किंवा व्यापार सुरू केला तर त्यावर कर

घेण्यास संघराज्य मोकळे आहे. कोणत्या गोष्टी करणे म्हणजे घटकराज्याच्या नेहमीच्या कर्तव्याचा एक भाग आहे आणि कोणत्या गोष्टी करणे म्हणजे घटकराज्याने आपली नेहमीची कर्तव्ये सोडून उद्योगधंद्यात किंवा व्यापारात भाग घेणे आहे हे ठरविण्याचे काम संघराज्याच्या विधिमंडळाचे आहे. २८९

ज्या वेळी घटना कायद्याप्रमाणे एखाद्या कोर्टाचा अथवा कमिशनचा खर्च किंवा एखाद्या सरकारी नोकराचे पेन्शन यांचा बोजा भारताच्या अथवा एखाद्या घटकराज्याच्या कन्सॉलिडेटेड फंडावर लादलेला असेल आणि अशा कोर्टाचा अथवा कमिशनचा उपयोग संघराज्य व घटकराज्य किंवा अनेक घटकराज्याना झाला असेल किंवा अशा सरकारी नोकराने संघराज्य व घटकराज्य किंवा एकापेक्षा जास्त घटकराज्ये यांची नोकरी केलेली असेल, त्यावेळी अशा कोर्टाच्या अथवा कमिशनच्या खर्चाचा अथवा अशा इसमाच्या पेन्शनचा भार संघराज्याने किती उचलावयाचा आणि घटकराज्याने किती उचलावयाचा अथवा निरनिराळ्या घटकराज्यानी किती उचलावयाचा हे त्या त्या राज्यानी आपसात करार करून ठरवावयाचे आहे आणि त्यांचे आपसात या बाबतीत एकमत होत नसेल तर भारताच्या सरन्यायाधीशानी नियुक्त केलेल्या लवादाचा निर्णय सर्वांनी मानावयाचा आहे. २९०

घटना सुरू होण्याचे पूर्वी ज्या हिंदी संस्थानिकांनी हिंदुस्थान सरकारशी तह अथवा करार केले आहेत आणि ज्याना वार्षिक तनखा खासगी खर्चासाठी म्हणून देण्याची जबाबदारी हिंदुस्थान सरकारने पत्करलेली आहे त्याना द्यावयाच्या वार्षिक तनख्याचा बोजा भारत सरकारच्या कन्सॉलिडेटेड फंडावर लादला जाईल. संस्थानिकाना मिळणाऱ्या या उत्पन्नावर इन्कमटॅक्स घेता येणार नाही. अशा संस्थानिकांची संस्थाने सध्याच्या आसाम, बिहार, मुंबई, मध्यप्रदेश, मद्रास, ओरिसा पंजाब, युक्तप्रांत व पश्चिम बंगाल किंवा हैद्राबाद, काश्मीर व जम्मू, मध्यभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानांचा संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर व कोचीन व विंध्य प्रदेश या घटकराज्यात मोडत असतील तर या संस्थानिकांना देण्यात येणाऱ्या तनख्याचा भार संघराज्याने किती आणि किती दिवस उचलावयाचा आणि घटकराज्याने किती उचलावयाचा हे त्यांच्या आपसातल्या कराराने ठरेल आणि जेथे करार नाहीत तेथे राष्ट्राध्यक्षांच्या हुकमाने ठरेल. घटकराज्यानी द्यावयाची ही रक्कम त्यांच्या कन्सॉलिडेटेड फंडांतून द्यावयाची आहे. २९१

प्रकरण २

कर्ज काढणे.

संघराज्याच्या विधिमंडळानी कायदे करून ठरविलेल्या मर्यादेपर्यंत संघराज्य हे भारताच्या कन्सॉलिडेटेड फंडाच्या तारणावर कर्ज काढू शकेल अथवा हमी पतकरू शकेल. २९२

घटकराज्याच्या विधिमंडळानी कायदे करून ठरविलेल्या मर्यादेपर्यंत घटकराज्य हे आपल्या कन्सॉलिडेटेड फंडाच्या तारणावर कर्ज काढू शकेल अथवा हमी पतकरू शकेल.

संघराज्याच्या विधिमंडळानी कायदे करून ठरवून दिलेल्या अटीवर आणि ठरवून दिलेल्या मर्यादेत संघराज्य हे घटकराज्याना कर्ज देऊ शकेल अथवा घटकराज्यानी उभारलेल्या कर्जाबद्दल हमी घेऊ शकेल.

संघराज्याकडून घेतलेल्या कर्जाची किंवा ज्या कर्जाच्या परतफेडीची संघराज्याने हमी घेतली असेल अशा कर्जाची पूर्णपणे फेड झाली नसेल तर संघराज्याच्या परवानगीवाचून घटकराज्याला नवे कर्ज काढता येणार नाही. नवे कर्ज काढावयास परवानगी देताना भारत सरकार योग्य वाटतील त्या अटी घालू शकतील. २९३

प्रकरण ३

मिळकती, करार, अधिकार, कर्तव्ये, जबाबदाऱ्या व दावे.

घटना अमलात येण्याच्या पूर्वी हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकार यांच्या ज्या मिळकती होत्या, जे हक्क होते आणि ज्या जबाबदाऱ्या होत्या, त्या मिळकतींची मालकी, ते हक्क व त्या जबाबदाऱ्या आता त्या सरकारांच्या जागी आलेल्या संघराज्याच्या आणि घटकराज्याच्या सरकारांच्याकडे आलेल्या आहेत. २९४

जी कार्ये हल्ली संघराज्याच्या अधिकारक्षेत्रात मोडतात अशा कार्यासाठी हल्ली ज्यांची राज्ये हल्लीच्या हैद्राबाद, जम्मू व काश्मीर, मध्यभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानी संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर व कोचीन व विंध्य प्रदेश या घटकात समाविष्ट झाली आहेत अशा संस्थानिकांनी ज्या मिळकती धारण केल्या होत्या त्या मिळकतींची मालकी घटना कायद्याचा अंमल सुरू झाल्यावर संघराज्या-

कडे येईल. त्याचप्रमाणे याच घटकराज्यात समाविष्ट झालेल्या हिंदी संस्थानानी, हल्ली जी कार्ये संघराज्याच्या अधिकारक्षेत्रात मोडतात, त्या कार्यांचेसाठी जे हक्क प्राप्त करून घेतले असतील व ज्या जबाबदाऱ्या पतकरल्या असतील त्यांचा वारसा घटना अमलात आल्यानंतर संघराज्याकडे येईल व संघराज्य ते हक्क बजावील व त्या जबाबदाऱ्या पार पाडील. मात्र संघराज्यानी याबाबत जर घटकराज्याशी करार केला असेल तर या सर्व गोष्टी त्या कराराप्रमाणे करण्यात येतील.

वर उल्लेखिलेल्या मिळकती हक्क जबाबदाऱ्या खेरीज बाकीच्या या संस्थानिकांच्या मिळकती हक्क जबाबदाऱ्या वगैरे ज्या होत्या त्या सर्व ही घटना अमलात आल्यानंतर हैद्राबाद, काश्मीर व जम्मू, मध्यभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानी संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर व कोचीन व विंध्यप्रदेश यातील योग्य त्या घटकराज्यांकडे जातील. २९५

कोणाचा निर्वंश झाल्यामुळे अथवा मालक न उरल्यामुळे ज्या मिळकती एरवी हिंदुस्थान सरकारच्या अथवा संस्थानिकाच्या मालकीच्या झाल्या असत्या त्या मिळकती घटकराज्यात असल्या तर त्या घटकराज्याच्या मालकीच्या होतील आणि घटकराज्यात नसल्या तर भारत सरकारच्या मालकीच्या होतील. पण अशी मिळकत निर्वंश होण्याचे वेळी अथवा मालक उरला नाही अशी स्थिति येण्याचे वेळी जर काही कारणाने संघराज्याच्या ताब्यात असेल तर ती मिळकत संघराज्याच्या मालकीची होईल.२९६

भारताच्या किनाऱ्यापासून तीन मैलाच्या आतील टापूत समुद्राच्या तळाशी जे खनिज पदार्थ अथवा मौल्यवान पदार्थ असतील आणि जी जमीन असेल तिची मालकी संघराज्याची आहे. २९७

संघराज्याला आणि घटकराज्याना त्यांच्या विधिमंडळानी घालून दिलेल्या मर्यादांचे मध्ये आपआपल्या मिळकतीची विक्री करणे, त्यांची वासलात लावणे अथवा त्या गहाण टाकणे, नवीन मिळकती विकत घेणे व करार करणे हे अधिकार आहेत. सरकारी कामासाठी घेतलेली मिळकत ही त्या त्या सरकारच्या मालकीची राहील. २९८

सरकारतर्फे जे करार वगैरे करण्यात यावयाचे आहेत ते राष्ट्राध्यक्ष, गव्हर्नर अथवा राजप्रमुख यांच्या नावाने करण्यात येऊन त्यांचेवर त्यानी त्यानी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यानी सह्या करावयाच्या आहेत. अशा तऱ्हेने या घटनेसाठी

अथवा सरकारसाठी केलेल्या गोष्टींचेबद्दल आणि दिलेल्या आश्वासनांचे बद्दल राष्ट्राध्यक्ष, गव्हर्नर अथवा राजप्रमुख यांच्यावर वैयक्तिक जबाबदारी मुळीच येणार नाही. २९९

सरकारतर्फे अथवा सरकारवर जे दावे नवे लागावयाचे अथवा जुने चालू असतील त्यात पक्षकार म्हणून आता हिंदुस्थान सरकारच्या ऐवजी संघराज्य असा उल्लेख येईल व प्रांतीय सरकार आणि हिंदी संस्थान यांचे ऐवजी घटकराज्य असा उल्लेख येईल. ३००

भाग १३ वा

भारतात व्यापार व दळणवळणावर या भागाने घातलेलेच निर्बंध येऊ शकतील दुसरे निर्बंध येऊ शकणार नाहीत. ३०१ भारताच्या हितासाठी मात्र योग्य वाटतील ते निर्बंध घालण्याचा अधिकार संघराज्याच्या विधिमंडळाना आहे. ३०२ संघराज्याच्या किंवा घटकराज्याच्या विधिमंडळानी कायदे करिताना व्यापार आणि दळणवळणावरचे निर्बंध यांच्या बाबतीत संघराज्य व घटकराज्ये यांचेमध्ये पक्षपात करिता कामा नये पण एखाद्या घटकात एखाद्या गोष्टीचा तुटवडा पडला असला तर त्यासाठी खास योजना करावयास हरकत नाही. ३०३ एका घटकराज्यातून दुसऱ्या घटकराज्यात आयात केलेल्या मालावर कर बसवावयास हरकत नाही पण हा कर स्वतःच्या घटकराज्यात तयार होणाऱ्या मालावर जेवढा असेल त्याच्यापेक्षा जास्त घेता यावयाचा नाही. सार्वजनिक हित संरक्षणार्थ निर्बंध घालिता येतात पण घटकराज्याच्या विधिमंडळात यासंबंधीची बिले अथवा दुरुस्त्या आणावयाच्या झाल्यास राष्ट्राध्यक्षांची परवानगी पाहिजे. ३०४ हे जे सगळे विवेचन झाले ते घटना अमलात आणिल्यानंतर नवीन जे जे कायदे केले जातील त्यांच्या संबंधी आहे. जुन्या कायद्यात राष्ट्राध्यक्षानी हुकूम काढून जोपर्यंत बदल केला नाही तोपर्यंत त्यांची अंमलबजावणी चालूच राहणार. ३०५ हैद्राबाद, जम्मू व काश्मीर, मध्यभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानी संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर व कोचीन व विंध्य प्रदेश या घटकाना मात्र ही घटना अमलात येण्याचे पूर्वी त्यांच्याशी जे करार झाले असतील त्या करारांच्या शर्तींना धरून त्यांच्या घटकातून बाहेर जाणाऱ्या किंवा त्या घटकात आत येणाऱ्या मालावर साधारणपणे १० वर्षेपर्यंत हे कर घेता येतील पण आर्थिक सल्लागार मंडळाने तसा सल्ला दिला तर राष्ट्राध्यक्ष पाच वर्षानंतर हे करार रद्द करू शकतील. ३०६

या भागातील निर्बंधांची व योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी अधिकारी नेमून त्याना योग्य ती सत्ता देण्याचे काम संघराज्याच्या विधिमंडळानी करावयाचे आहे. ३०७

भाग १४

संघराज्याचे व घटकराज्याचे नोकर.

प्रकरण १ ले

नोकर वर्ग

या भागातील योजना अजमेर, भोपाळ, बिलासपूर, कुचबिहार, कूर्ग, दिल्ली, हिमाचल प्रदेश, कच्छ, मणिपूर, त्रिपुरा, अंदमान व निकोबार बेटे या घटकांना लागू नाहीत. ३०८

सरकारी नोकरांची भरती कशी व्हावी, त्यांच्या नोकरीच्या अटी काय असाव्यात या गोष्टी विधिमंडळानी कायदे करून ठरवावयाच्या आहेत आणि असे कायदे जोपर्यंत झाले नाहीत तोपर्यंत या गोष्टी त्या बाबतीत राष्ट्राध्यक्ष, गव्हर्नर किंवा राजप्रमुख यानी किंवा त्यानी नियुक्त केलेल्या इसमानी केलेल्या नियमांचे प्रमाणे ठरावयाच्या आहेत. ३०९

संरक्षकदलातील नोकर किंवा संघराज्याचे मुलकी नोकर किंवा अखिल भारतीय सेवक वर्गाचे नोकर (All India Services) किंवा त्यांच्या जागी काम करीत असलेले नोकर केव्हाही काढून टाकण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षांना आहे.

घटकराज्याचे मुलकी नोकर अथवा त्यांचे जागी काम करणारे याना केव्हाही कामावरून दूर करण्याचा अधिकार त्या त्या घटकाचे गव्हर्नर अथवा राजप्रमुख याना आहे.

पण विशेष लायकीसाठी करार करून ज्याना सरकारी नोकरीत घेतलेले आहे त्याना त्यांच्या करारातील मुदत संपण्याचे आत रजा द्यावयाची झाल्यास राष्ट्राध्यक्ष, गव्हर्नर किंवा राजप्रमुख त्याना योग्य वाटेल ती नुकसान भरपाई देतील. दुर्वर्तनाबद्दल घरी बसविलेल्याना अर्थात् ही सवलत मिळणार नाही ३१०

सरकारी नोकराना मग ते संघराज्याचे असोत नाहीतर घटकराज्याचे असोत—काढून

टाकावयाचे झाल्यास त्याना ज्या अधिकाऱ्याने नेमले असेल त्या अधिकाऱ्याच्या खालच्या दर्जाचे अधिकारी हुकूम काढून नोकरीतून काढू शकत नाहीत.

सर्व साधारणपणे कोणाही सरकारी नोकराला नोकरीतून काढून टाकावयाचे झाले किंवा त्याचा दर्जा कमी करावयाचा झाला तर प्रथम त्याची बाजू मांडण्यास त्याला संधि दिली पाहिजे.

पण फौजदारी गुन्ह्यात शिक्षा झाल्यामुळे जर एखाद्याला नोकरीतून कमी करावयाचे असले किंवा त्याचा दर्जा कमा करावयाचा असला तर त्याला असली सवड देण्याचे कारण नाही. त्याचप्रमाणे एखाद्या वरिष्ठ अधिकाऱ्यास जर असे वाटले की इतकी सवड देणे शक्य होणार नाही, तर त्याने अशी सवड न देण्याची कारणे लिहून ठेविली पाहिजेत किंवा राष्ट्राध्यक्ष, गव्हर्नर अथवा राजप्रमुख याना जर असे वाटले की अशी सवड देणे राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने इष्ट होणार नाही तर अशी सवड न देता कोणाही सेवकास नोकरीवरून काढणे किंवा त्याचा दर्जा कमी करणे बेकायदेशीर होणार नाही. सवड देणे शक्य आहे का नाही याबद्दलचा वरिष्ठ अधिकाऱ्याचा निर्णय हा अखेरचा राहील. ३११

संघराज्य व घटकराज्ये यांच्यात सत्तेची जरी विभागणी झाली असली आणि संघराज्याला घटकराज्यांच्या कारभारात जरी ढवळाढवळ करिता येत नसली तरी सुद्धा संघराज्याच्या वरिष्ठ कायदेमंडळाने (यात घटकराज्यांचे प्रतिनिधि बहुसंख्येने असतात) $\frac{2}{3}$ बहुमताने जर असे ठरविले की अखिल भारतीय सेवकवर्ग निर्माण करणे हे देशाच्या हिताचे आहे, तर संघराज्याची विधिमंडळे कायदे करून असा सेवकवर्ग अस्तित्वात आणू शकतील. अशा वर्गात भरती कोणाची व्हावी व नोकरीच्या अटी काय असाव्यात हे या कायद्याने ठरविण्यात येईल.

आज अस्तित्वात असलेले इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिस व इंडियन पोलीस सर्व्हिस हे सेवकवर्ग हे वर उल्लेखिलेल्या अधिकारात संघराज्याच्या विधिमंडळानी निर्माण केलेले सेवकवर्ग आहेत असे समजण्यात येईल. ३१२

या घटना कायद्याखाली दुसऱ्या योजना होऊन त्या अमलात येईपर्यंत सरकारी नोकरांच्या बाबतीत पूर्वी लागू असलेले सर्व कायदे आणि नियम हे घटनेचा अंमल सुरू झाल्यानंतर सुद्धा लागू आहेत असे समजले जाईल पण या कायद्यापैकी अथवा नियमापैकी जे नव्या घटनेशी विसंगत असतील ते रद्द समजले जातील. ३१३

सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडियाशी झालेल्या करारान्वये (जुन्या आय. सी·

एस.मधील लोक) जे सरकारी नोकरीत शिरले आणि जे घटना अमलात येण्याचे वेळी संघराज्याच्या अथवा घटकराज्याच्या नोकरीत आहेत त्यांचे पगार, त्यांच्या रजा व पेन्शनच्या आणि वर्तणुकीसंबंधाच्या अटी यात शक्यतोवर बदल केला जाणार नाही. ३१४

प्रकरण २ रे

पब्लिक सर्व्हिस कमिशन

संघराज्याकरिता एक पब्लिक सर्व्हिस कमिशन असेल आणि प्रत्येक घटकराज्याकरिता एक एक पब्लिक सर्व्हिस कमिशन असणार पण दोन घटकराज्यांच्या विधिमंडळानी ठराव करून दोन घटकराज्यांचे मिळून एकच संयुक्त पब्लिक सर्व्हिस कमिशन असावे असे ठरविले तर दोन घटकराज्यांचे मिळून एक संयुक्त पब्लिक सर्व्हिस कमिशन असेल. एखाद्या घटकराज्याच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनचे काम संघराज्याच्या पब्लिक सर्व्हिस कमिशननेच करावे अशी जर त्या घटकराज्याच्या गव्हर्नरनी अथवा राजप्रमुखानी विनंति केली तर राष्ट्राध्यक्षांच्या परवानगीने संघराज्याचे पब्लिक सर्व्हिस कमिशन ते काम पाहू शकेल. ३१५

संघराज्याच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनचे व संयुक्त पब्लिक सर्व्हिस कमिशनचे चेअरमन व सदस्य यांची नेमणूक राष्ट्राध्यक्षांनी करावयाची आहे आणि घटकराज्याच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या चेअरमनची व सदस्यांची नेमणूक गव्हर्नर वा राजप्रमुख यानी करावयाची आहे. पण प्रत्येक पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या सदस्यापैकी निम्मे सदस्य तरी कमीत कमी दहा वर्षे सरकारी नोकरी केलेले असले पाहिजेत.

पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या सदस्यांची नेमणूक ही सहा वर्षांपुरती असणार पण संघराज्याच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनवर काम करणाराचे वय पासष्ट वर्षांचे वर असता कामा नये आणि इतर पब्लिक सर्व्हिस कमिशनवर काम करणाराचे वय साठाचे वर असता कामा नये. ज्याने एकदा पब्लिक सर्व्हिस कमिशनवर काम केले आहे त्यास पुनश्च त्याच पब्लिक सर्व्हिस कमिशनवर तेच काम करिता येणार नाही.

संघराज्याच्या अथवा संयुक्त पब्लिक सर्व्हिस कमिशनवर काम करणाराना राजीनामा द्यावयाचा झाल्यास तो त्यानी राष्ट्राध्यक्षांचेपाशी दिला पाहिजे आणि इतर

पब्लिक सर्व्हिस कमिशनवर काम करणाराना राजीनामा द्यावयाचा झाल्यास तो त्यानी गव्हर्नर अथवा राजप्रमुख यांचेजवळ दिला पाहिजे. ३१६

पब्लिक सर्व्हिस कमिशनचा कोणीही सदस्य नादार झाला, किंवा त्याने दुसरी एखादी आणखी नोकरी पत्करिली किंवा शारीरिक अथवा मानसिक दुर्बलतेमुळे तो काम करण्यास राष्ट्राध्यक्षांच्या मताने असमर्थ झाला तर त्याला राष्ट्राध्यक्ष कामावरून काढू शकतील. पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या कोणाही सदस्याने अयोग्य वर्तन केले असे वरिष्ठ न्यायालयाच्या चौकशीत सिद्ध झाले आणि तसे या न्यायालयाने राष्ट्राध्यक्षांना त्यानी सल्ला मागितल्यावरून कळविले तर राष्ट्राध्यक्ष अशा सदस्याला कामावरून दूर करू शकतात. वर उल्लेखिलेल्या चौकशीचे जर काम चालू असेल तर तेवढ्या मुदतीपर्यंत संघराज्याच्या अथवा संयुक्त पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या सदस्याला राष्ट्राध्यक्ष आणि इतर पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या सदस्याना गव्हनर अथवा राजप्रमुख नोकरीवरून दूर करू शकतील.

सरकारने दिलेल्या कंत्राटात अथवा केलेल्या करारात पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या सदस्याचें अंग आहे अथवा त्यापासून होणाऱ्या फायद्यात त्याचा भाग आहे असे उघडकीस आले तर ते त्या सदस्याचे अयोग्य वर्तन आहे असे समजले जाईल. अशा सदस्याला केवळ तो एखाद्या कंपनीचा शेअरहोल्डर म्हणून फायदा मिळत असला तर तेवढ्यामुळे त्याचे वर्तन गैर आहे असे समजले जाणार नाही. ३१७

संघराज्याच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या बाबतीत आणि संयुक्त पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या बाबतीत राष्ट्राध्यक्ष आणि दुसऱ्या कमिशन्सच्या बाबतीत गव्हर्नर अथवा राजप्रमुख हे नियम करून कमिशनच्या सदस्यांची संख्या, त्यांच्या नोकरीच्या अटी, त्यांच्या हाताखालच्या नोकरांची संख्या, त्यांच्या नोकरीच्या अटी इत्यादि गोष्टी ठरवितील पण एकदा एका माणसाला पब्लिक सर्व्हिस कमिशनचा सदस्य नेमिले म्हणजे त्याचा पगार किंवा त्याला मिळणाऱ्या सवलती या कमी करिता येणार नाहीत. ३१८

सेवानिवृत्त झाल्यानंतर संघराज्याच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या चेअरमनला संघराज्यात अथवा घटकराज्यांत कोणतीही सरकारी नोकरी करिता येणार नाही.

सेवानिवृत्त झाल्यानंतर घटकराज्याच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या चेअरमनला संघराज्याच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनचा चेअरमन किंवा सदस्य होता येईल किंवा दुसऱ्या घटकराज्याच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनचे चेअरमन होता येईल पण या

खेरीज संघराज्यांत किंवा घटकराज्यात दुसरी कोणतीही सरकारी नोकरी करिता येणार नाही.

सेवानिवृत्त झाल्यानंतर घटकराज्याच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या साध्या सदस्यास संघराज्याच्या अथवा घटकराज्याच्या कमिशनचे चेअरमन म्हणून काम करिता येईल पण संघराज्यात अथवा घटकराज्यात दुसरी कोणतीही सरकारी नोकरी करितां येणार नाही.

सेवानिवृत्त झाल्यानंतर घटकराज्याच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या साध्या सदस्यास दुसऱ्या कोणत्याही कमिशनचे चेअरमन होता येईल पण याव्यतिरिक्त संघराज्यात अथवा घटकराज्यांत कोणतीही सरकारी नोकरी करिता येणार नाही. ३१९

पब्लिक सर्व्हिस कमिशन्सनी संघराज्याकरिता आणि घटकराज्यांचे करिता, नोकरीसाठी आलेल्या उमेदवारांच्या परीक्षा घ्यावयाच्या आहेत. दोन अथवा अधिक घटकराज्याना ज्या वेळी विशेष लायकी असलेले नोकर नेमावयाचे असतील त्या वेळी त्यांच्या भरतीसाठी योजना आखून त्या पार पाडण्यात त्यानी जर संघराज्याच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनची मदत मागितली तर ती त्याना देण्यात आली पाहिजे.

बिन लष्करी कामासाठी नोकरांच्या भरतीच्या पद्धति, ज्या तत्त्वावर त्यांच्या नेमणुका व्हावयाच्या ती तत्त्वें कोणती असावीत, त्या नोकराना बढत्या केव्हा मिळाव्यात, त्यांच्या बदल्या कशा कराव्यात, त्यांची लायकी कशी ठरवावी, त्यांच्या शिस्तीसाठी व त्यानी करावयाच्या विनंत्या व अर्ज यासाठी कोणती कार्यपद्धति अवलंबावी, सरकारी नोकराने नोकरीत असताना केलेल्या कृत्याबद्दल फिर्याद झाल्यास त्या कामी त्याला आलेला खर्च त्याला कन्सॉलिडेटेड फंडातून कसा द्यावा. नोकरीत असताना त्याला इजा झाल्यास त्याबद्दल त्याला पेन्शन कसे व किती मिळावे इत्यादि बाबतीत त्या त्या पब्लिक सर्व्हिस कमिशनचा सल्ला घेण्यात आलाच पाहिजे. याशिवाय आणखी एखाद्या बाबतीत राष्ट्राध्यक्ष गव्हर्नर किंवा राजप्रमुख यानी सल्ला मागितला तर तो देणे हे पब्लिक सर्व्हिस कमिशनचे कर्तव्य आहे. कोणत्या बाबतीत पब्लिक सर्व्हिस कमिशन्सचा सल्ला घेण्याचे कारण नाही हे राष्ट्राध्यक्ष, गव्हर्नर अथवा राजप्रमुख नियम करून ठरवू शकतील. पण हे नियम त्या त्या विधिमंडळापुढे १४ दिवस आधी ठेविले जातील व विधिमंडळे त्यात दुरुस्त्या करू शकतील.

मागासलेल्या जातीचे प्रतिनिधि सरकारी नोकऱ्यातून पुरेशा प्रमाणात नाहीत असे

वाटल्यास त्यांच्यातील लायक लोक नेमण्याचा जो अधिकार घटनेने दिला आहे तो बजावीत असताना पब्लिक सर्व्हिस कमिशनचा सल्ला घेण्याचे कारण नाही ३२०

संघराज्याची व घटकराज्याची विधिमंडळे कायदे करून पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या कार्याची व्याप्ति वाढवू शकतात त्याचप्रमाणे त्यानी स्थानिक व सार्वजनिक संस्थांच्यासाठी तशाच स्वरूपाची कामे करावीत असे ठरवू शकतात. ३२१

पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या सदस्यांचे पगार, पेन्शन्स, भत्ते त्यांच्या हाताखालच्या नोकरांचे पगार, पेन्शन, भत्ते वगैरे सर्व खर्चांचा बोजा भारताच्या व त्या त्या राजघटकांच्या कन्सॉलिडेटेड फंडावर लादलेला राहील. ३२२

संघराज्याच्या पब्लिक सर्व्हिसेस कमिशनने प्रतिवर्षी आपल्या कामाचा रिपोर्ट राष्ट्राध्यक्षाना सादर करावयाचा आहे. ज्या बाबतीत या कमिशनचा सल्ला स्वीकारला गेला नाही त्या बाबतीत तो का स्वीकारला गेला नाही याच्या कारणासकट हा रिपोर्ट राष्ट्राध्यक्षानी संघराज्याच्या विधिमंडळाचे पुढे ठेवावयाचा आहे.

घटकराज्याच्या पब्लिक सर्व्हिस कमिशननी प्रतिवर्षी आपआपल्या कामाचा रिपोर्ट त्या त्या गव्हर्नर्सना अथवा राजप्रमुखाना सादर करावयाचा आहे. ज्या बाबतीत कमिशनचा सल्ला स्वीकारला गेला नाही त्या बाबतीत तो का स्वीकारला गेला नाही याच्या कारणासकट त्यानी तो रिपोर्ट विधिमंडळाचे पुढे ठेवावयाचा आहे. ३२३

भाग १५

निवडणुका

विधिमंडळांच्या निवडणुका व अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्या निवडणुकासाठी मतदारांच्या याद्या तयार करण्याचे कामावर देखरेख करणे, त्याना मार्गदर्शन करणे व त्याचे नियंत्रण करणे त्याचप्रमाणे निवडणुकांच्या बाबतीत उद्भवणाऱ्या तंट्यांचा निर्णय करणे यासाठी एक मंडळ नेमण्यात येईल.

या मंडळात सदस्य किती असावेत हे राष्ट्राध्यक्षांनी ठरवावयाचे आहे. संघराज्याच्या विधिमंडळानी कायदा करून ठरवून दिल्याप्रमाणे राष्ट्राध्यक्ष या मंडळाच्या सदस्यांच्या नेमणुका करितील आणि त्यापैकी एकाची प्रमुख (Chief Election Commissioner) म्हणून नेमणूक करितील.

निवडणुकांच्या पूर्वी राष्ट्राध्यक्ष मुख्य इलेक्शन कमिशनरना विचारून त्याना

यांच्या कामात मदत करण्यासाठी प्रांतिक (Regional Commissioner) नेमतील.

मुख्य इलेक्शन कमिशनर आणि प्रांतिक इलेक्शन कमिशनर यांच्या नोकरीची मुदत काय असावी आणि इतर अटी काय असाव्यात हे संघराज्याच्या विधिमंडळानी त्या बाबतीत केलेल्या कायद्याच्या अनुरोधाने राष्ट्राध्यक्ष ठरवितील.

पण मुख्य इलेक्शन कमिशनरला एकदा नेमले म्हणजे त्याला नोकरीवरून काढून टाकावयाचे झाल्यास संघराज्याच्या विधिमंडळानी दोन तृतीयांश बहुमताने मुख्य इलेक्शन कमिशनरवर गैरवर्तनाचा आरोप शाबीत झाला आहे असा ठराव करून राष्ट्राध्यक्षांनी इलेक्शन कमिशनरना नोकरीवरून काढून टाकावे अशी विनति केली पाहिजे. प्रांतिक इलेक्शन कमिशनर्संना नोकरीवरून काढून टाकावयाचे झाल्यास त्यासाठी मुख्य इलेक्शन कमिशनरनी तशी विनंति करावयास पाहिजे. इलेक्शन कमिशनरने कामासाठी हाताखाली माणसे पाहिजेत अशी विनंति केली म्हणजे राष्ट्राध्यक्ष, गव्हर्नर्स आणि राजप्रमुख यानी त्यांच्या दिमतीला पुरेशी माणसे दिली पाहिजेत. ३२४

प्रत्येक प्रादेशिक मतदारसंघासाठी एक मतदारांची यादी असली पाहिजे आणि धर्म, जाति अथवा लिंगभेद या कारणास्तव कोणत्याही व्यक्तीचे नाव या यादीतून गाळता येणार नाही. ३२५

प्रत्येक कनिष्ठ विधिमंडळाच्या निवडणुकीत वयाची एकवीस वर्षे पुरी झालेल्या व्यक्तीला मत देण्याचा अधिकार आहे. पण गुन्हेगार, डाके फिरलेले आणि लाचलुचपत करणारे याना मतदानाचा हक्क असू नये असे ठरविण्याचा अधिकार विधिमंडळाना आहे. ३२६

घटना कायद्याला अनुसरून विधिमंडळांच्या निवडणुकीच्या मतदारांच्या याद्या कशा कराव्यात, मतदारसंघ कसे बनवावेत इत्यादि गोष्टी कायदे करून संघराज्याच्या विधिमंडळानी वेळोवेळी ठरवावयाच्या आहेत. ३२७

अशा बाबतीत संघराज्याच्या विधिमंडळानी ज्या मुद्याबद्दल कायदे केले नसतील ते मुद्दे कायदे करून ठरविण्याचे काम घटकराज्यातील विधिमंडळे करतील. ३२८

मतदारसंघाच्या मर्यादा ठरविणारा किंवा कोणत्या मतदारसंघातर्फे किती प्रतिनिधि पाठवावेत हे ठरविणारा कायदा बेकायदेशीर आहे हा प्रश्न कोणत्याही कोर्टात उपस्थित करिता येणार नाही.

एखादी निवडणूक बेकायदेशीर ठरवावयाची असेल तर त्यासाठी विधिमंडळानी कायदा करून ठरवून दिलेल्या पद्धतीप्रमाणेच अर्ज केला पाहिजे. दुसऱ्या कोणत्याही पद्धतीने तिच्या कायदेशीरपणाचा प्रश्न उकरून काढिता येणार नाही. ३२९

भाग १६

काही वर्गाच्याकरिता खास योजना

संघराज्याच्या कनिष्ठ विधिमंडळात मागासलेल्या जाती व आसाममधील वन्य जाती यांच्यासाठी साधारणपणे त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा राखून ठेविल्या जातील. ३३०

अँग्लो इंडियन वर्गाचे पुरेसे प्रतिनिधि संघराज्याच्या कनिष्ठ विधिमंडळात आले नाहीत असे राष्ट्राध्यक्षाना वाटले तर ते दोन प्रतिनिधि नियुक्त करू शकतील.

आसाम, बिहार, मुंबई, मध्यप्रदेश, मद्रास, ओरिसा, पंजाब, युक्तप्रांत (उत्तर प्रदेश) व पश्चिम बंगाल आणि हैद्राबाद, काश्मीर व जम्मू, मध्यभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानी संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर व कोचीन व विंध्यप्रदेश या घटकराज्यांच्या कनिष्ठ विधिमंडळातून मागासलेल्या जातींच्या प्रतिनिधींचेसाठी जागा राखून ठेविल्या जातील. आसाममधील स्वायत्त टापूंच्या मागासलेल्या जातींच्या प्रतिनिधीसाठी कनिष्ठ विधिमंडळात जागा राखून ठेविल्या जातील. राखीव जागा साधारणपणे लोकसंख्येच्या प्रमाणात राखून ठेविल्या जातील.

एखाद्या घटकराज्याच्या कनिष्ठ विधिमंडळात अँग्लो इंडियन जमातीला पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले नाही असे गव्हर्नर अथवा राजप्रमुख याना वाटले तर ते त्या त्या जमातीच्या योग्य वाटतील तितक्या प्रतिनिधीना विधिमंडळावर नेमू शकतील. ३३२

पण राखीव जागांच्या या सर्व योजना घटना अमलात आल्यापासून फक्त दहा वर्षेच अमलात राहतील. ३३४ सरकारी नोकरवर्गाची कार्यक्षमता कमी होऊ न देता मागासलेल्या जातीना जेवढ्या नोकऱ्या देणे शक्य असेल तेवढ्याच दिल्या जातील. ३३५

रेल्वेज, कस्टम्स, पोस्ट व तारखाते यामध्ये पंधरा ऑगस्ट १९४७ रोजी ज्या प्रमाणात आणि ज्या सवलतीसह अँग्लो इंडियन जमातीला नोकऱ्या मिळत होत्या तशाच ही घटना अमलात आल्यापासून दोन वर्षेपर्यंत मिळत राहतील. त्यानंतर दर दोन वर्षांनी या जमातीसाठी राखून ठेविलेल्या जागांची संख्या शेकडा दहा टक्यानी

कमी केली जाईल आणि दहा वर्षे झाली म्हणजे खास सवलती अशा कोणत्याही राहणार नाहीत.

अँग्लो इंडियन जमातीसाठी काही जागा जरी राखून ठेविल्या असल्या तरी याशिवाय आणखी जागावर लायकीप्रमाणे त्यांच्या नेमणुका करण्यास कोणतीही अडचण नाही. ३३६

आसाम, बिहार, मुंबई, मध्यप्रदेश, मद्रास, ओरिसा, पंजाब, युक्तप्रांत (उत्तर प्रदेश) व पश्चिम बंगाल व हैद्राबाद, जम्मू व काश्मीर, मध्यभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानी संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर व कोचीन व विंध्य प्रदेश या घटकराज्यातून मार्च १९४८ अखेरपर्यंत अँग्लो इंडियन जमातीच्या शिक्षणासाठी जे आर्थिक साहाय्य मिळत होते तेच साहाय्य घटना अमलात आल्यापासून तीन वर्षे-पर्यंत मिळत राहील. यानंतर दर तीन वर्षांनी ही मदत शेकडा दहानी कमी कर-ण्यात येऊन शेवटी दहा वर्षानंतर या जमातीला खास सवलती अशा मिळणार नाहीत. पण ज्या शिक्षण संस्थाना हे आर्थिक साहाय्य मिळावयाचे त्यात दर वर्षी शेकडा चाळीस तरी इतर जमातींचे विद्यार्थी घेतले गेले पाहिजेत. ३३७

मागासलेल्या वर्गाच्या व जातींच्यासाठी राष्ट्राध्यक्षांनी एका खास अधिकाऱ्याची नेमणूक करावयाची आहे. घटनेप्रमाणे त्याना ज्या सवलती द्यावयास पाहिजेत त्या त्याना मिळत आहेत का नाहीत याची चौकशी करून त्याप्रमाणे त्याने राष्ट्राध्यक्षाना वेळोवेळी रिपोर्ट करावयाचे आहेत. हे रिपोर्ट राष्ट्राध्यक्ष संघराज्याच्या विधिमंडळाचे पुढे ठेवतील. मागासलेल्या जातीत अँग्लो इंडियन लोकांचा समावेश होतो असे समजावयाचे आहे आणि याशिवाय आणखी कोणाचा समावेश करावयाचा हे राष्ट्राध्यक्ष त्यासाठी नेमलेल्या कमिशनच्या रिपोर्टाचा विचार करून ठरवितील. ३३८

आसाम, बिहार, मुंबई, मध्यप्रदेश, मद्रास, ओरिसा, पंजाब, युक्तप्रांत व पश्चिम बंगाल त्याच प्रमाणे हैद्राबाद, काश्मीर व जम्मू, मध्यभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानी संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर व कोचीन, विंध्यप्रदेश या घटकराज्यातील शेड्यूल्ड जाती व शेड्यूल्ड प्रदेश यांची स्थिति कशी काय आहे याची चौकशी करण्यासाठी वाटल्यास घटना सुरू होऊन दहा वर्षांचे आत राष्ट्राध्यक्षानी एक चौकशी मंडळ नेमावे पण दहा वर्षांनी मात्र त्यानी तसे मंडळ नेमलेच पाहिजे. या मंडळात सदस्य किती असावेत त्यांचे अधिकार काय असावेत व मंडळाची कार्य-पद्धति काय असावी या सर्व गोष्टी राष्ट्राध्यक्षांनी ठरवावयाच्या आहेत.

या जातींच्या सुधारणासाठी कोणत्या योजना करावयाच्या व त्यांची अंमलबजावणी कशी करावयाची यासंबंधी घटकराज्याना आदेश देण्याचे अधिकार संघराज्याला आहेत.३३९

भारतातील मागासलेल्या जातींची सामाजिक व शैक्षणिक स्थिति कशी काय आहे, त्याना अडचणी कोणत्या येतात व त्या दूर कशा करावयाच्या, त्याना सहाय्य कोणते व कसल्या अटीवर द्यावे या सर्व गोष्टींची चौकशी करण्यास योग्य वाटतील तितक्या मंडळींचे कमिशन राष्ट्राध्यक्षानी नेमावयाचे असून त्यानी कोणत्या पद्धतीने काम करावे हे सुद्धा त्यानीच ठरवावयाचे आहे. कमिशनने राष्ट्राध्यक्षाना केलेला रिपोर्ट व त्यानंतर काय उपाययोजना केल्या याची माहिती राष्ट्राध्यक्षानी संघराज्याच्या विधिमंडळांचे पुढे ठेविली पाहिजे.३४०

गव्हर्नर व राजप्रमुख यांचा सल्ला घेऊन राष्ट्राध्यक्ष हे कोणत्याही घटकराज्यातील मागासलेले वर्ग कोणते व शेडयूल्ड जाती कोणत्या हें जाहीर करितील. कायदा करून संघराज्याची विधिमंडळे या जाहीरनाम्यात बदल करू शकतील पण दुसऱ्या कोणत्याही रीतीने या जाहीरनाम्यात बदल होऊ शकणार नाही.३४१–३४२

भाग १७

प्रकरण १ ले

संघराज्याची सरकारी भाषा

देवनागरी लिपीतील हिंदी ही संघराज्याची सरकारी भाषा ठरली आहे. संघराज्याच्या सरकारी कामाकरिता सर्व राष्ट्रानी मान्य केलेल्या रूपात हिंदी अंक वापरले जातील. पण घटना अमलात आल्यापासून पंधरा वर्षेपर्यंत संघराज्याच्या कामासाठी सगळीकडे इंग्रजी भाषा पूर्वीप्रमाणे वापरली जाईल. या पंधरा वर्षाच्या काळात राष्ट्राध्यक्षांना योग्य वाटल्यास ते इंग्रजी भाषा आणि आंतरराष्ट्रीय अंकांचे जोडीने देवनागरी लिपीतील हिंदी आणि देशी पद्धतीचे आकडे यांचा उपयोग करण्यास परवानगी देऊ शकतील. पंधरा वर्षे संपल्यानंतर इंग्रजी भाषा व आंतरराष्ट्रीय आकडे कायम ठेवावयाचे झाल्यास संघराज्याच्या विधिमंडळानी तसे कायदे करावयास पाहिजेत.३४३

घटना अमलात येऊन पाच वर्षे झाल्यानंतर एकदा आणि दहा वर्षे झाल्यानंतर

एकदा अशा दोन वेळी राष्ट्राध्यक्षांनी एक कमिशन नेमावयाचे आहे. या कमिशनला एक चेअरमन असून बाकी राष्ट्राध्यक्षांना योग्य वाटतील इतके आसामी, बंगाली, गुजराती, हिंदी, कानडी, काश्मीरी, मल्याळम्, मराठी, ओरिया, पंजाबी, संस्कृत, तामीळ, तेलगू व उर्दू या भाषांचे प्रतिनिधि घेतले जातील. या कमिशनने कोणत्या पद्धतीने काम करावयाचे हे राष्ट्राध्यक्ष ठरवितील.

संघराज्याच्या कामात हिंदी भाषेचा उत्तरोत्तर प्रसार कसा जास्त करिता येईल, सरकारी कामात इंग्रजीचा वापर कसा कमी करिता येईल, वरिष्ठ न्यायालयात हायकोर्टांत आणि सरकारी कायदेकानूंच्या बाबतीत कोणती भाषा वापरता येईल, संघराज्याच्या कामासाठी कोणते आकडे वापरावेत, घटकराज्यानी एकमेकाशी व संघराज्याशी दळणवळण ठेविताना कोणती भाषा वापरावी या सर्व गोष्टींचा विचार करून त्याबाबत राष्ट्राध्यक्षाना शिफारसी करावयाच्या आहेत. या शिफारसी करिताना हिंदुस्थानची औद्योगिक, सांस्कृतिक आणि शास्त्रीय प्रगति कशी होईल त्याचप्रमाणे हिंदी न बोलणाऱ्या घटकातील लोकांच्यावर सरकारी नोकऱ्यांच्या बाबतीत अन्याय होणार नाहीना या गोष्टींचेकडे लक्ष पुरविले पाहिजे.

संघराज्याच्या कनिष्ठ विधिमंडळाने वीस व वरिष्ठ विधिमंडळाने दहा असे सदस्य निवडून देऊन त्यांची एक कमिटी नेमण्यात आली पाहिजे. वर उल्लेखिलेल्या कमिशनच्या सूचना या कमिटीनी तपासून त्यावरील आपला अभिप्राय त्यानी राष्ट्राध्यक्षाना कळविला पाहिजे. या अभिप्रायाचा विचार करून राष्ट्राध्यक्षानी त्याना योग्य वाटतील ते हुकूम काढावयाचे आहेत. ३४४.

प्रकरण २

स्थानिक भाषा

घटकराज्यात वापरल्या जाणाऱ्या भाषांपैकी कोणतीही भाषा किंवा हिंदी ही घटकराज्यातील विधिमंडळे कायदा करून सरकारी कामकाजाची भाषा म्हणून ठरवू शकतील. पण अशा रीतीने एखाद्या घटकराज्याने आपली सरकारी भाषा ठरविली नाही तोपर्यंत घटना कायद्याचा अंमल सुरू होण्यापूर्वी ज्याप्रमाणे इंग्रजी भाषा वापरली जात होती त्याचप्रमाणे ती वापरली जाईल. ३४५

संघराज्याच्या व्यवहाराची जी भाषा असेल ती संघराज्य व घटकराज्ये यांच्या व घटकराज्यांच्या आपसातील दळणवळणासाठी वापरली जाईल पण दोन किंवा अधिक घटकराज्यानी आपसात करार करून जर असे ठरविले की आपसातील दळणवळणासाठी हिंदी भाषा वापरावयाची तर त्यास हरकत नाही. ३४६

एखाद्या घटकराज्यातील पुष्कळशा लोकानी आपल्या भाषेला सरकारी मान्यता मिळावी अशी विनंती केली तर राष्ट्राध्यक्ष त्याना योग्य वाटल्यास त्या भाषेला सरकारी मान्यता मिळावी असा हुकूम देऊ शकतील. कोणत्या टापूत व कोणत्या कामासाठी ही मान्यता मिळावी हे त्या हुकमाने ठरेल. ३४७

प्रकरण ३

वरिष्ठ न्यायालय व हायकोर्ट वगैरे मधील भाषा

संघराज्याच्या विधिमंडळानी कायदे करून वेगळी योजना करीपर्यंत, वरिष्ठ न्यायालय व हायकोर्टे, सर्व विधिमंडळांचे पुढे येणारी बिले, त्यानी पास केलेले कायदे राष्ट्राध्यक्ष, गव्हर्नर व राजप्रमुख यानी काढिलेले वटहुकूम, घटना कायद्याखालील व इतर कायद्यांचे खाली काढिलेले हुकूम व केलेले नियम बायलॉज् वगैरेंची भाषा इंग्रजी असणार. पण राष्ट्राध्यक्षांच्या परवानगीने गव्हर्नर अथवा राजप्रमुख हे आपल्या हायकोर्टात हिंदी अथवा घटकराज्यात चालणाऱ्या भाषेचा उपयोग करण्यास परवानगी देऊ शकतील पण हायकोर्टाने दिलेले निकाल व काढिलेले हुकूम याना ही भाषा चालणार नाही.

बिलाकरिता अथवा कायद्यांचे किंवा वटहुकमाकरिता इंग्रजी खेरीज एखादी भाषा वापरावी असे जर एखाद्या विधिमंडळाने ठरविले असेल तर या सर्वांचे अधिकृत इंग्रजी भाषांतर त्या घटकराज्यातील गॅझेटमध्ये प्रसिद्ध करण्यात येईल व ते प्रमाणभूत समजले जाईल. ३४८

घटना अमलात येऊन पंधरा वर्षें होईपर्यंत कोर्टांची अथवा कायद्यांची भाषा बदलण्याची सोय करणारे नवे बिल किंवा दुरुस्ती ही संघराज्याच्या विधिमंडळात राष्ट्राध्यक्षांच्या परवानगीवाचून आणिता येणार नाही आणि भाषांच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी नेमिलेले कमिशन या कमिशनच्या रिपोर्टांचा संघराज्याच्या विधि-

मंडळाच्या भाषा कमिटीने केलेला विचार या सर्व गोष्टी लक्षात घेऊनच राष्ट्राध्यक्ष अशा बिलाला अथवा दुरुस्तीला संमति द्यावयाची का नाही हे ठरवितील. ३४९

प्रकरण ४ थे

खास आदेश.

तक्रारींची दाद मागण्यासाठी संघराज्य अथवा घटकराज्ये यात चालू असलेल्या कोणत्याही भाषेत अर्ज करण्यास हरकत नाही. ३५०

हिंदी भाषेचा प्रसार करणे, भारतातील इतर भाषातील शब्दसंपत्ति, शब्दप्रयोग इत्यादींच्या योगाने हिंदी भाषा समृद्ध करणे नवीन शब्द पाहिजे असल्यास प्रथम संस्कृतमध्ये तो शोधणे व नंतर इतर भाषांचेकडे वळणे व भारतीय संस्कृतीला साजेल असे हिंदीचे रूप बनविणे हे संघराज्याचे कर्तव्य राहील. ३५१

भाग १७

आणीबाणीची परिस्थिति.

युद्ध, आक्रमण, अथवा अंतस्थ अशांततेमुळे भारताची सुरक्षितता धोक्यात आली आहे असे राष्ट्राध्यक्षाना वाटले तर त्यांनी तसा जाहीरनामा काढावयाचा आहे. अशी परिस्थिति संपली हे दुसरा जाहीरनामा काढून ठरविता येते. हा जाहीरनामा विचारासाठी संघराज्याच्या विधिमंडळापुढे ठेवून त्या दोनही विधिमंडळानी जर ठराव करून त्याला मान्यता दिली नाही तर त्याचा अंमल दोन महिन्यापेक्षा जास्त टिकू शकत नाही.

या दोन महिन्याच्या मुदतीत वरिष्ठ विधिमंडळानी संमति दिलेली असली पण कनिष्ठ विधिमंडळ बरखास्त झालेले असल्याकारणाने त्याला जाहीरनाम्याचा विचार करिता आला नाही तर नवे कनिष्ठ विधिमंडळ अस्तित्वात येऊन एक महिना पुरा होईपर्यंत जाहीरनाम्याचा अंमल चालू राहतो. एवढ्या मुदतीत नव्या विधिमंडळाने या जाहीरनाम्याची मुदत ठराव करून वाढविली तर ठीकच आहे.

आणीबाणीची परिस्थिति राष्ट्राध्यक्षानी जाहीर करण्यासाठी युद्ध, आक्रमण अथवा अशांततेला प्रत्यक्षात प्रारंभ झालेलाच असला पाहिजे असे नाहीं. ३५२

आणीबाणीची परिस्थिति जोपर्यंत कायम आहे तोपर्यंत संघराज्य हे घटक राज्याना राज्यकारभार कसा करावा याबद्दल आज्ञा देऊ शकते आणि संघराज्याची विधिमंडळे संघराज्याच्या भारतातील अधिकाऱ्याना ज्या बाबी सामान्यतः संघराज्याच्या कार्यक्षेत्रात मोडत नाहीत अशा बाबीत सुद्धा अधिकार देऊ शकतात. ३५३ आणीबाणीच्या परिस्थितीचा जाहीरनामा जोपर्यंत अंमलात आहे तोपर्यंत संघराज्याने घटकराज्याच्याबद्दल ज्या आर्थिक जबाबदाऱ्या पत्करल्या आहेत त्यात हवे ते बदल हुकूम काढून राष्ट्राध्यक्ष करू शकतात पण असा प्रत्येक हुकूम त्यानी संघराज्याच्या विधिमंडळाचे पुढे ठेविला पाहिजे. ३५४

प्रत्येक घटकराज्याचे बाह्य आक्रमणापासून आणि अंतःस्थ अशांततेपासून संरक्षण करणे आणि प्रत्येक घटकराज्यात घटना कायदा पाळला जातो याची खबरदारी घेणे हे संघराज्याचे कर्तव्य आहे. ३५५

गव्हर्नर अथवा राजप्रमुख यांचे कडून मिळालेल्या माहितीवरून अथवा अन्य तऱ्हेने कळलेल्या माहितीवरून राष्ट्राध्यक्षांची खात्री झाली की घटना कायद्याबरहुकूम राज्यकारभार चालविणे एखाद्या घटकराज्यात अशक्य झाले आहे तर राष्ट्राध्यक्ष जाहीरनामा काढून अशा घटकराज्यातील गव्हर्नर अथवा राजप्रमुख आणि कार्यकारी मंडळ यानी चालवावयाचे राज्यकारभाराचे सर्व अधिकार आपलेकडे घेऊ शकतील व त्या घटकापुरते कायदे करण्याचे अधिकार संघराज्याच्या विधिमंडळांचेकडे देऊ शकतील त्याचप्रमाणे घटना कायद्यातील काही भागांची अंमलबजावणी तहकूब ठेवू शकतील. पण अशा जाहीरनाम्यानी ते त्या घटकराज्यातील हायकोर्टचे अधिकार वगैरे कमी करू शकणार नाहीत. दुसरा जाहीरनामा काढून अशा प्रकारच्या पहिल्या जाहीरनाम्यात ते वाटेल तो बदल करू शकतील.

अशा तऱ्हेचा जाहीरनामा संघराज्याच्या विधिमंडळांचे पुढे ठेविला जाईल आणि त्यानी जर त्याची मुदत वाढविली नाही तर त्याची अंमलबजावणी दोन महिन्यापेक्षा जास्त करिता येणार नाही. या दोन महिन्याच्या मुदतीत वरिष्ठ विधिमंडळाने जाहीरनामा मान्य केला पण कनिष्ठ विधिमंडळ बरखास्त झाले असल्याकारणाने ते त्याचा विचार करू शकले नाही तर नव्या कनिष्ठ विधिमंडळाची बैठक भरल्यापासून एक महिन्यापेक्षा जास्त या जाहीरनाम्याची मुदत राहणार नाही. अशी जाहीरनाम्याची मुदत संघराज्याची विधिमंडळे ठराव करून एकएका वेळी सहा महिने वाढवू शकतात पण एकंदर मुदत तीन वर्षापेक्षा जास्त वाढविता येत नाही. अशी

एखादी सहा महिन्याची मुदत संपण्याचे पूर्वीच कनिष्ठ विधिमंडळ बरखास्त करण्यात आले आणि वरिष्ठ विधिमंडळाने जाहीरनामा संमत केला पण कनिष्ठ विधिमंडळ अस्तित्वात नसल्यामुळे त्याचा विचार करू शकले नाही तर नव्या विधिमंडळाची बैठक भरून एक महिना होईपर्यंत या जाहीरनाम्याचा अंमल चालू राहील. ३५६

वर उल्लेखिलेल्या जाहीरनाम्यामुळे घटकराज्यातील कायदे करण्याचे अधिकार संघराज्याच्या विधिमंडळाचेकडे आले तरी ती मंडळे हे अधिकार व हे अधिकार दुसऱ्याला देण्याचे अधिकार राष्ट्राध्यक्षाना देऊ शकतील.

घटकराज्यातील कायदे करण्याचे अधिकार ज्या वेळी संघराज्याची विधिमंडळे अथवा राष्ट्राध्यक्ष चालवीत असतील त्यावेळी ती मंडळे अथवा राष्ट्राध्यक्ष संघ-राज्याच्या अधिकाऱ्याना घटकराज्यातील राज्यकारभार करण्याचे अधिकार देऊ शकतील.

अशातऱ्हेच्या कायद्याचा व अशातऱ्हेने केलेल्या व्यवस्थांचा अंमल जाहीर-नाम्याची मुदत संपल्यानंतर योग्य त्या विधिमंडळानी कायदे करून रद्द केला नाही तर जास्तीत जास्त एक वर्ष टिकू शकतो.

आणीबाणीची परिस्थिति असे पर्यंत व्यक्तीच्या भाषण व विचार व्यक्त करणे, शस्त्रें न घेता जमाव करणे, समाज, संघ, संस्था स्थापन करणे, भारतात स्वतंत्र संचार करणे, भारतात कोठेही जाऊन वास करणे, मिळकत संपादन करणे, वाटेल तो धंदा करणे या मूलभूत हक्कावर निर्बंध घालणारे कायदे करण्याचा सरकारला अधिकार राहील पण आणीबाणीची परिस्थिति संपल्याबरोबर या कायद्यांचा अंमल पण संपेल. ३५८

आणीबाणीची परिस्थिति जाहीर करणाऱ्या जाहीरनाम्याचा अंमल ज्या क्षेत्रात आहे त्या क्षेत्रातील व्यक्तींना आपल्या मूलभूत हक्कांच्या रक्षणासाठी कोर्टाकडे धाव घेण्याची सवलत काही काळ काढून घेण्याचा हुकूम राष्ट्राध्यक्ष काढू शकतील पण असा हुकूम संघराज्याच्या विधिमंडळांचे पुढे ठेविला पाहिजे. ३५९

भारताचे अथवा भारताच्या एखाद्या भागाचे आर्थिक स्थैर्य धोक्यात आहे असे राष्ट्राध्यक्षाना वाटल्यास तसा त्याना जाहीरनामा काढिता येईल. या जाहिरनाम्याची मुदत वगैरेसंबंधीच्या योजना आणीबाणीच्या परिस्थितीच्या जाहिरनाम्यासारख्याच आहेत. या जाहीरनाम्याचा अंमल चालू आहे तोपर्यंत संघराज्य हे घटकराज्याना आर्थिक बाबतीत आज्ञा देऊ शकेल.

अशा आज्ञामध्ये सरकारी नोकरांचे वगैरे पगार कमी करणे, पैशासंबंधीची बिले राष्ट्राध्यक्षांच्या संमतीसाठी राखून ठेविणे या गोष्टींचा समावेश होऊ शकतो.

अशा आणीबाणीच्या आर्थिक प्रसंगात वरिष्ठ न्यायालयाच्या व हायकोर्टांच्या न्यायाधीशांचे पगार वगैरे कमी केले तरी हरकत नसते. ३६०

भाग १९

संकीर्ण योजना

राष्ट्राध्यक्ष, गव्हर्नर अथवा राजप्रमुख यानी राज्यकारभार करिताना केलेल्या कृत्याबद्दल त्याना सामान्यतः कोणत्याही कोर्टाला जाब द्यावा लागत नाही पण घटना कायद्याच्या भंगाचा राष्ट्राध्यक्षावर संघराज्याच्या विधिमंडळानी जर आरोप केलेला असला तर या आरोपाची चौकशी कोर्ट ट्रायब्यूनल अथवा मंडळापुढे होऊ शकेल.

या अधिकाऱ्यांच्या वर्तनाची चौकशी करण्याचे जरी सामान्यतः कोर्टांना अधिकार नसले तरी संघराज्याच्या सरकारवर किंवा घटकराज्याच्या सरकारवर लाविलेले दावे चालविण्याचे अधिकार कोर्टांना आहेत.

राष्ट्राध्यक्ष, गव्हर्नर अथवा राजप्रमुख हे अधिकारावर असताना त्यांच्याविरुद्ध कोणत्याही कोर्टात फौजदारी काम चालवेता येणार नाही व त्याना पकडण्याचा अथवा अटकेत ठेवण्याचा हुकूम कोणतेही कोर्ट करू शकणार नाही.

राष्ट्राध्यक्ष, गव्हर्नर अथवा राजप्रमुख यांच्या वैयक्तिक कृत्याबद्दल त्यांच्याविरुद्ध दिवाणी दावा लावावयाचा झाल्यास तो लाविण्याचे पूर्वी दोन महिने त्यांच्या ऑफिसमध्ये लेखी नोटीस दिली पाहिजे. या नोटिशीमध्ये दाव्याचा प्रकार, दाव्याचे कारण, दावा लावू इच्छिणाराचे नाव, राहण्याचे ठिकाण आणि दाव्यात जी विनंति केली असेल व मागणी केली असेल ती इतक्या सर्व गोष्टी दिलेल्या असल्या पाहिजेत. ३६१

हिंदी संस्थानिकांशी त्यांचे वैयक्तिक अधिकार, त्याना मिळणाऱ्या सवलती व मान याबद्दल हिंदुस्थान सरकारने जे करार केले आहेत आणि ज्या गोष्टींची हमी दिली आहे व जी आश्वासने दिली आहेत ती विचारात न घेता कोणतेही विधिमंडळे आपले कायदे करू शकणार नाहीत. ३६२

ज्या वादग्रस्त प्रश्नात एखाद्या हिंदी संस्थानिकाने घटना अमलात येण्याचे पूर्वी हिंदुस्थान सरकारशी केलेला तह, करारनामा अथवा सरकारकडून मिळालेली सनद

यांचा अर्थ लाविण्याचा प्रसंग येतो त्या प्रश्नात वरिष्ठ न्यायालय अथवा इतर कोर्टें यांना लक्ष घालिता येत नाही पण राष्ट्राध्यक्षानी अशा एखाद्या प्रश्नाबाबत वरिष्ठ न्यायालयाचे मत मागितले तर तेवढा न्यायालयाला त्या गोष्टींचा विचार करिता येतो. ३६३

एखाद्या मोठ्या बंदराला किंवा विमानतळाला कोणत्याही विधिमंडळानी केलेले कायदे लागू होऊ नयेत अथवा विशिष्ट फरकानी लागू व्हावेत असे हुकूम राष्ट्राध्यक्ष काढू शकतात. ३६४

संघराज्याने घटनेच्या योजनाखाली दिलेले हुकूम जर घटकराज्यानी पाळिले नाहीत तर त्या घटकराज्यात घटना कायद्याला धरून राज्यकारभार चालण्यासारखी परिस्थिति राहिलेली नाही असे राष्ट्राध्यक्षानी समजावयास हरकत नाही. (याचा अर्थ आणो-बाणीची परिस्थिति जाहीर करून सर्व राज्यकारभार आपल्या हाती घेऊ शकतील.) ३६५

भाग २०

घटना कायद्यातील दुरुस्ती

घटना कायद्यात जर दुरुस्ती करावयाची असेल तर त्यासाठी संघराज्याच्या विधिमंडळात बिल आणावयास पाहिजे. हे बिल $\frac{2}{3}$ बहुमताने पास झाले आणि त्याला राष्ट्राध्यक्षानी संमति दिली म्हणजे त्याप्रमाणे घटना कायदा दुरुस्त होईल परंतु राष्ट्राध्यक्षांच्या निवडणुकीसंबंधाच्या योजना, संघराज्याचे राज्यकारभाराचे अधिकार, घटकराज्यांचे राज्यकारभाराचे अधिकार, अजमेर, भोपाळ, बिलासपूर, कुचबिहार, कूर्ग, दिल्ली, हिमाचलप्रदेश, कच्छ, मणिपूर व त्रिपुरा या घटकात हायकोर्टें स्थापिण्यासंबंधीचे अधिकार, संघराज्यातील न्यायालयासंबंधीच्या योजना, घटकराज्यातील हायकोर्टांचेसंबंधीच्या योजना, संघराज्य व घटकराज्ये यांच्यामधील कायदे करण्याच्या सत्तेची विभागणी, घटकराज्याना संघराज्याच्या विधिमंडळात मिळणारे प्रतिनिधित्व आणि घटना कायद्यात दुरुस्ती कशी व्हावी या सर्व गोष्टींच्या बद्दलच्या योजनांच्या बिलाना राष्ट्राध्यक्षाच्या पुढे परवानगीसाठी ठेविण्याचे पूर्वी या सगळ्या दुरुस्त्याना आसाम, बिहार, मुंबई, मध्यप्रदेश, मद्रास, ओरिसा, पंजाब, युक्तप्रांत, पश्चिम बंगाल, हैद्राबाद, काश्मीर व जम्मू, मध्यभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानी संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर व कोचीन, व विंध्यप्रदेश या घटकराज्यापैकी कमीत

कमी निम्या घटकराज्यांच्या विधिमंडळानी ठराव पास करून संमति दिलेली असली पाहिजे. ३६८

भाग २१

तात्पुरत्या व संक्रमणकाळातील योजना

पुढील गोष्टी जरी संघराज्याच्या नेहमीच्या कायद्यांच्या क्षेत्राबाहेर असल्या तरी सुद्धा कापूस, लोकर, त्यांचेपासून झालेल्या कापडाचे उत्पादन, पुरवठा आणि वितरण, कागद, खाद्य पदार्थ, पेंड, कोळसा व कोळशापासून होणारे पदार्थ, लोखंड, पोलाद, अभ्रक यांच्या व्यापाराबद्दल कायदे करण्याचे व या कायद्यांच्या उल्लंघनाबद्दल कोणत्या कोर्टांनी व किती शिक्षा करावयाच्या यासंबंधाचे कायदे करण्याचे अधिकार घटना-कायद्याचा अंमल सुरू होऊन पाच वर्षे पुरी होईपर्यंत, संघराज्याच्या विधिमंडळाना आहे. ही मुदत संपल्यानंतर मात्र त्यानी केलेल्या कायद्यांचा अंमल राहणार नाही. ३६९

काश्मीर आणि जम्मू हे घटकराज्यापैकी एक राज्य आहे असे जरी झाले असले तरी घटकराज्यासंबंधीच्या सर्व योजना अद्याप या घटकराज्याला लागू होणार नाहीत. इतर घटकराज्याना लागू होणारे जे सर्व प्रकारचे कायदे संघराज्याला करित येतात त्यापैकी कोणत्या प्रकारचे कायदे या घटकाचे बाबतीत संघराज्याला करित येतील हे राष्ट्राध्यक्षानी काश्मीर सरकारच्या सल्ल्याने व संमतीने ठरवावयाचे आहे. काश्मीरची राज्यघटना ठरविणारी घटनासमिति भरण्याचेपूर्वी काश्मीर सरकारने (महाराज व त्यांचे प्रधान यानी) ज्या बाबतीत अशी संमति दिली असेल त्या सर्व बाबी या घटना समितीपुढे विचारासाठी ठेविल्या जातील. या घटना समितीने मान्यता दिली तर राष्ट्राध्यक्ष या तात्पुरत्या योजना रद्द करू शकतील. ३७०

घटना अमलात आल्यापासून जास्तीत जास्त पहिली दहा वर्षे हैद्राबाद, काश्मीर व जम्मू, मध्यभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानी संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर व कोचीन व विंध्यप्रदेश यापैकी कोणत्याही घटकावर सर्व साधारणतः राष्ट्राध्यक्षांचा अंमल राहील आणि राष्ट्राध्यक्षांनी वेळोवेळी दिलेल्या आज्ञाप्रमाणे या घटकानी राज्यकारभार करावा असे संघराज्याची विधिमंडळे कायदे करून ठरवू शकतील. ३७१

घटना अमलात येण्याचे पूर्वी भारतातील कायद्यापैकी जे घटनेशी विसंगत नाहीत अशा कायद्यात योग्य त्या विधिमंडळानी बदल करीपर्यंत ते आहेत त्या स्वरूपात

लागू राहतील. घटनेच्या योजनाशी विसंगतता येऊ नये यासाठीं सध्या लागू असलेल्या कायद्यात पाहिजे ते बदल करण्याचे अधिकार राष्ट्राध्यक्षाना आहेत. ३७२

गुन्हे करू नयेत या उद्देशाने ज्याना त्यानी बेकायदेशीर कृत्य करण्याचे अगोदरच पकडून ठेविलेले असते त्यापैकी कोणत्या वर्गातल्या लोकाना सल्लागार मंडळाचे सल्ल्याचाचून तीनपेक्षा जास्त महिने प्रतिबंधात ठेविता येईल व जास्तीत जास्त किती दिवस ठेविता येईल व सल्लागार मंडळाची कामकाजाची पद्धति काय राहील या गोष्टी घटना सुरू होऊन एक वर्षपर्यंत कायदे करून संघराज्याच्या विधिमंडळानी जर ठरविल्या नाहीत तर तेवढे वर्ष संपेपर्यंत त्या बाबतीत राष्ट्राध्यक्षानी केलेले नियम प्रमाणभूत मानावेत. ३७३

घटना अमलात येण्याचे वेळी जे फेडरल कोर्टाचे न्यायाधीश होते ते घटना अमलात आल्याबरोबर वरिष्ठ न्यायालयाचे न्यायाधीश होणार, व त्याना वरिष्ठ न्यायालयाच्या न्यायाधीशाचे पगार पेन्शन्स व भत्ते वगैरे मिळणार.

घटना सुरू होण्याचे वेळी फेडरल कोर्टापुढे जी जी अपीले अर्ज इत्यादि कामे होती ती ती सर्व वरिष्ठ न्यायालयाने पुढे चालवावयाची असून फेडरल कोर्टाने घटनेपूर्वी दिलेले निकाल व काढिलेले हुकूम यांना वरिष्ठ न्यायालयाने दिलेले निकाल व काढिलेले हुकूम यांचा दर्जा मिळावयाचा आहे.

प्रीव्ही कौन्सिलपुढे जी कामे घटना सुरू होण्याचे वेळी निकालात निघालेली नसतील ती प्रीव्ही कौन्सिलने संपविणे बेकायदेशीर नाही. या कामांचे प्रीव्ही कौन्सिलने दिलेले निकाल हे वरिष्ठ न्यायालयाने दिलेले निकाल मानावयाचे आहेत.

हैद्राबाद, काश्मीर व जम्मू, मध्यभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानी संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर व कोचीन व विंध्यप्रदेश या घटकराज्यातील प्रीव्ही कौन्सिलपुढे घटना सुरू होण्याचे वेळी जी कामें होती ती घटनेचा अंमल सुरू झाल्याबरोबर भारताच्या वरिष्ठ न्यायालयाकडे जातील व तेथे त्यांचा निर्णय केला जाईल. ३७४

भारतातील सर्व दिवाणी फौजदारी व रेव्हेन्यूची कोर्टे (जमीन महसूल खात्याची) व सर्व अधिकारी यानी घटना कायद्याप्रमाणे चालावयाचे आहे. ३७५

घटनेचा अंमल सुरू होण्याचे सुमारास घटकराज्यातील हायकोर्टातून जे जे कायम झालेले हायकोर्ट जज्जेस होते ते ते नव्या घटनेखाली त्या त्या घटकराज्यात हायकोर्ट जज्ज झाले पण हैद्राबाद, जम्मू व काश्मीर, मध्यभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व

पंजाब संस्थानी संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर व कोचीन व विंध्यप्रदेश यातील या हायकोर्ट जज्जानी किती दिवस कामावर राहावयाचे हे राष्ट्राध्यक्षानी ठरवावयाचे आहे आणि बाकीच्या घटकातील हायकोर्ट जज्ज वयाची साठ वर्षे होईपर्यंत नोकरीवर राहावयाचे एवढा या दोन तऱ्हेच्या घटकराज्याच्या बाबतीत फरक आहे. ३७६

घटना सुरू होण्याचे वेळी जे ऑडिटर जनरल होते तेच नव्या घटनेत मुख्य हिशेब-तपासनीस झाले आहेत. (Comptroller and Auditor General). ३७७ घटनेपूर्वीच्या हिंदुस्थान सरकारच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनचे जे सदस्य आहेत तेच नव्या घटनेने संघराज्याच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनचे सदस्य झाले आहेत. प्रांतांच्या (एका किंवा अनेकांच्या मिळून) पब्लिक सर्व्हिस कमिशनचे जे सदस्य असतील ते घटनेनंतर त्या त्या प्रांताच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनचे सदस्य होणार असे ठरले आहे. ३७८

संघराज्याच्या नव्या विधिमंडळांची स्थापना होऊन त्यांच्या पहिल्या बैठकी भरेपर्यंत घटना परिषदेनेच संघराज्याच्या विधिमंडळांची कामे करावयाची आहेत. ज्या घटकराज्यांचे अथवा ज्या प्रदेशांचे प्रतिनिधि घटना परिषदेमध्ये नव्हते त्याना या तात्पुरत्या विधिमंडळात प्रतिनिधित्व मिळावे अशी योजना राष्ट्राध्यक्षांनी नियम करून करावयाची आहे. घटना परिषदेचे जे सदस्य ६–१०–४९ अथवा त्यानंतर घटकराज्यांतील विधिमंडळांचे अथवा प्रधानमंडळाचे सदस्य असतील त्यानी आपल्या घटकराज्यातील जागा जर पूर्वी सोडल्या नसल्या तर घटना अमलात आल्याबरोबर त्यांची या तात्पुरत्या विधिमंडळातील जागा रिकामी झाली असे ठरविण्यात येईल. अशा रिकाम्या जागा निवडणूक करून भरून काढण्यात येतील असे ठरले आहे. घटना परिषदेचे जे स्पीकर व डेप्युटि स्पीकर होते तेच या तात्पुरत्या विधिमंडळाचे स्पीकर व डेप्युटि स्पीकर झाले आहेत. ३७९

नव्या घटनेखाली राष्ट्राध्यक्षांची निवडणूक होईपर्यंत घटना परिषदेने निवडलेली व्यक्तीच राष्ट्राध्यक्ष होणार. या राष्ट्राध्यक्षाची जागा काही कारणाने रिकामी पडल्यास तात्पुरत्या विधिमंडळाने दुसरा राष्ट्राध्यक्ष निवडावयाचा आहे आणि तोपर्यंत भारताच्या सरन्यायाधीशानी राष्ट्राध्यक्ष म्हणून काम पाहावयाचे आहे. ३८०

राष्ट्राध्यक्षानी प्रधानमंडळ नेमावयाचे आहे आणि तसे त्यानी प्रधानमंडळ नेमीपर्यंत पहिलेच प्रधानमंडळ काम पाहणार. ३८१

आसाम, बिहार, मुंबई, मध्यप्रदेश, मद्रास, ओरिसा, पंजाब, युक्तप्रांत (उत्तर प्रदेश) व पश्चिम बंगाल या घटकराज्यात नव्या घटनेप्रमाणे नवीं विधिमंडळे येई-पर्यंत जुन्या विधिमंडळानीच त्यांची कामे करावयाची आहेत. अशा विधिमंडळातून जे स्पीकर व डेप्युटि स्पीकर व चेअरमन आणि डेप्युटि चेअरमन असतील तेच घटनेनंतरच्या तात्पुरत्या विधिमंडळातील स्पीकर आणि डेप्युटि स्पीकर व चेअरमन आणि डेप्युटि चेअरमन असणार असे ठरले आहे. ३८२

नव्या गव्हर्नरच्या नेमणुका होईपर्यंत जुन्या प्रांतिक गव्हर्नरानीच त्या त्या घटक राज्यांचे गव्हर्नर म्हणून कामे करावयाची आहेत. ३८३ गव्हर्नरानी नवे प्रधान नेमी-पर्यंत जुने प्रधानच काम करीत राहतील. ३८४

इतर घटकराज्यातून नव्या घटनेखाली विधिमंडळें स्थापन होऊन त्यांच्या पहिल्या बैठकी भरे पर्यंत ज्या संस्थांनी घटनेपूर्वी विधिमंडळाचे काम केले त्याच संस्था विधि-मंडळे म्हणून काम करीत राहतील. ३८५ राजप्रमुखानी नव्या प्रधानांच्या नेमणुका करीपर्यंत जुने प्रधानच त्या त्या घटकांचे प्रधान म्हणून कामे करीत राहणार. ३८६

घटना सुरू होऊन तीन वर्षेपर्यंत ज्या निवडणुकी होतील त्या निवडणुकीसाठीं कोणत्या ठिकाणची लोकसंख्या किती आहे हे राष्ट्राध्यक्षानी घालून दिलेल्या नियमा-खाली ठरेल. निरनिराळ्या घटकाच्यासाठी निरनिराळे नियम करण्याचा त्याना अधिकार आहे. ३८७

संघराज्याच्या तात्पुरत्या विधिमंडळात ज्या जागा रिकाम्या पडतील त्या कशा रीतीने भरून काढावयाच्या हे राष्ट्राध्यक्ष नियम करून ठरवितील. जोपर्यंत त्यानी असे नियम केले नाहीत. तोपर्यंत घटना परिषदेतील रिकामी पडलेली जागा भरून काढण्याची जी पद्धति होती तिचाच अवलंब केला जाईल. आसाम, बिहार, मुंबई, मध्यप्रदेश, मद्रास, ओरिसा, पंजाब, युक्तप्रांत (उत्तर प्रदेश) व पश्चिम बंगाल या घटकातील शेड्यूल्ड जातीच्या किंवा मुसलमान किंवा शीख प्रतिनिधीची जागा रिकामी पडली तर नवा प्रतिनिधि (तसे करण्याची गरज नाही असे राष्ट्राध्यक्षांनी ठरविले नाही तोपर्यंत) त्याच जातीतून पसंत केला जाईल.

घटकराज्यातील जुन्या विधिमंडळातील रिकाम्या जागा ज्या पद्धतीने भरल्या जात होत्या त्याच पद्धतीने नव्या तात्पुरत्या विधिमंडळातील जागासुद्धा भरल्या जातील. ३८८

घटना अमलात येण्याचे वेळी ज्या बिलांचा जुन्या विधिमंडळानी पूर्ण विचार केलेला नव्हता त्यांचा विचार करून त्याना कायद्याचे रूप देणे अथवा ती नापास

करणे हे कार्य जुन्या विधिमंडळाचे जागी आलेल्या नव्या तात्पुरत्या विधिमंडळानी करावयाचे आहे. ३८९

भारताच्या अथवा घटकराज्याच्या कन्सॉलिडेटेड फंडाबद्दलच्या ज्या नव्या योजना या घटनेने केल्या आहेत त्या ३१ मार्च १९५० पर्यंत जमा अथवा खर्च होणाऱ्या रकमाना लागू होणार नाहीत. तोपर्यंत त्या संबंधीच्या जुन्या योजनाच अमलात राहतील. ३९०

सत्तांतराच्या काळात घटना कायद्याच्या कोणत्याही योजनामुळे अडचणी उत्पन्न होत आहेत असे राष्ट्राध्यक्षाना वाटले तर ते हुकूम काढून घटनेत जरूर त्या दुरुस्त्या करू शकतील पण नव्या घटनेखाली एकदा संघराज्याच्या विधिमंडळांची स्थापना होऊन नवी मंडळे निवडून येऊन त्यांची पहिली बैठक सुरू झाली म्हणजे राष्ट्राध्यक्षांचा हा अधिकार शिल्लक राहणार नाही. अशा तऱ्हेचे हुकूम संघराज्याच्या तात्पुरत्या विधिमंडळाचे पुढे ठेविले जातील. नव्या घटनेला सुरवात झाल्यानंतर राष्ट्राध्यक्षांचे चालावयाचे हे घटना दुरुस्तीचे अधिकार घटना सुरू होण्याचे पूर्वी गव्हर्नर जनरल ऑफ इंडिया हे चालवू शकतील. ३९२

भाग २२ वा

घटना कायद्याचे नाव अंमलबजावणी व रद्द केलेले कायदे

या घटनेचे नाव भारताची घटना. ३९३ या घटनेतील सुमारें पंधरा कलमे घटना कायदा पास झाल्या बरोबर अंमलात आली व बाकीची सर्व कलमें २६–१–१९५० पासून अमलात आली.

या घटना कायद्याने इंडियन इंडिपेंडन्स ॲक्ट १९४७ चा व गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९३५ चा हे रद्द झाले पण प्रीव्ही कौन्सिलचे अधिकार रद्द करणारा १९४९ चा कायदा मात्र रद्द झाला नाही.

लागू राहतील. घटनेच्या योजनाशी विसंगतता येऊ नये यासाठीं सध्या लागू असलेल्या कायद्यात पाहिजे ते बदल करण्याचे अधिकार राष्ट्राध्यक्षाना आहेत. ३७२

गुन्हे करू नयेत या उद्देशाने ज्याना त्यानी बेकायदेशीर कृत्य करण्याचे अगोदरच पकडून ठेविलेले असते त्यापैकी कोणत्या वर्गातल्या लोकाना सल्लागार मंडळाचे सल्ल्यावाचून तीनपेक्षा जास्त महिने प्रतिबंधात ठेविता येईल व जास्तीत जास्त किती दिवस ठेविता येईल व सल्लागार मंडळाची कामकाजाची पद्धति काय राहील या गोष्टी घटना सुरू होऊन एक वर्षपर्यंत कायदे करून संघराज्याच्या विधिमंडळानी जर ठरविल्या नाहीत तर तेवढे वर्ष संपेपर्यंत त्या बाबतीत राष्ट्राध्यक्षानी केलेले नियम प्रमाणभूत मानावेत. ३७३

घटना अमलात येण्याचे वेळी जे फेडरल कोर्टाचे न्यायाधीश होते ते घटना अमलात आल्याबरोबर वरिष्ठ न्यायालयाचे न्यायाधीश होणार, व त्याना वरिष्ठ न्यायालयाच्या न्यायाधीशाचे पगार पेन्शन्स व भत्ते वगैरे मिळणार.

घटना सुरू होण्याचे वेळी फेडरल कोर्टापुढे जी जी अपीले अर्ज इत्यादि कामे होती ती तीं सर्व वरिष्ठ न्यायालयाने पुढे चालवावयाची असून फेडरल कोर्टाने घटनेपूर्वी दिलेले निकाल व काढिलेले हुकूम यांना वरिष्ठ न्यायालयाने दिलेले निकाल व काढिलेले हुकूम यांचा दर्जा मिळावयाचा आहे.

प्रीव्ही कौन्सिलपुढे जी कामे घटना सुरू होण्याचे वेळी निकालात निघालेली नसतील ती प्रीव्ही कौन्सिलने संपविणे बेकायदेशीर नाही. या कामांचे प्रीव्ही कौन्सिलने दिलेले निकाल हे वरिष्ठ न्यायालयाने दिलेले निकाल मानावयाचे आहेत.

हैद्राबाद, काश्मीर व जम्मू, मध्यभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व पंजाब संस्थानी संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर व कोचीन व विंध्यप्रदेश या घटकराज्यातील प्रीव्ही कौन्सिलपुढे घटना सुरु होण्याचे वेळी जी कामे होती ती घटनेचा अंमल सुरू झाल्याबरोबर भारताच्या वरिष्ठ न्यायालयाकडे जातील व तेथे त्यांचा निर्णय केला जाईल. ३७४

भारतातील सर्व दिवाणी फौजदारी व रेव्हेन्यूची कोर्टे (जमीन महसूल खात्याची) व सर्व अधिकारी यानी घटना कायद्याप्रमाणे चालावयाचे आहे. ३७५

घटनेचा अंमल सुरू होण्याचे सुमारास घटकराज्यातील हायकोर्टातून जे जे कायम झालेले हायकोर्ट जज्जेस होते ते ते नव्या घटनेखाली त्या त्या घटकराज्यात हायकोर्ट जज्ज झाले पण हैद्राबाद, जम्मू व काश्मीर, मध्यभारत, म्हैसूर, पतियाळा व पूर्व

पंजाब संस्थानी संघ, राजस्थान, सौराष्ट्र, त्रावणकोर व कोचीन व विंध्यप्रदेश यातील या हायकोर्ट जज्जानी किती दिवस कामावर राहावयाचे हे राष्ट्राध्यक्षानी ठरवावयाचे आहे आणि बाकीच्या घटकातील हायकोर्ट जज्ज वयाची साठ वर्षे होईपर्यंत नोकरीवर राहावयाचे एवढा या दोन तऱ्हेच्या घटकराज्यांच्या बाबतीत फरक आहे. २७६

घटना सुरू होण्याचे वेळी जे ऑडिटर जनरल होते तेच नव्या घटनेत मुख्य हिशेब-तपासनीस झाले आहेत. (Comptroller and Auditor General). ३७७ घटनेपूर्वीच्या हिंदुस्थान सरकारच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनचे जे सदस्य आहेत तेच नव्या घटनेने संघराज्याच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनचे सदस्य झाले आहेत. प्रांतांच्या (एका किंवा अनेकांच्या मिळून) पब्लिक सर्व्हिस कमिशनचे जे सदस्य असतील ते घटनेनंतर त्या त्या प्रांताच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनचे सदस्य होणार असे ठरले आहे. ३७८

संघराज्याच्या नव्या विधिमंडळांची स्थापना होऊन त्यांच्या पहिल्या बैठकी भरेपर्यंत घटना परिषदेनेच संघराज्याच्या विधिमंडळांची कामे करावयाची आहेत. ज्या घटकराज्यांचे अथवा ज्या प्रदेशांचे प्रतिनिधि घटना परिषदेमध्ये नव्हते त्याना या तात्पुरत्या विधिमंडळात प्रतिनिधित्व मिळावे अशी योजना राष्ट्राध्यक्षांनी नियम करून करावयाची आहे. घटना परिषदेचे जे सदस्य ६-१०-४९ अथवा त्यानंतर घटकराज्यांतील विधिमंडळांचे अथवा प्रधानमंडळाचे सदस्य असतील त्यानी आपल्या घटकराज्यातील जागा जर पूर्वी सोडल्या नसल्या तर घटना अमलात आल्याबरोबर त्यांची या तात्पुरत्या विधिमंडळातील जागा रिकामी झाली असे ठरविण्यात येईल. अशा रिकाम्या जागा निवडणूक करून भरून काढण्यात येतील असे ठरले आहे. घटना परिषदेचे जे स्पीकर व डेप्युटि स्पीकर होते तेच या तात्पुरत्या विधिमंडळाचे स्पीकर व डेप्युटि स्पीकर झाले आहेत. ३७९

नव्या घटनेखाली राष्ट्राध्यक्षांची निवडणूक होईपर्यंत घटना परिषदेने निवडलेली व्यक्तीच राष्ट्राध्यक्ष होणार. या राष्ट्राध्यक्षाची जागा काही कारणाने रिकामी पडल्यास तात्पुरत्या विधिमंडळाने दुसरा राष्ट्राध्यक्ष निवडावयाचा आहे आणि तोपर्यंत भारताच्या सरन्यायाधीशानी राष्ट्राध्यक्ष म्हणून काम पाहावयाचे आहे. ३८०

राष्ट्राध्यक्षानी प्रधानमंडळ नेमावयाचे आहे आणि तसे त्यानी प्रधानमंडळ नेमीपर्यंत पहिलेच प्रधानमंडळ काम पाहणार. ३८१

आसाम, बिहार, मुंबई, मध्यप्रदेश, मद्रास, ओरिसा, पंजाब, युक्तप्रांत (उत्तर प्रदेश) व पश्चिम बंगाल या घटकराज्यात नव्या घटनेप्रमाणे नवी विधिमंडळे येईपर्यंत जुन्या विधिमंडळानीच त्यांची कामे करावयाची आहेत. अशा विधिमंडळातून जे स्पीकर व डेप्युटि स्पीकर व चेअरमन आणि डेप्युटि चेअरमन असतील तेच घटनेनंतरच्या तात्पुरत्या विधिमंडळातील स्पीकर आणि डेप्युटि स्पीकर व चेअरमन आणि डेप्युटि चेअरमन असणार असे ठरले आहे. ३८२

नव्या गव्हर्नरच्या नेमणुका होईपर्यंत जुन्या प्रांतिक गव्हर्नरानीच त्या त्या घटक राज्यांचे गव्हर्नर म्हणून कामे करावयाची आहेत. ३८३ गव्हर्नरानी नवे प्रधान नेमीपर्यंत जुने प्रधानच काम करीत राहतील. ३८४

इतर घटकराज्यातून नव्या घटनेखाली विधिमंडळें स्थापन होऊन त्यांच्या पहिल्या बैठकी भरे पर्यंत ज्या संस्थांनी घटनेपूर्वी विधिमंडळाचे काम केले त्याच संस्था विधिमंडळे म्हणून काम करीत राहतील. ३८५ राजप्रमुखानी नव्या प्रधानांच्या नेमणुका करीपर्यंत जुने प्रधानच त्या त्या घटकांचे प्रधान म्हणून कामे करीत राहणार. ३८६

घटना सुरू होऊन तीन वर्षेपर्यंत ज्या निवडणुकी होतील त्या निवडणुकीसाठीं कोणत्या ठिकाणची लोकसंख्या किती आहे हे राष्ट्राध्यक्षानी घालून दिलेल्या नियमाखाली ठरेल. निरनिराळ्या घटकाच्यासाठी निरनिराळे नियम करण्याचा त्याना अधिकार आहे. ३८७

संघराज्याच्या तात्पुरत्या विधिमंडळात ज्या जागा रिकाम्या पडतील त्या कशा रीतीने भरून काढावयाच्या हे राष्ट्राध्यक्ष नियम करून ठरवितील. जोपर्यंत त्यानी असे नियम केले नाहीत. तोपर्यंत घटना परिषदेतील रिकामी पडलेली जागा भरून काढण्याची जी पद्धति होती तिचाच अवलंब केला जाईल. आसाम, बिहार, मुंबई, मध्यप्रदेश, मद्रास, ओरिसा, पंजाब, युक्तप्रांत (उत्तर प्रदेश) व पश्चिम बंगाल या घटकातील शेडयूल्ड जातीच्या किंवा मुसलमान किंवा शीख प्रतिनिधीची जागा रिकामी पडली तर नवा प्रतिनिधि (तसे करण्याची गरज नाही असे राष्ट्राध्यक्षांनी ठरविले नाही तोपर्यंत) त्याच जातीतून पसंत केला जाईल.

घटकराज्यातील जुन्या विधिमंडळातील रिकाम्या जागा ज्या पद्धतीने भरल्या जात होत्या त्याच पद्धतीने नव्या तात्पुरत्या विधिमंडळातील जागासुद्धा भरल्या जातील. ३८८

घटना अमलात येण्याचे वेळी ज्या बिलांचा जुन्या विधिमंडळानी पूर्ण विचार केलेला नव्हता त्यांचा विचार करून त्याना कायद्याचे रूप देणे अथवा ती नापास

करणे हे कार्य जुन्या विधिमंडळाचे जागी आलेल्या नव्या तात्पुरत्या विधिमंडळानी करावयाचे आहे. ३८९

भारताच्या अथवा घटकराज्याच्या कन्सॉलिडेटेड फंडाबद्दलच्या ज्या नव्या योजना या घटनेने केल्या आहेत त्या ३१ मार्च १९५० पर्यंत जमा अथवा खर्च होणाऱ्या रकमाना लागू होणार नाहीत. तोपर्यंत त्या संबंधीच्या जुन्या योजनाच अमलात राहतील. ३९०

सत्तांतराच्या काळात घटना कायद्याच्या कोणत्याही योजनामुळे अडचणी उत्पन्न होत आहेत असे राष्ट्राध्यक्षाना वाटले तर ते हुकूम काढून घटनेत जरूर त्या दुरुस्त्या करू शकतील पण नव्या घटनेखाली एकदा संघराज्याच्या विधिमंडळांची स्थापना होऊन नवी मंडळे निवडून येऊन त्यांची पहिली बैठक सुरू झाली म्हणजे राष्ट्राध्यक्षांचा हा अधिकार शिल्लक राहणार नाही. अशा तऱ्हेचे हुकूम संघराज्याच्या तात्पुरत्या विधिमंडळाचे पुढे ठेविले जातील. नव्या घटनेला सुरवात झाल्यानंतर राष्ट्राध्यक्षांचे चालावयाचे हे घटना दुरुस्तीचे अधिकार घटना सुरू होण्याचे पूर्वी गव्हर्नर जनरल ऑफ इंडिया हे चालवू शकतील. ३९२

भाग २२ वा

घटना कायद्याचे नाव अंमलबजावणी व रद्द केलेले कायदे

या घटनेचे नाव भारताची घटना. ३९३ या घटनेतील सुमारें पंधरा कलमे घटना कायदा पास झाल्या बरोबर अंमलात आली व बाकीची सर्व कलमे २६–१–१९५० पासून अमलात आली.

या घटना कायद्याने इंडियन इंडिपेंडन्स ॲक्ट १९४७ चा व गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९३५ चा हे रद्द झाले पण प्रीव्ही कौन्सिलचे अधिकार रद्द करणारा १९४९ चा कायदा मात्र रद्द झाला नाही.

● ● ●

किंमत दीड रुपाया

पांच कादंबऱ्या